म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ९८७५०

# मराठी विचारवंत आणि आपण

मेघश्याम पुंडलीक रेगे ▫ यशवंत दिनकर फडके ▫ राम जोशी ▫ प्रभाकर पाध्ये ▫ दिलीप पुरुषोत्तम चित्रे ▫ मधु पानवलकर ▫ वसंत पळशीकर




REFBK-0017319

७३६७३
२१।३।६९

निबंध
१८७७

# मराठी विचारवंत

## आणि

## आपण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७३६७३ वि: निबंध
क्रमांक १८७७ नों दि: २१-३-६९

मेघश्याम पुंडलीक रेगे
यशवंत दिनकर फडके
राम जोशी
प्रभाकर पाध्ये
दिलीप पुरुषोत्तम चित्रे
वसंत पळशीकर
मधु पानवलकर

दा. क्र. १७३१९

# मराठी विचारवंत आणि आपण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१२७०

REFBK-0017319

मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मौज प्रकाशन : १७१

पहिली आवृत्ती : जानेवारी १९६९

© १९६९, मौज प्रकाशन गृह

**किंमत दोन रुपये**

'मौज दिवाळी १९६८'मधून पुनर्मुद्रित

मुखपृष्ठ :
श्रावण गोपाळ गुरव

प्रकाशक :
वि० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह,
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

३

**विचारवंतांचे जग : व्याख्या आणि व्याप्ती**

मेघश्याम पुंडलीक रेगे

२४

**मराठी विचारवंतांची परंपरा : काही प्रश्न**

यशवंत दिनकर फडके

३५

**ज्ञानपीठांमध्ये मराठी विचारवंत**

राम जोशी

५०

**निष्ठा, प्रेरणा—आणि मोह**

प्रभाकर पाध्ये

६७

**विचारवंत आणि साहित्यिक**

दिलीप पुरुषोत्तम चित्रे

७४

**आम्ही मराठी विचारवंत**

वसंत पळशीकर

८०

**विचारवंत, समाज आणि शासन**

मधु पानवलकर

समाजाच्या स्थितीगतीचे चिंतन करीत राहून त्याच्या सांस्कृतिक भवितव्याची काळजी वाहाणाऱ्या 'जागल्यां'चे काम करणाऱ्या व्यक्तींचा वर्ग प्रत्येक समाजात असतो—निदान असावा. हे जागल्ये म्हणजे विचारवंत. समाजाच्या दैनंदिन व्यवहारात प्रत्यक्षतः विचारवंतांचे अस्तित्व जाणवत नसल्यामुळे सर्वसामान्य नागरिकाला त्यांचे समाजाच्या घडणीतील महत्त्वही कळत नाही. समाजाच्या प्रत्यक्ष अस्तित्वाचे भान विचारवंतांनाही, त्यांच्या तत्त्वचिंतनाच्या भरात, राहातेच असेही नाही. सर्वसाधारण नागरिक आणि विचारवंत यांना एकमेकांची चांगली ओळख असेल, आणि त्यांच्यामधील मूलभूत जिव्हाळा शाबूत असेल, तरच कोणत्याही समाजाची विचारसृष्टी सखोल, निःस्पृह, आणि टवटवीत राहाते. समाजाविषयी कळकळ असणाऱ्या व्यक्ती समाजहिताचे उद्योग अनेक दिशांनी आणि अनेक पातळ्यांवर करीत असतात. या समाजकारणाला दिशा लाभण्यासाठी विचारवंत आणि नागरिक यांच्या परस्पर संबंधाची—आणि त्यांतील गुंतागुंतीची—योग्य जाणीव त्या दोघांनाही असणे आवश्यक ठरते. याच हेतूने 'मौज दिवाळी १९६८'मध्ये एक परिसंवाद प्रसिद्ध करण्यात आला. या महत्त्वाच्या प्रश्नावर अधिक चर्चा व्हावी या हेतूने तोच परिसंवाद या पुस्तकाच्या रूपाने पुनर्मुद्रित केला आहे.

वीसबावीस वर्षांपूर्वीपासून महाराष्ट्राची संस्कृती, त्याचे समाजजीवन व त्याचे भवितव्य यांचा शोध मौज साप्ताहिक व मौज वार्षिक यांमधल्या 'आजचा मध्यमवर्ग' (१९४७); 'महाराष्ट्र–महोदय' (१९४९); 'महाराष्ट्र-संस्कृती' (१९५४); 'असा हा मराठी माणूस' (१९५७); 'उद्याचा महाराष्ट्र' (१९५९); 'आजचा मराठी समाज' (१९६१); 'विचार व कला यांचे सामाजिक अभिसरण' (१९६२); यांसारख्या परिसंवादांमधून सातत्याने आणि अनाग्रही सत्यशोधनाच्या भूमिकेवरून घेतला जात आहे.

प्रस्तुत परिसंवाद हा त्याच शोधातला एक नवा टप्पा होय.

आधुनिक काळापुरते पाहिले तर विचारवंताची भूमिका जाणीवपूर्वक पत्करणाऱ्या व्यक्तींप्रमाणेच विचारवंत वर्गाबद्दल सुबुद्ध आस्था आणि कुतूहल असलेल्या व्यक्तीही पाश्चात्यांच्या मानाने भारतीय (इतकेच काय पण पुष्कळशा आशियाई-आफ्रिकी देशांतीलही) समाजांत बऱ्याच दुर्मिळ आहेत. विचारवंत आणि नागरिक यांच्या संबंधांचे स्वरूप नक्की करण्याचा प्रश्न अशा रीतीने बराच व्यापक असला, तरी प्रस्तुत परिसंवादात विवेचनाला नेमकेपणा येण्याच्या दृष्टीने तो महाराष्ट्रापुरता मर्यादित केला आहे. विचारवंताचा 'वसा' कोणता येथपासून सुरुवात करून मराठी विचारवंतांना लाभलेली परंपरा, त्यांच्या पुढील प्रेरणा व मोह, त्यांच्या 'माहेरां'ची—ज्ञानपीठांची—आजची स्थिती, नियतकालिकांसारखी विचारविनिमयाची माध्यमे विचारवंत वापरतात तेव्हा जाणवणाऱ्या त्यांच्या मर्यादा, सर्जनशील लेखक व विचारवंत यांमधली समकक्षता, महाराष्ट्रातल्या शासनादी सामाजिक संस्थांच्या धोरणांमध्ये व व्यवहारांमध्ये पडणारे समाजाच्या विचारवंतविषयक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब,—हे 'समाज-विचारवंत संबंधां'चे पैलू या परिसंवादात विचारात घेतले गेले आहेत.

विचारवंतांच्या कार्यातील अडचणी, आधुनिक जगातल्या अफाट तांत्रिक व ज्ञानात्मक प्रगतीचा विचार-क्षेत्रावरील परिणाम, मराठी विचारसृष्टीमागची वर्गीय आणि जातीय पार्श्वभूमी—यांसारखे अनेक प्रश्न या परिसंवादात आलेले नाहीत; त्यातला एखादा आला असला तरी त्याचा विचार चुटपुटताच झाला आहे. विषय इतका व्यापक आहे, की त्याचा सांगोपांग विचार एका परिसंवादात करणे अशक्यच. एकूण सामाजिक जीवनाची गुणवत्ता वाढण्यासाठी विचारवंतांनी सतत आत्मनिरीक्षण करीत राहाणे हे जितके आवश्यक आहे, तितकेच, आस्थेवाईक आणि सुबुद्ध 'सामाजिका'नेही आपल्या समाजातील विचारवंताच्या कामगिरीचे मूल्यमापन करीत राहाणे निकडीचे आहे. अशा आत्मनिरीक्षणाला आणि मूल्यमापनाला या पुस्तकातील लेखनाने चालना दिली, तरी त्याला अपेक्षित श्रेय मिळाल्यासारखे होईल.

— संपादक

# मराठी विचारवंत

## आणि

## आपण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नोंद दि: ....................

मेघश्याम पुंडलीक रेगे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७३१९

# विचारवंतांचे जग
## व्याख्या आणि व्याप्ती

'विचारवंत' हा शब्द 'इंटलेक्चुअल' ह्या इंग्रजी शब्दाला मराठी प्रतिशब्द म्हणून ह्या लेखापुरता किंवा परिसंवादापुरता तरी मुक्रर करण्यात आला आहे. निष्कारण गैरसमज निर्माण होऊ नये म्हणून हे सुरवातीलाच सांगणे आवश्यक आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटल किंवा कांट, हेगेल ह्यांचा विचारवंत असा आपण गौरवाने उल्लेख करू. पण आपल्या अर्थाने त्यांना विचारवंत म्हणणे हे त्यांच्या कामगिरीचे फार अपुरे वर्णन ठरेल. उलट, 'विचारवंतां'चा एक मोठाच वर्ग आधुनिक समाजात असतो. आधुनिक समाजाचे हे एक लक्षण आहे. ह्या सर्व विचारवंतांकडून प्लेटो किंवा कांट ह्यांच्या दर्जाच्या बौद्धिक कामगिरीची अपेक्षा करणे अवास्तव तर ठरेलच; पण ह्या सर्व मंडळींवर त्यामुळे अनवस्था ओढवेल. विचारवंताच्या कामगिरीचा प्रांत म्हणजे बौद्धिक किंवा वैचारिक क्षेत्र. पण बौद्धिक क्षेत्रातील कामगिरीचीही अनेक स्वरूपे, अनेक उद्दिष्टे असतात. न्यूटन किंवा डार्विन ह्यांनी पदार्थविज्ञानात किंवा जीवशास्त्रात क्रांतिकारक कामगिरी केली; आपापल्या ज्ञानक्षेत्रात मूलभूत संकल्पनांची एक नवीन चौकट त्यांनी निर्माण केली; ह्या चौकटीत, ह्या संकल्पनांच्या अनुरोधाने तपशीलवार संशोधनाला पिढ्यान पिढ्या पुरेल एवढे क्षेत्र वैज्ञानिकांना खुले करून दिले. पण ह्या दोन शास्त्रज्ञांना विचारवंत म्हणणे चमत्कारिक ठरेल.

आणि त्यांच्या भव्य बौद्धिक कामगिरीचे हे वर्णन अपुरे ठरेल म्हणूनच केवळ नव्हे, त्यांच्या कामगिरीचे स्वरूपच असे आहे की, त्यांना आपल्या अर्थाने विचारवंत म्हणणे योग्य होणार नाही. डार्विनच्या उत्क्रांतिवादाचे दूरगामी वैचारिक परिणाम जीवनाच्या अनेक क्षेत्रांवर होणे अटळ होते. पण ह्या परिणामांचा बौद्धिक पाठपुरावा डार्विनने स्वतः केला नाही. त्याने जीवशास्त्रातच स्वतःला बंदिस्त करून घेतले होते. ह्या परिणामांची, धर्म, नीती ह्या क्षेत्रांमध्ये उत्क्रांतिवादाच्या होणाऱ्या परिणामांची त्याला जाणीव होती, पण "हे प्रश्न मानवी बुद्धीपलिकडचे आहेत; परंतु माणसाला आपले कर्तव्य करीत राहाता येते," एवढेच भाष्य करून डार्विन स्तब्ध झाला. उलट, डार्विनचा अनुयायी हक्सले हा एक मातबर वैज्ञानिक होता आणि शिवाय विचारवंतही होता. जीवशास्त्रात त्याने महत्त्वाचे संशोधन केले होतेच, पण उत्क्रांतिवादाच्या इतर वैचारिक क्षेत्रांवर, मानवाच्या समग्र व्यवहारावर होणाऱ्या परिणामांची चिकित्सा, लोकांचा रोष पत्करून, बौद्धिक प्रामाणिकपणा ढळू न देता, त्याने केली. व्हॉल्टेर हा हक्सलेसारखा किंवा एवढा वैज्ञानिक नव्हता. पण न्यूटनच्या गणिती पदार्थविज्ञानाच्या रीतीचा आणि संकल्पनांचा प्रसार फ्रान्समध्ये त्याने केला; प्रचलित कार्टेशिअन पदार्थविज्ञानावर टीका करून न्यूटनच्या उपपत्तींचे समर्थन त्याने केले. पण त्यांबरोबरच धर्म, नीती, सामाजिक व्यवहार ह्यांच्यासंबंधी त्याने जी विचारसरणी मांडली तिचा न्यूटनचे पदार्थविज्ञान हा एक महत्त्वाचा आधार होता. व्हॉल्टेर आणि हक्सले विचारवंतांच्या आपल्या व्याख्येत बसतात; न्यूटन आणि डार्विन अव्वल दर्जाचे वैज्ञानिक असूनही बसत नाहीत! आइन्स्टाइन आणि बर्ट्रांड रसेल अव्वल दर्जाचे वैज्ञानिक किंवा गणिती असूनही बसतात; पण रूदरफोर्ड किंवा फ्रेगे बसत नाहीत. मग विचारवंताची नेमकी व्याख्या काय? त्याची नेमकी बौद्धिक भूमिका (रोल) कोणती?

## विचारवंतांचा प्रतिनिधी : सॉक्रेटिस

असे म्हणता येईल की, गोष्टी घडवून आणण्यापेक्षा गोष्टी समजून घेण्याची विचारवंतांची प्रवृत्ती असते. कल्पना, संकल्पना (कन्सेप्ट्स), उपपत्ती (थिअरी) ह्यांच्याविषयी इतरांच्या मानाने त्यांना असाधारण

आस्था असते. प्रसंग घडला की कार्यतत्पर होण्याऐवजी त्याचे मर्म शोधून काढायचा प्रयत्न ते करू लागतात. विवक्षित प्रसंगामध्ये त्यांच्या दृष्टीने सामान्य संकल्पना मूर्त झालेल्या असतात आणि त्या हुडकून काढण्याकडे त्यांचा कल असतो. सामान्य नियमांची उदाहरणे म्हणून विवक्षित प्रसंग त्यांना महत्त्वाचे वाटतात. "जे आपण तपासून पाहिलेले नाही असे जीवन जगण्यात अर्थ नाही," असे म्हणणाऱ्या सॉक्रेटिसाला विचारवंतांचा प्रतिनिधी मानता येईल. जीवनाच्या बौद्धिक चिकित्सेमध्ये जीवनाचा अर्थ आहे, हे ह्या प्रवृत्तीचे आत्यंतिक स्वरूप होईल. सारांश, कर्ता म्हणून जगण्याऐवजी द्रष्टा, भाष्यकार म्हणून विचारवंत जगतो. व्यवहारात मग्न होण्याऐवजी एक पाऊल मागे सरून त्या व्यवहाराचे स्वरूप संकल्पनांच्या साहाय्याने आकलन करण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

## चुकला विचारवंत कॉफीहाउसमध्ये

यावर असे म्हणता येईल की, ही सर्व लक्षणे किंवा हे लक्षण बौद्धिक कुतूहलाचे सामान्य लक्षण आहे. वैज्ञानिकसुद्धा हेच करीत असतो. विवक्षित घटनांचा सामान्य संकल्पनांच्या साहाय्याने उलगडा करण्याचा त्याचाही प्रयत्न असतो; तोही विवक्षित घटनांकडे सामान्य नियमांची उदाहरणे म्हणून पाहात असतो. मग प्रत्येक शास्त्रज्ञाला विचारवंत मानणे आवश्यक ठरेल. विचारवंताच्या भूमिकेचे नेमके वैशिष्ट्य काय? यावर उत्तर असे की, ह्या दोन भूमिकांत छटेचा फरक आहे, आणि तरीही तो महत्त्वाचा आहे. विचारवंत संकल्पनांमध्ये घेत असलेला रस तुलनेने अधिक निरपेक्ष असतो. शास्त्रज्ञ हा शास्त्रज्ञ म्हणून वागत असताना एका बौद्धिक का होईना, पण व्यवहारामध्ये गढून गेलेला असतो; तो व्यवहार यशस्वी रीतीने पार पाडण्याचे ओझे त्याच्या शिरावर असतेच! काही विवक्षित बौद्धिक प्रश्न सोडवण्यात तो मग्न असतो आणि हे प्रश्न सोडविण्यासाठी ज्या संकल्पना उपयुक्त ठरतील तेवढ्या तो स्वीकारतो, इतर बाजूला सारतो. ही उपयुक्ततेची कसोटी संकल्पनांना तो निष्ठुरपणे लावत असतो; कारण, तो काम उरकण्याच्या गर्दीत असतो, बौद्धिक खेळ खेळायला त्याला वेळ नसतो. ह्या दृष्टीने विचारवंत बौद्धिक खेळ खेळत असतो. आपण हाताळत असलेल्या संकल्पनांकडे तो त्यांचा काही तावड-

तोव्र उपयोग करण्याच्या दृष्टीने पाहात नसतो. ह्या संकल्पना तो अधिक विकसित करील, त्यांचे एक नवीन संघटण घडवून आणील. एका क्षेत्रात वर करून राहिलेल्या संकल्पनांना तेथून उचलून त्यांचा दुसऱ्या क्षेत्रात वापर करील. जीवनकलहाच्या संकल्पनेने प्राण्यांच्या घडून आलेल्या उत्क्रांतीचा उलगडा होण्याला मदत होते, हे पाहून माणसाच्या सबंध नैतिक व्यवहाराचे स्पष्टीकरण करण्यासाठी ही संकल्पना तो वापरेल; भौतिक प्रक्रियांचे यांत्रिक (मेकॅनिकल) नियमांच्या साहाय्याने स्पष्टीकरण करता येते हे पाहून मानवी देह भौतिक असतात, म्हणून माणसे म्हणजे गुंतागुंतीची यंत्रेच असतात अशी कल्पना करील; मानवी समाजाचे आणि व्यवहाराचे पदार्थविज्ञान (फिजिक्स) रचायचा प्रयत्न करील. "संकल्पनांना हातपाय असतात" असे हेगेलने म्हटले आहे. म्हणजे संकल्पना इकडून तिकडे भटकू शकतात. संकल्पनांच्या ह्या हालचाली ज्यांच्या मनात सुरू होतात आणि चालू राहातात ते विचारवंत. आता संकल्पनांना ताणून त्यांना अधिकाधिक सामान्य (जनरल) स्वरूप देण्याची, काही मोजक्या संकल्पनांच्या साहाय्याने सबंध अस्तित्वाचा उलगडा करण्याची प्रवृत्ती तत्त्ववेत्त्यांमध्येही आढळते. संकल्पनांच्या एका सर्वंकष व्यूहातून समग्र विश्वाची बौद्धिक उपपत्ती लावणे हे तत्त्वज्ञानाचे एक (पण एकमेव नव्हे) उद्दिष्ट असते. विचारवंताची बौद्धिक प्रेरणा तात्त्विक (फिलॉसॉफिकल) प्रेरणेला बरीचशी जवळ आहे. शास्त्रज्ञ आपल्या विज्ञान-शाखेत निमग्न असतो. विचारवंत अनुभवाच्या, ज्ञानाच्या, व्यवहाराच्या कोणत्याही क्षेत्रात रस घेऊ शकतो; असे करण्याची त्याची प्रवृत्ती असते. तत्त्ववेत्ता आणि विचारवंत यांतील भेद असा की, विज्ञानासारखी (पण तीच नव्हे) बौद्धिक शिस्त तत्त्वज्ञानाला पाळावी लागते; विवक्षित बौद्धिक प्रश्न सोडविण्याची निकडही विज्ञानाप्रमाणे तत्त्वज्ञानाला असते. चुकला वैज्ञानिक प्रयोगशाळेत असतो; चुकला तत्त्वज्ञानी अभ्यासिकेत असतो तर चुकला विचारवंत कॉफीहाउसमध्ये समशीलांबरोबर हरतऱ्हेच्या विषयांची चर्चा करताना दिसतो.

## चिकित्सेचे आव्हान

पण विचारवंत जर केवळ बौद्धिक खेळ खेळत असते तर त्यांना फारसे

महत्त्व द्यायचे—आणि त्यांच्या स्वतःच्याच दृष्टीतून त्यांना फारसे महत्त्व असायचे—कारण नसते. पण विचारवंत केवळ खेळ खेळत नसतो. संकल्पनांच्या चिकित्सेचा, निर्मितीचा, विस्ताराचा मुक्त आनंद घेणे हा विचारवंताच्या प्रवृत्तीचा एक भाग; आणि ह्या संकल्पनांचा उपयोग प्रत्यक्ष जीवनाच्या चिकित्सेसाठी करणे हा दुसरा भाग. हे काम अर्थात गंभीरपणे, जबाबदारीच्या जाणिवेने केले पाहिजे. प्रत्यक्ष जीवनाची चिकित्सा म्हणजे प्रचलित सामाजिक संस्था आणि व्यवहार, नीतिमूल्ये, राजकीय कार्यक्रम, कला आणि साहित्यातील प्रवृत्ती, विज्ञानाची अवस्था इत्यादी गोष्टींची, जीवनाच्या कोणत्याही भौतिक, सांस्कृतिक अंगाची चिकित्सा. ही चिकित्सा म्हणजे मूल्यमापन असते आणि म्हणून स्थिरावलेल्या व्यवहाराला आणि त्याच्या गृहीतकृत्यांना, जडलेल्या सामाजिक सवयींना तिच्यामध्ये एक आव्हान असते. विचारवंतांनी रंगविलेल्या स्वप्नाळू युटोपिया भावी सामाजिक क्रांतीच्या आणि पुनर्रचनेच्या रूपरेखा ठरतात; अशा रूपरेखा म्हणून मांडण्यातही येतात. सॉक्रेटिसचे व्यक्तिमत्त्व खेळकर, सौम्य, मिष्कील असे होते आणि आपण करीत असलेल्या अथीनिअन नीतीच्या आणि सामाजिक व्यवहाराच्या चिकित्सेला कुठेही कट्ट्यावर बसून चारचौघा मंडळींनी गप्पा माराव्या, असेच स्वरूप त्याने दिले होते. पण ह्या चिकित्सेमुळे घडत येत असलेले खोल आणि दीर्घगामी परिणाम ज्यांच्या ध्यानात आले होते अशा समकालीनांनी त्याची कडवटपणे टिंगल केली; आणि अधिक दणकट प्रकृतीच्या राजकारणी पुढाऱ्यांनी त्याचा वध केला. बर्ट्रांड रसेल दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अमेरिकेत अडकून पडले होते आणि युद्ध संपत आले, अमेरिकेतील युद्धकालीन वातावरणातून सुटका होऊन इंग्लंडला परतायची वेळ आली, तेव्हा त्यांना सर्वांत जास्त आनंद कशाचा वाटत होता तर तो ह्याचा की, इंग्लंडला परतल्यावर मनसोक्त गप्पा मारता येतील. बौद्धिक संकल्पनांतील उत्कट, मुक्त आनंद ह्या इच्छेतून दिसून येतो.

पण विचारवंतांच्या बौद्धिक आनंदाचे महत्त्व त्याच्या दुसऱ्या, उग्र, नैतिक, व्यावहारिक बाजूमुळेही असते. कार्लाइलची अशी एक, बहुधा कल्पित, गोष्ट सांगतात : एका बड्या व्यापाऱ्याबरोबर तो जेवायला बसला होता आणि आपल्या नेहमीच्या पद्धतीनुसार हरतऱ्हेच्या विषयांवर

प्रवचने झोडत होता. त्या बिचाऱ्या व्यापाऱ्याने कार्लाइल्चा हा शाब्दिक मारा थांबवायचा केविलवाणा प्रयत्न केला, "पण ह्या सगळ्या कल्पना आहेत मि० कार्लाइल, ह्या केवळ कल्पना आहेत." कार्लाइल म्हणाला, "रूसो नावाचा एक माणूस होता. त्याने एक पुस्तक लिहिले. त्याच्यात दुसरे काही नव्हते; अशाच केवळ कल्पना होत्या. त्याच्या दुसऱ्या आवृत्तीचे बाइंडींग पहिल्या आवृत्तीला 'केवळ कल्पना' म्हणून हसलेल्या लोकांच्या कातड्यांनी केले होते." "कबुतराच्या पायांनी जे विचार येतात ते जगाचे धनी होतात."

## थिल्लरपणाचा आरोप

विचारवंताची बौद्धिक भूमिका अशी संमिश्र असते आणि म्हणून कित्येक मंडळींना विचारवंत ही जातच नापसंत असते. एखाद्या विषयाला सर्वस्वी वाहून घेतलेल्या मंडळींना, अनेक विषयांत स्वैर संचार करण्याची विचारवंताची वृत्ती बौद्धिक उथळपणाची आणि थिल्लरपणाची निदर्शक वाटते. आज ज्ञानाच्या क्षेत्रात विशेषीकरण (स्पेशलायझेशन) इतके वाढले आहे की, कुणीही माणूस अनेक विषयांवर अधिकाराने बोलूच शकणार नाही हे त्यांना उघड दिसते आणि तरीही कुणी बोलत असेल तर त्याचा सरळ अर्थ असा की, तो भोंदू आहे. शिवाय अशी इतस्ततः वैचारिक भटकेगिरी करीत राहाणे म्हणजे आपल्या विषयाशी बेइमानी करणे; गंभीर बौद्धिक आस्थेचा अभाव असे करण्यात दिसून येतो. किंवा आपल्या विषयातले आपले कर्तृत्व, निर्मितिक्षमता ओसरल्याचे ते एक लक्षण असते. गणिताच्या तत्त्वज्ञानाविषयी एखादा गणिती बोलू लागला की, तो गणिती म्हणून संपला; तो आता देवपूजेला लागला, असेच सर्व गणिती मनातल्या मनात तरी मानतात.

उलट, संकल्पनांना अनुरूप अशी जीवनाची पुनर्रचना करण्याचा विचारवंतांचा आग्रह अनेकांना उथळपणाचा वाटतो. तार्किक संकल्पनांनी जीवनाचे माप घेऊ पाहाणे शहाणपणाच्या, प्रगल्भतेच्या अभावाचे द्योतक आहे, असे त्यांना वाटते. कुठल्याही प्रस्थापित सामाजिक घडीमध्ये एक खोल असे शहाणपण वसत असते. एखादी निश्चित रूपरेखा डोळ्यांसमोर ठेवून त्याबरहुकूमच तिची कुणी बांधणी केलेली नसते. तर प्रत्यक्ष

परिस्थितीशी स्वतःला शक्य तितके जुळवून घेण्याच्या प्रयत्नात जीवनाने धारण केलेला तो आकार असतो. आपण त्याच्याकडे बाहेरून पाहिले तर आपल्याला अनेक दोष आणि उणिवा दिसतील. एकदोन मोजक्या मूल्यांचा किता समोर ठेवून जर आपण या सामाजिक घडीची तपासणी केली तर आपल्याला तिच्यात अनेक प्रकारची कमतरता, विकृती आढळेल. पण तिच्याकडे असे बाहेरून पाहाणे चूक आहे. माणसाची खरीखुरी प्रकृती—जगाला दाखविण्यासाठी संस्कृतीचा मुलामा वर चढविलेली प्रकृती नव्हे तर त्याची नागडी प्रकृती—त्याच्या गरजा, त्याच्या पिसाट, अमर्याद वासना पण त्याबरोबरच एका सुव्यवस्थित चाकोरीत जगण्याची त्याची मूलभूत गरज, परिस्थितीला वाकविण्याच्या त्याच्या सामर्थ्यांचा आवाका आणि ह्या सामर्थ्यांच्या मर्यादा, त्याचे नैतिक बळ आणि दुबळेपणा ह्या सर्वांचा नेमका मेळ बुद्धी किंवा तार्किक विचारशक्तीपलिकडे असलेल्या, जीवनाच्या गर्भात वसत असलेल्या कुठल्यातरी जाणिवेने साधलेला असतो. ह्या सामाजिक घडीकडे वरवर पाहिले तर अनेक ठिकाणी नीटनेटकेपणाचा, सुसूत्रतेचा अभाव आढळेल. पण ह्या सर्व गोंधळामागे आणि अव्यवस्थेमागे एक सूक्ष्म, व्यापक, लवचिक, पण खंबीर व्यवस्था असते. त्या जीवनाच्या प्रेक्षकाला ती उमगणार नाही, पण त्याच्यात भागिदार म्हणून वावरणाऱ्याला तिचे रहस्य समजलेले असते. हे बहुधा त्याला विधानांच्या रूपात मांडता येणार नाही. किंवा त्याचे बौद्धिक समर्थनही करता येणार नाही. फारतर एखादी खुबीदार म्हण तो उच्चारून दाखवील. पण ज्या पद्धतीने तो जगतो, जीवनात तग धरतो त्याच्यातून त्याची ही समज दिसून येते.

## कीव, तिरस्कार आणि भीती

मानवी जीवनाने उभारलेला आणि कसाबसा सावरीत आणलेला हा संस्कृतीचा डोलारा, केवळ तो परिपूर्ण नाही म्हणून कोसळून घालण्याचा प्रयत्न करणे बालिश आहे. केस वेळच्या वेळी कापून घ्यायला (बहुधा मुद्दाम) विसरणारी आणि चष्म्याच्या जाड भिंगामागून जगाकडे पाहाणारी कॉफीहाउसमधली पोरे, जेव्हा काखेतल्या जाड पुस्तकांवर भिस्त ठेवून असले मनसुबे रचत असतात तेव्हा व्यवहारात मुरलेल्या प्रौढांना त्यांचे हसूच येते. ही विचारवंत मंडळी उपद्रवकारक

असते, पण त्यांच्यापासून समाजाला फारसा धोका नसतो, अशीच जाणत्या प्रौढांची समजूत असते. कारण, जीवन मोठे चिवट आणि धूर्त असते हे त्यांना माहीत असते. ह्या विचारवंतांना ते एकदोन धक्के देईल, तीन-चार टप्पू हाणील आणि मग ही मंडळी आपोआप भानावर येईल, केस वेळच्या वेळी कापून घेऊन निमूटपणे संसाराला लागतील, असा त्यांचा विश्वास असतो. विचारवंताविषयी मुरब्बी प्रौढांना वाटणाऱ्या कीव आणि तिरस्कारामागे एक मोठे भयही दडलेले असते.

## उद्याला आवश्यक परिस्थिती

कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीमध्ये विचारवंतांचा वर्ग उदयाला येऊ शकेल? एक तर समाजात बौद्धिक परंपरा, वैचारिक विश्लेषणाची, चिकित्सेची परंपरा बरीचशी दृढमूल असली पाहिजे. पण एवढ्याने भागणार नाही. जीवनाच्या गुणवत्तेविषयी समाजातल्या काही वर्गांत तरी एक खोल कदर असली पाहिजे. अशा प्रकारची कदर म्हणजे अर्थात एक नैतिक गुण आहे; बौद्धिक गुण नव्हे. पण हा नैतिक गुण जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना आणि म्हणून बौद्धिक क्षेत्रालाही व्यापू शकेल आणि मग बौद्धिक जीवनालाही एक वेगळे चैतन्य आणि नेकी लाभतील. "कसेही, काहीही करून जगण्यात अर्थ नाही; योग्य मार्गानेच जगले पाहिजे, ह्या बाबतीत तडजोडीला जागाच नाही," हा निर्धार ह्या नैतिक वृत्तीचा गाभा आहे. "आकाश कोसळले तरी हरकत नाही, न्याय झालाच पाहिजे." योग्य काय? आणि अयोग्य काय? आणि का? हे प्रश्न जर ह्या निर्धाराने विचारले तर ते विलक्षण धारदार आणि निकडीचे ठरतात. आणि सामाजिक परिस्थितीत आणि वर्तनात व्यापक बदल घडून येत असताना जर हे प्रश्न अशा रीतीने व्यवहाराला बौद्धिक आधार देण्यासाठी विचारण्यात आले, तर संकल्पनांच्या साहाय्याने जीवनाचे परिवर्तन घडवून आणू पाहाणाऱ्या विचारवंतांचा उदय व्हायला आवश्यक ती अनुकूल परिस्थिती निर्माण झालेली असेल, असे म्हणता येईल.

## ग्रीक परंपरा : भव्य, पण मर्यादित

ग्रीसमध्ये सोफिस्ट-सॉक्रेटिसच्या कालखंडात अशी परिस्थिती होती

आणि (ज्यांच्याविषयी आपल्याला बरीचशी माहिती आहे असे) ते जगातले पहिले विचारवंत होते. बौद्धिक परंपरा ग्रीसमध्ये अगोदरच स्थिर झालेली होती आणि विचारवंतांच्या वृत्तीला आवश्यक असलेली उत्कट नैतिक आस्था आणि नैतिक कणा सॉक्रेटिसने पुरविला. पण ग्रीक वैचारिक परंपरा जरी सॉक्रेटिसनंतर टिकून राहिली आणि समृद्ध होत गेली तरी विचारवंतांची परंपरा त्याच्यानंतर क्षीण झाली असे म्हटले पाहिजे. ह्याचे एक कारण असे की ग्रीक वैचारिक परंपरा सामाजिक दृष्ट्या संकुचित होती. ग्रीकांची बौद्धिक कामगिरी इतकी देदीप्यमान आहे आणि तिच्या झळाळीने आपण इतके मोहून जातो की, ही भव्य तेजस्वी परंपरा एका अगदी लहान वर्गापुरती मर्यादित होती आणि बहुजनसमाजाला तिचा स्पर्शही झाला नव्हता. ही गोष्ट आपल्या ध्यानात येत नाही. वैचारिक विश्लेषण आणि निर्मिती ह्यांच्यामुळे परंपरेच्या कोषातून माणूस बाहेर पडतो; प्रत्यक्ष वस्तुस्थितीहून भिन्न आणि तिच्या-पेक्षा इष्ट असे दुसरे पर्याय शक्य कोटीतील आहेत हे ध्यानी आल्यामुळे त्याचा बौद्धिक आत्मविश्वास बळावतो आणि उपक्रमशीलतेची जबाबदारी स्वतःवर आहे ही जाणीव त्याला होते. ह्या सर्व विमोचक आणि नैतिक क्षितिजाचा विस्तार घडवून आणणाऱ्या प्रक्रियेपासून सर्वसाधारण ग्रीक समाज दूर होता. भौतिक तंत्रे, सामाजिक आचारविचार, नैतिक दंडक, धार्मिक श्रद्धा आणि विधी ह्या सर्वांच्या बाबतींत हा समाज परंपरेच्या कोषातच बंदिस्त होता. (ह्याच्या उलट, आधुनिक समाजाच्या जीवनाची भौतिक बाजू विज्ञानाने प्रमाण ठरविलेल्या बौद्धिक संकल्पनांवर सर्वस्वी आधारलेली असते. समाजातील फार मोठ्या वर्गाला ह्या संकल्पना समजून घेऊन प्रत्यक्षात वापराव्या लागतात. त्या सुधारत जातात म्हणजे अधिक नेमक्या, अधिक पर्याप्त होत जातात आणि त्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारातील वापर अधिक परिणामकारक आणि फलदायी होतो ही गोष्ट बऱ्याच जणांच्या परिचयाची असते. संकल्पनांतील बदलांच्या अनुरोधाने प्रत्यक्ष व्यवहारात बदल घडवून आणण्याची वृत्ती त्यांच्या ठिकाणी निर्माण झालेली असते. विचारवंतांना अनुकूल अशी ही सामाजिक परिस्थिती आहे.)

## प्लेटोने खाल्लेली पलटी

शिवाय सॉक्रेटिसनंतर त्याच्या शिष्योत्तमाने—प्लेटोने—पलटी खाल्ली. नैतिक मूल्यांवरील प्लेटोची निष्ठा सॉक्रेटिसइतकीच जाज्वल्य आणि प्रखर होती. आणि संकल्पनांचे विश्लेषण, निर्मिती ह्यांविषयी, जीवनाचे बौद्धिक आकलन करून घेण्यासंबंधीची त्याची आस्था सॉक्रेटिसइतकीच प्रबळ होती. तरीही ह्या दोघांत एक मूलभूत फरक होता. खुल्या मनाने बौद्धिक चर्चा, वादविवाद करण्याची सॉक्रेटिसची तयारी होती; नव्हे, तसा त्याचा आग्रह होता. उलट, प्लेटो गूढवादी होता. तार्किक चिकित्सेची, युक्तिवादांची, सर्व बौद्धिक व्यापारांची अंतिम परिणती एक सत्तत्त्वाच्या साक्षात दर्शनात होते, झाली पाहिजे, अशी त्याची श्रद्धा होती. बौद्धिक व्यापार ह्या साक्षात अनुभवाला केवळ साधनरूप आणि म्हणून गौण होते. हा साक्षात अनुभव प्राप्त करून घेणे आणि त्याच्या प्रकाशात जगणे, हे जीवनाचे परमोच्च श्रेय प्राप्त करून देणारी साधना नैतिक आहे; बौद्धिक नव्हे. बौद्धिक जीवन ह्या साधनेचे केवळ एक साधनरूप अंग आहे. शिवाय ही साधना समाजातील बहुसंख्य लोकांच्या कुवतीबाहेरची गोष्ट आहे. फारच थोड्या अधिकारी व्यक्तींना ती शक्य असते आणि त्यांच्या वैयक्तिक जीवनाचे नियमन तिच्यामुळे होते. इतर बहुसंख्य अनधिकारी व्यक्तींच्या बाबतीत असे म्हणता येईल की, अधिकारी सिद्धांनी घालून दिलेल्या व्यवस्थेप्रमाणे जगण्यात त्यांचे हित असते; पण ही गोष्ट त्यांना समजू शकणार नाही. (समजू शकली असती तर ते अधिकारी साधकांत मोडले असते.) त्यामुळे ही बुद्धिप्रणीत व्यवस्था इतरेजनांकडून स्वीकारली जाईल आणि पाळली जाईल असा प्लेटोला भरवसा नव्हता. सर्वसामान्य माणसांच्या स्थितीविषयी आणि भवितव्याविषयी प्लेटोला एक खोल निराशा वाटत असे. सामाजिक संस्थांचे, नीतीचे, चालीरीतींचे नियमन, परिवर्तन करणे हे बौद्धिक संकल्पनांचे एक कार्य आहे, ही सॉक्रेटिसची दृष्टी त्याच्यामागे उरली नाही. प्लेटोला अनुसरून, बौद्धिक जीवनाचे कार्य दुहेरी आहे, असे त्याच्यामागून मानले जाऊ लागले.

कित्येक असाधारण व्यक्ती संकल्पनांच्या साहाय्याने सत्य शोधून काढू

शकतात आणि ह्या प्रमाण ठरलेल्या संकल्पनांच्या आधारावर आपल्या वैयक्तिक जीवनाचे नियमन करू शकतात, त्याला योग्य तो नैतिक आकार देऊ शकतात. शिवाय बुद्धीच्या साहाय्याने, तार्किक विश्लेषणाच्या आणि युक्तिवादांच्या साहाय्याने विश्वाचे स्वरूप आपण समजून घेऊ शकतो आणि बुद्धीच्या ह्या विलासात, सत्याचे असे ग्रहण करण्यात एक शुद्ध, उदात्त, बुद्धिशाली प्राणी म्हणून माणसाच्या असलेल्या प्रतिष्ठेला साजेसा असा आनंद असतो. संकल्पनांविषयींची उत्युत्कट आस्था हा ग्रीक संस्कृतीचा एक विशेष होता. ॲरिस्टॉटल हा प्लेटोप्रमाणे गूढवादी नव्हता. आणि त्या वेळच्या सुशिक्षित ग्रीकांप्रमाणे ग्रीक धार्मिक परंपरेचा पगडाही त्याच्या मनावर नव्हता. सत्याच्या निरपेक्ष शोधाला वाहिलेल्या बौद्धिक जीवनात त्याला लाभत असलेल्या कृतार्थतेचे स्वरूप बरेचसे धार्मिक होते. हा ग्रीक आदर्श पाश्चात्य संस्कृतीने एक अंतिम मूल्य म्हणून कायमचा स्वीकारला.

## रोमन काळातील घसरण

पुढे ग्रीक जेव्हा रोमन साम्राज्याच्या अंकित झाले तेव्हा तर त्यांची स्वायत्तता आणि उपक्रमशीलता कायमचीच नष्ट झाली आणि वैयक्तिक साधनेचा आणि साफल्याचा एक प्रकार, एवढेच बौद्धिक जीवनाचे स्वरूप उरले. शिवाय रोमन लोक जवळजवळ सर्वस्वी व्यावहारिक वृत्तीचे होते. व्यवहारदक्ष असणे आणि व्यवहारनिपुण असणे हे त्यांचे आदर्श होते. ज्या संकल्पनांचा नजिकच्या व्यवहारात उपयोग करून घेता येईल असे त्यांना दिसत असे, त्यांचा त्या कारणामुळे ते स्वीकार करत. पण संकल्पनांचा केवळ बौद्धिक पाठपुरावा करीत बसणे त्यांना बेजबाबदार, थिल्लरपणाचे लक्षण वाटे. म्हणून ते चांगले इंजिनियर्स होत पण गणि होत नसत. "निसर्गाचा एक नवीन नियम मी शोधून काढू शकलो तर त्या आनंदापुढे साम्राज्य तुच्छ आहे," असे डेमॉक्रायटसचे एक वचन आहे. भूमितीतले एक कूट प्रमेय सोडवत असताना, नगरावर हल्ला होऊन ते पडले आहे आणि सर्वत्र हलकल्लोळ उडाला आहे, ह्याचे आर्किमिडीसला भान नव्हते. पण हे ग्रीक होते आणि असे रोमन निपजले नाहीत. तेव्हा सत्याच्या शोधाला वाहिलेल्या बौद्धिक जीवनात एक अंतिम साफल्य

पाहाणाऱ्या ग्रीक बौद्धिक परंपरेचे गांभीर्य आणि खोली रोमन काळात टिकली नाही. भोगविलासात जीवन घालविणाऱ्या संपन्न, उच्चवर्गीय लोकांच्या विनोदनासाठी उपलब्ध असलेला एक सुसंस्कृत विलास, एवढेच बौद्धिक साधनेचे स्वरूप राहिले.

## भारतीय परंपरा प्लेटोशी जुळणारी

आपल्या भारतीय बौद्धिक परंपरेचे स्वरूप अनेक बाबतींत ग्रीक बौद्धिक जीवनाशी, विशेषतः प्लेटोने प्रतिपादलेल्या बौद्धिक साधनेच्या संकल्पनेशी जुळणारे आहे. एक तर संकल्पनांविषयी (प्राचीन) भारतीयांना ग्रीकांप्रमाणेच विलक्षण आस्था होती. संकल्पना स्पष्ट करण्यात, त्यांचे विश्लेषण करून त्या शुद्ध, नेमक्या स्वरूपात मांडण्यात, कोणत्याही बौद्धिक भूमिकेची सर्व गृहितकृत्ये प्रस्फुट (एक्सप्लिसिट) करण्यात त्यांना उत्कट आनंद होता. सबंध मानवी इतिहासात केवळ ग्रीक आणि भारतीय वंशांच्या लोकांनी तात्त्विक दर्शनांची निर्मिती केली, ही उल्लेखनीय गोष्ट आहे. बौद्धिक शोधात मुक्त पण अतीव गंभीर आनंद घेण्याची कुवत आणि प्रवृत्ती असल्याशिवाय ही गोष्ट शक्य झाली नसती. पण ह्या शोधात हाती लागलेल्या संकल्पनांना अनुसरून जीवनाची, सामाजिक संस्थांची, नीतीची, व्यवहाराची पुनर्रचना करणे, हा ह्या बौद्धिक साधनेचा भाग नव्हता, आणि ते त्याचे फलही नव्हते. ही बौद्धिक साधना एका सामाजिक परंपरेचा भाग होती. एका गूढवादी साक्षात दर्शनात ह्या सामाजिक परंपरेचा उगम होता आणि ते दर्शन तिच्या प्रामाण्याचा आधारही होते. ह्या दर्शनाचा आशय स्पष्ट करणे हे बुद्धीचे कार्य होते; त्याचे परीक्षण किंवा चिकित्सा करणे नव्हे. बुद्धी विश्लेषक होती; निर्मितिशील नव्हती. ह्या परंपरेचे मूळ, शुद्ध स्वरूप बुद्धीने स्पष्ट केल्यानंतर त्याला अनुसरून जगण्यात नीती होती; बुद्धीने स्वतंत्रपणे प्रमाण ठरविलेल्या संकल्पनांना अनुसरून जीवनाचे परिवर्तन घडवून आणण्यात नव्हती. बुद्धीचे स्वरूप आणि कार्य ह्याविषयींची ही संकल्पना सॉक्रेटिक असण्यापेक्षा प्लेटॉनिक होती. सबंध भारतीय बौद्धिक परंपरा ह्या स्वरूपाची, एकसंध होती असे मला म्हणायचे नाही. (बुद्ध आणि सॉक्रेटिस ह्यांचे एकमेकांशी एकदम जुळले असते.) पण तिचे एकंदर

स्वरूप आणि प्रवृत्ती मुख्यत्वेकरून अशी होती. बुद्धिनिष्ठता हे तिचे अंतिम मूल्य नव्हते तर परंपरा शुद्ध राखणे हे होते. अंतर्मुख आणि पराङ्मुख असलेले भारतीय विचारवंत भोवतालच्या सामाजिक जीवनाविषयी आणि स्वतःच्या लौकिक जीवनाविषयीही उदासीन राहिले.

## ख्रिस्ताची बांधिलकी

सत्याला अनुसरूनच जगले पाहिजे आणि असे जगण्याच्या आड जी सामाजिक संस्था किंवा आंतरिक प्रवृत्ती येईल तिचा मोड केला पाहिजे, हा नैतिक आग्रह मुळात ख्रिस्ती होता. हा अर्थात यहुदी संस्कृतीचा वारसा होता. आपल्या वाडवडिलांच्या देवाने त्याच्या स्वतःच्या, त्याने निवडून खास आपल्या मानलेल्या, लोकांसाठी म्हणून घालून दिलेल्या मार्गापासून रेखामात्रानेसुद्धा न ढळण्यात मानवी जीवनाची सार्थकता होती. ख्रिस्ताचा देव एका मानववंशाचा देव नव्हता; सर्व मानवतेचा होता. आणि सर्व माणसांवर बंधुभावाने प्रेम करण्याचा धर्म ह्या देवाने ख्रिस्ताकरवी घालून दिला होता. पण सत्यावरील म्हणजे देवाने घालून दिलेल्या सत्य जीवनामार्गावरील प्रखर नैतिक निष्ठा हा यहुदी संस्कृतीचा वारसा ख्रिश्चन जीवनपद्धतीचा एक कायमचा घटक बनून राहिला आहे. "सीझरचे जे जे काही देणे लागत असाल ते सीझरला देऊन टाका आणि ईश्वराचे जे देणे लागत असाल ते ईश्वराला द्या," ह्या ख्रिस्ताच्या वचनामुळे अनेकदा सोय होऊ शकते खरी. लौकिक जीवनात करावी लागणारी कृत्ये आणि माणसाची धार्मिक कृत्ये, असे जीवनाचे दोन भिन्न कप्पे ह्या वचनाच्या आधारे पाडता येतात आणि व्यवहारात सोयीसाठी काही केले तरी त्यामुळे आध्यात्मिक जीवनाला बाधा येत नाही, अशी समजूत करून घेता येते. पण 'माणसाने सबंध जग जिंकले पण आत्मा जर गमावला तर त्याच्यात काय अर्थ आहे?' आत्मा न गमावणे म्हणजे सत्य मार्गावरून न ढळणे. शिवाय ख्रिस्ताच्या शिकवणुकीचे सार ख्रिस्ताच्या उदाहरणात आहे. सर्व पापी माणसांच्या पापाचा भार देवस्वरूप, पूर्णपणे निष्पाप असलेल्या ख्रिस्ताने स्वतःच्या शिरावर घेतला; त्यांना पापापासून मुक्त करण्यासाठी त्यांना घडली असती ती न्याय्य, ईश्वरी शिक्षा स्वतः भोगली. सर्व माणसांच्या कल्याणाविषयी अमर्यादित आस्था

('कन्सर्न' हा शब्द क्वेकर्स वापरतात.) असणे, त्यांच्या कल्याणाची अमर्यादित जबाबदारी स्वीकारणे आणि असे करण्यात त्यांच्या योग्यायोग्यतेचा हिशोब न करणे म्हणजे ख्रिस्तासारखे जगणे. सर्व माणसांच्या कल्याणासाठी आस्थेने झटण्याची जबाबदारी ख्रिस्ती माणूस टाळू शकत नाही. 'ज्यांना अधिक लाभलेले असते त्यांच्यापासून अधिकाची अपेक्षा असते.' आपण ईश्वराचे देणे लागलेलो असतो म्हणजे एकमेकांचे देणे लागलेलो असतो; हे देणे कधीच फेडता येत नाही.

## सत्यनिष्ठेसाठी खांबावर जळलेले प्रॉटेस्टंट

कॅथलिक चर्चने सीझरशी तडजोड केली आणि अनेकदा त्याच्यावर कुरघोडीही केली. आत्मा टिकवून धरण्यासाठी म्हणून केलेल्या व्यवहारात अनेकदा आत्मा कदाचित गमावला. पण मूळची सत्यावरील प्रखर नैतिक निष्ठा प्रॉटेस्टंट पंथाच्या रूपाने परत उफाळून आली आणि संपन्न, बलशाली, जीवनाच्या सर्व क्षेत्रांना व्यापून उरलेल्या, ईश्वराच्या चिरंतन सत्तेचे पृथ्वीवरील प्रतीक असलेल्या आणि म्हणून दिव्यत्वाचा वारसा सांगणाऱ्या चर्चची, सत्यधर्मावरील आत्यंतिक एकनिष्ठेमुळे प्रॉटेस्टंटांनी मोडतोड केली. ही मोडतोड करणे आणि आपल्याला गवसलेल्या सत्याच्या आधारावर वैयक्तिक आणि सामुदायिक जीवनाची पुनर्रचना करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले आणि त्यासाठी जबर किंमतही दिली. क्रूसावर यातना भोगत मेलेला ख्रिस्त जर ईश्वराच्या मानवावर असलेल्या प्रेमाचे प्रतीक असेल तर खांबावर जिवंत जळलेले प्रॉटेस्टंट माणसाच्या सत्यावरील निष्ठेचे प्रतीक आहेत. प्रॉटेस्टंटांनी एक गोष्ट इतिहासात स्पष्टपणे दाखवून दिली. परंपरेला अनुसरण्यात प्रामाण्य नाही; परंपरेने प्रामाण्याला अनुसरले पाहिजे. नाहीतर ती परंपरा नष्ट केली पाहिजे.

## रेनेसांकालीन पुनरुत्थान

पण प्रॉटेस्टंटांच्या ह्या नैतिकतेचा उगम धार्मिक श्रद्धेत होता; बौद्धिक दर्शनात नव्हता. ज्या सत्यावर नैतिक जीवनाची उभारणी करायची होती ते मानवी बुद्धीने शोधून काढलेले सत्य नव्हते, तर ईश्वराने अनावृत

केलेले सत्य होते. उलट, रेनेसांच्या वेळी ग्रीक बौद्धिक परंपरा खिश्चन सिद्धांताच्या जोखडाला न जुमानता परत वर उफाळून आली. प्रॉटेस्टंटांना ज्याप्रमाणे मानवी आत्मा आणि ईश्वरी सत्य ह्यांच्यामध्ये चर्चची मध्यस्थी नको होती त्याप्रमाणे ह्या नवीन, ग्रीक संस्कृतीचे वारे प्यालेल्या शास्त्रज्ञांना, शोधकांना मानवी बुद्धी आणि तिच्या कुतुहलाचा विषय जो निसर्ग ह्यांच्यामध्ये कोणताही अडसर नको होता. आध्यात्मिक सृष्टीत प्रवेश करायचा तर तो बालवृत्ती धारण करून करावा लागतो. तसेच लहान मुलाच्या निर्मळ बुद्धीने निसर्गाचे अवलोकन करण्यात, पण आपल्या प्रतिभेने निसर्गाच्या रहस्याचा भेद करण्यात, माणसाच्या बौद्धिक सामर्थ्याचा आणि मानवी स्वातंत्र्याचा उन्मादक प्रत्यय ह्या संशोधकांना येत होता. ह्या उन्मादात नम्रता होती आणि प्रतिभेचा अहंकारही होता. मूळ ग्रीक बौद्धिक परंपरेप्रमाणे हा तिचा नवीन आविष्कारही ॲरिस्टोक्रॅटिक होता.

## आधुनिक विचारवंतांचा उदय

रेनेसांमध्ये पुनरुज्जीवित झालेली बौद्धिक परंपरा आणि प्रॉटेस्टंटांची जाज्वल्य नैतिकता ह्यांच्या मिलाफातून आधुनिक विचारवंतांचा उदय झाला. प्रॉटेस्टंटांची नैतिकता जितकी प्रखर होती तितकीच कर्कश आणि एकांगी होती. ग्रीक बौद्धिक परंपरा आत्मसात केल्यामुळे ती अधिक व्यापक, सुसंस्कृत आणि सौम्य झाली. तिची धग कमी झाली असेल, पण तिचे तेज वाढले. चर्चच्या परंपरेविरुद्ध ज्या आध्यात्मिक स्वातंत्र्याचा पुकारा त्यांनी केला होता त्या स्वातंत्र्याचा बौद्धिक स्वातंत्र्य हा अविभाज्य भाग ठरला. स्वतंत्र बुद्धीने सत्य शोधून काढण्यात माणसाची सार्थकता आहे, सत्य शोधून काढणे ही त्याची जबाबदारी आहे, हे सर्वमान्य झाले. पण त्याबरोबरच सत्याचा मानदंड लावून अनुभवाच्या आणि व्यवहाराच्या सर्व क्षेत्रांची चिकित्सा करणे—केवळ श्रद्धेने स्वीकारलेल्या आध्यात्मिक मतांचीच नव्हे तर नीती, राज्यसंस्था आणि राज्यव्यवहार, आर्थिक व्यवहार, इत्यादी सर्वांची चिकित्सा करणे—आणि मूल्यमापन करणे हासुद्धा ह्या जबाबदारीचा अटळ भाग मानण्यात येऊ लागला. 'चर्चचे म्हणणे मानणार की ईश्वराने बायबलमध्ये सांगितलेले सत्य मानणार'

असा प्रश्न उपस्थित करून प्रॉटेस्टंटांनी बायबलच्या बाजूने कौल दिला होता. पण 'सत्य मानणार की बायबल मानणार' असा प्रश्न उपस्थित करून त्यांच्या वंशजांनी तितक्याच ज्वलंत निष्ठेने सत्याच्या बाजूने कौल दिला. ख्रिश्चन धर्म बुद्धीला विरोधी नाही हे दाखवून देण्याचा प्रयत्न होऊ लागला. ह्याचा अर्थ असा की, तो बुद्धीला विरोधी असेल तर टिकू शकणार नाही हे मान्य होते. शिवाय ह्या बौद्धिक परीक्षणामुळे पारंपारिक सामाजिक संस्थांत जर काही उणिवा, दोष, विकृती आढळल्या तर ह्या संस्थांत आवश्यक ते परिवर्तन घडवून आणायची नैतिक जबाबदारीही विचारवंतांना आता टाळता येण्याजोगी नव्हती.

## प्रसंगी लेखण्या मोडून बंदुकाही !

पारंपारिक श्रद्धेप्रमाणे सुवर्णयुग परंपरेच्या उगमाशी असते; विचारवंतांना मानवी परंपरेची परिणती सुवर्णयुगात होणार हे दृश्य दिसत होते. ह्या सुवर्णयुगाचा आराखडा काढण्याचे काम बुद्धीचे, प्रमाण संकल्पनांचे होते. पण हे युग प्रत्यक्षात उतरवायचे तर सत्याचा, ज्ञानाचा फैलाव समाजात करणे, अंधश्रद्धेवर आणि प्रगतीच्या आड येणाऱ्या स्वार्थावर सतत हल्ले करणे आवश्यक होते. आणि ही विचारवंतांची जबाबदारी होती. सत्य शोधून काढणे हा कित्येक उच्चवर्गीय बुद्धिमंतांच्या प्रतिभेचा केवळ एक विलास नव्हे, सत्य जीवनाचा आधार आहे. प्रॉटेस्टंटांच्या आध्यात्मिक समतेने बौद्धिक समतेचे रूपही स्वीकारले. सत्य सांगितले तर ते कुणालाही समजते आणि पटते. सत्य जाणण्याचा सर्वांना समान अधिकार आहे. आणि सत्य सर्वांना सांगणे ही विचारवंतांची जबाबदारी आहे. सत्याच्या आधारावर जीवनाची पुनर्रचना होण्यात केवळ अज्ञान आणि अंधश्रद्धा ह्यांचाच अडथळा होतो असे नव्हे; अनेकांचे स्वार्थी हितसंबंधही त्याच्या आड येतात. पण चर्चची मोडतोड केली त्याप्रमाणे अंधश्रद्धेवर, संकुचित व समाजविघातक स्वार्थावर आधारलेल्या सामाजिक संस्थांचाही विध्वंस करावा लागेल. 'नो बिशप, नो किंग.' लेखणी शस्त्रासारखी वापरली त्या विचारवंतांना लेखण्या मोडून बंदुकाही हाती घ्याव्या लागल्या. सॉक्रेटिसच्या संगतीने विचारवंत काही काळ अथेन्सच्या बाजारपेठेत सॉक्रेटिसभोवती गर्दी करून थबकले

होते. एऱ्हवी ते लोकांच्या गर्दीपासून दूर, पायथॅगोरसच्या मठात, अॅकेडमीच्या राईत, एपिक्युरच्या बागेत, रोमन सरदारांच्या किंवा रेनेसांकालीन धनिकांच्या प्रासादांत वावरत होते. जेव्हा त्यांनी कॉफी-हाउसमध्ये गर्दी केली आणि अखेरीस बॅरिकेड्‌समागे ठाण मांडून ते लढले तेव्हा विचारवंत म्हणून ते वयात आले.

## विचारवंतांना जाळण्याची परंपरा मेलेली नाही

विचारवंतांचे हे वंशमाहात्म्य सांगायचे कारण असे की, आजच्या नैतिक गोंधळाच्या काळात विचारवंतांची जातकुळी सांगणाऱ्यांना आपल्या जबाबदारीच्या संपूर्ण स्वरूपाचे विस्मरण होणे सहज शक्य आहे. तऱ्हे-वाईक, अनैतिक, समाजाचा बुद्धिभेद करणारी आणि म्हणून समाजाचे नैतिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्य बिघडविणारी मते मांडण्याच्या आरोपा-वरून विचारवंतांना जिवंत जाळण्यासाठी उभारलेले खांब इतिहासात कायमचे गडप झालेले नाहीत. नात्सी जर्मनीत ते परत उभारण्यात आले. पुरोगामी लोकांचा रोष पत्करून का होईना, पण सोव्हिएट रशियात ते उभारण्यात आले असे म्हटले पाहिजे. आणि पुरोगामी लोकांचे समाधान करण्यासाठी म्हणून नव्हे, पण सत्य नमूद करण्यासाठी साक्को वान्झेटीच्या संबंधाने लोकशाही अमेरिकेतही हेच घडले हेही सांगितले पाहिजे. फक्त जाळण्याची पद्धत अमेरिकेला साजेशी अद्ययावत, स्वच्छ आणि जलद होती.

सारेच विचारवंत परिवर्तनवादी असतात असे नव्हे. स्थैर्याचे, परंपरेचे तत्त्वज्ञान स्वीकारणारे, बुद्धीपलिकडे असणाऱ्या श्रद्धेवर, भावनेत वसणाऱ्या शहाणपणावर जीवन आधारू पहाणारे डॉ० जॉन्सन, बर्क, बिशप बटलर यांच्यासारखे विचारवंतही असतात. पण बुद्धिवादाचा प्रवेश सांस्कृतिक जीवनात झाल्यानंतर ह्या श्रद्धेची आवश्यकता आणि तिचे प्रामाण्य बौद्धिक युक्तिवादाच्या साहाय्याने पटवून द्यावे लागते. बौद्धिक रीतीला मर्यादा आहेत हे बौद्धिक रीतीचा उपयोग करून सिद्ध करण्यात येते. बुद्धीवर आधारलेला हा बुद्धिविरोध बुद्धीला मान्य असलेल्या अनेक पर्यायी जीवनपद्धतींतील एक म्हणून इतरांबरोबर नांदू शकेल. परंपरेच्या कोषातून बाहेर पडलेले नसणे आणि बाहेर पडल्यानंतर परंपरेशिवाय तरणोपाय नाही म्हणून डोळसपणे तिचा स्वीकार करणे ह्याच्यात जमीन-

अस्मानाचा फरक आहे; कदाचित जीवन आणि नाटक ह्यांच्यातील फरकाएवढा तो फरक आहे.

## बौद्धिक साधना : ऐहिक 'व्रत'

विचारवंतांच्या जबाबदारीचे संपूर्ण स्वरूप काय? एकतर समाजाच्या बौद्धिक जीवनाचा दर्जा सांभाळणे आणि वाढविणे हे त्यांचे काम आहे. हे व्हायचे असेल तर बौद्धिक साधनेकडे आजच्या निधर्मी युगामध्येसुद्धा एक व्रत म्हणून—एक ऐहिक व्रत म्हणून—पाहिले पाहिजे. ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये यत्किंचितही ढिलाई, कुचराई सहन करता कामा नये. जेथे जिवंत बौद्धिक परंपरा आहे, पूर्वसूरींनी बजावलेल्या मानवी निर्मितिक्षमतेची अत्युच्च शिखरे म्हणून ज्यांच्याकडे बोट दाखविता येईल अशा बौद्धिक कामगिरीचे स्मरण जेथे ताजे आहे, अशा कामगिरीपासून निष्पन्न झालेल्या मानदंडांनी जेथे कुणाचेही बौद्धिक यश मापण्याची प्रथा आहे, ह्या परंपरेतला एक म्हणून उल्लेखिले जाण्यात, इतिहासाच्या एका पृष्ठावरील तळटीपेत का होईना, आपल्या नावाला जागा असण्यात जेथे व्यावसायिक स्वाभिमानाची पूर्तता मानली जाते आणि एवढेही साधण्यासाठी जेथे व्यक्तीला सारी कुवत पणाला लावावी लागते, प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते आणि हे करण्याचे बाळकडू तिला भोवतालच्या वातावरणातून मिळालेले असते, तेथे बौद्धिक जीवनाचा दर्जा नैसर्गिकपणे सांभाळला जातो. बौद्धिक कामगिरीचा दर्जा राखणे हे जिकिरीचे काम आहे. न्यूटन, लायब्निट्झ, रसेल इत्यादी थोडेच प्रतिभावंत असे असतात की, त्यांच्या प्रतिभेच्या लीलेने झालेल्या आविष्कारात बौद्धिक कामगिरीचे आदर्श मूर्त झालेले असतात. इतरांच्या दृष्टीने बौद्धिक जीवन ही कष्टसाध्य तपस्या असते. बौद्धिक परिपूर्तीच्या विशुद्ध आणि उत्कट आनंदाचे कित्येक क्षण तिच्यात असतात; पण ह्या कित्येक क्षणांसाठी कंटाळवाण्या बौद्धिक काबाडकष्टांची किंमत द्यावी लागते. हे कष्ट टाळण्याच्या नैसर्गिक मानवी प्रवृत्तीला रोखणे आवश्यक असते. अनेक सामान्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून पेलून धरलेली परंपरा कित्येक असामान्य प्रतिभावंतांची उत्तुंग कामगिरी शक्य करते. आपल्या व्यावसायिक क्षेत्रातील भरीव आणि टिकाऊ बौद्धिक कामगिरीचे अधिष्ठान असल्याशिवाय विचार-

वंतांना आपल्या व्यापक सामाजिक कामगिरीला हात घालता येणार नाही. कारण, ह्या कामगिरीतून त्यांना स्वतःच्या कर्तृत्वाची ओळख पटते आणि तिच्यातून आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव होते.

## प्राचीन भारतीय परंपरा लुप्त का झाली?

बौद्धिक साधनेविषयीचा पूज्यभाव आणि बौद्धिक साधनेवर आधारलेल्या स्वतःच्या आणि इतरांच्या प्रतिष्ठेची जाणीव, ह्या गोष्टी भारतीय परंपरेतही आढळतात आणि म्हणून भारतीय बौद्धिक परंपरा दर्जेदार होती. परंतु ही बौद्धिक परंपरा एका सामाजिक कोषातच विकसित होत होती हे आपण पाहिले. बौद्धिक संकल्पनांचे प्रामाण्य सार्वत्रिक असले पाहिजे, ते देशकालसापेक्ष असत नाही, ही विमोचक जाणीव ह्या परंपरेत नव्हती. म्हणून, उदाहरणार्थ, अरबी तत्त्वज्ञान आणि विज्ञाने ह्यांच्याशी आणि त्यांच्याद्वारा ग्रीक तत्त्वज्ञान आणि विज्ञाने ह्यांच्याशीही परिचय करून घेण्याची आणि बौद्धिक मुकाबला करण्याची संधी आली असता ब्राह्मण विन्मुख राहिले. दोन भिन्न बौद्धिक परंपरांत संपर्क साधता येत नाही व म्हणून त्यांच्यात संघर्षही होऊ शकत नाही असेच त्यांना वाटत होते. जेव्हा सार्वत्रिक प्रामाण्याचा दावा मांडणाऱ्या विचारावर आधारलेल्या आधुनिक संस्कृतीची लाट त्या देशावर पसरली तेव्हा ही परंपरा वाहूनच गेली. पण जोपर्यंत ती मुळे धरून होती तोपर्यंत ती अत्यंत तेजस्वी होती; व्यक्तींची निष्ठा आकर्षून धरण्याचे सामर्थ्य तिच्यात होते आणि तिच्यात सहभागी होऊ शकणाऱ्यांच्या आणि सबंध समाजाच्या आदराचा ती विषय होती. परंतु स्वतःचे आधुनिक वैचारिक परंपरेत रूपांतर घडवून आणायला ती असमर्थ होती आणि ती लुप्त झाली. उलट, पाश्चात्य बौद्धिक परंपरेने ह्या देशात चांगले मूळ धरले आहे असे अजून म्हणवत नाही. समाजाला पडलेले किंवा त्याला पुढे पडतील असे प्रश्न बौद्धिक पातळीवर सोडवीत आलेल्या आणि समाजाला प्रगतीचे तत्त्व उपलब्ध करून दिलेल्या वैचारिक परंपरेची प्रतिष्ठा आधुनिक भारतीय बौद्धिक परंपरेला अजून लाभलेली नाही. (म्हणून भारतीय विचारवंत किंचित ओशाळवाणे असतात. पंतप्रधानांना सायन्स कॉंग्रेसचे अध्यक्ष करण्यात त्यांना धन्यता वाटते. तत्त्ववेत्त्याला राष्ट्राध्यक्ष व्हायची हौस असते.)

## नैतिक निर्धाराची आवश्यकता

आपली बौद्धिक सचोटी डागाळू न देणे ही विचारवंतांची दुसरी जबाबदारी. पुराव्याची कठोर निःपक्षपाती वृत्तीने छाननी करणे, प्रमाण पुराव्याचा आणि अनुमानांचा पुरेसा पाठिंबा असलेले तेवढेच विधान सत्य म्हणून स्वीकारणे, ज्या विधानाला पुराव्याचा पुरेसा पाठिंबा नसतो ते विधान असिद्ध म्हणून स्पष्टपणे जाहीर करणे आणि पुराव्याविरुद्ध जाणारे विधान असत्य म्हणून त्याज्य ठरविणे आणि ह्या व्यवहारात कुठेही तडजोड न करणे ही बौद्धिक सचोटीची लक्षणे. हे काम सोपे नव्हे. विज्ञानाच्या अंतर्गत व्यवहारात बौद्धिक सचोटीपासून न ढळणे कदाचित तुलनेने सोपे असेल. पण विज्ञानातसुद्धा पंथोपपंथ निर्माण होतात, कित्येक अभ्युपगमांविषयी (हायपोथिसिस), उपपत्तींविषयी वैचारिक पण अशास्त्रीय निष्ठा निर्माण झालेली असते. प्रत्यक्ष डार्विनने असे नमूद केले आहे की, आपल्या लाडक्या अभ्युपगमाला विरोधी ठरतील अशा वस्तुस्थिती (फॅक्ट्स) विसरण्याकडे त्याची प्रवृत्ती होती. पण बौद्धिक सचोटी केवळ वैज्ञानिक व्यवहारापुरती मर्यादित ठेवता येणार नाही आणि ठेवणे इष्टही नाही. धर्म, राजकारण, समाजकारण, कोणत्याही क्षेत्रांतील संकल्पना, विचारप्रणाली पारखून घेताना बौद्धिक सचोटी ढळू देता कामा नये. हे साधणे कठीण असते; कारण, माणूस केवळ बुद्धिशाली प्राणी, प्रेक्षक नसतो; तो भोक्ता आणि म्हणून कर्ताही असतो. त्याच्या इच्छाआकांक्षा, भीती आणि आशा, आवडीनिवडी ह्यांनी त्याची दृष्टी रंजित झालेली असते. त्याला समोर नसलेल्या वस्तू दिसतात आणि असलेल्या वस्तूत नसलेले गुण दिसतात. हे सर्व बाजूला सारून जे समोर आहे ते न्याहाळण्याला आणि जे दिसले ते अळंटळं न करता स्वीकारायला आणि दिसले तेवढेच स्वीकारायला नैतिक निर्धार लागतो.

## निकराचे बौद्धिक संघर्ष : निकोप समाजाचे लक्षण

समाजात नेहमीच काही शिष्टमान्य मते (ऑर्थोडॉक्सी) असतात. ही मतव्यवस्था बुद्धीच्या कसोटीला उतरेल अशी नेहमीच नसते. पण स्थितिप्रियतेमुळे, गतानुगतिकत्वामुळे, प्रचलित सामाजिक संस्थांचा

आणि व्यवहाराचा ती आधार असल्यामुळे ह्या व्यवस्थेशी अनेकांचे हितसंबंध आणि निष्ठा निगडित झालेल्या असतात. तिचे संरक्षण करण्याकडे, आवश्यक असेल तर बौद्धिक शस्त्रांनी तिचा बचाव करून तिचे स्थैर्य राखण्याकडे समाजाची नैसर्गिक प्रवृत्ती असते. पण आपल्याला दिसलेले सत्य ह्या व्यवस्थेला कितीही विरोधी आणि म्हणून कितीही अप्रिय ठरणारे असले तरी निर्भयपणे मांडणे हे विचारवंतांचे काम आहे. ह्या बाबतीत त्यांची भूमिका आत्यंतिक, तडजोड सहन न करणारी असली पाहिजे. शिष्टमान्य संप्रदाय आणि त्यांना धक्का देणारी नवीन सत्ये ह्यांच्यांत निकराचे बौद्धिक संघर्ष होत राहाणे हे समाजाच्या जोमदारपणाचे, वैचारिक जिवंतपणाचे आणि त्याच्या अंगच्या बौद्धिक सचोटीचे लक्षण आहे. जे प्रिय आहे त्याचे सत्यात रूपांतर करण्याची आणि सत्याची प्रियात रूपांतर करण्याची किमया ज्या समाजाला साधली आहे, त्याच्या कल्पकतेकडे आपण चकित होऊन पाहू; पण अशा समाजात सत्याला जागा उरणार नाही. आज समाजातील प्रबळ, सुसंघटित हितसंबंध—उदाहरणार्थ, सरकार, राजकीय पक्ष, कामगारसंघ, वेगवेगळे व्यवसाय, धर्मसंस्था—मतप्रचाराची प्रभावी आणि सर्वगामी साधने वापरू शकतात. अशा वेळी सत्य काय आणि असत्य काय ह्याचा निर्णय देणारे, समाजाच्या सदसद्विवेकबुद्धीचे प्रतिनिधित्व करणारे अनधिकृत पण स्वयंभू अधिकार असलेले न्यायपीठ म्हणून काम करणे ही विचारवंतांची अटळ जबाबदारी आहे. प्राकृतिक (नॅचरल) आणि सामाजिक विज्ञानांपासून उपलब्ध झालेल्या तंत्रज्ञानावर आजचा समाज आधारलेला आहे. आणि म्हणून वरच्या दर्जाचे बौद्धिक शिक्षण घेतलेला आणि तंत्रज्ञ, विशेषज्ञ म्हणून विविध क्षेत्रांत काम करणारा एक फार मोठा वर्ग आधुनिक समाजात असतो. आपल्या क्षेत्रात स्वतःला बंदिस्त करून घेऊन व्यावसायिक कर्तबगारीवर आपला स्वाभिमान आधारण्याचा आणि मग आपला खाजगी फुलबाग फुलविण्यात मग्न होण्याचा मोह ह्या वर्गाला पडणे स्वाभाविक आहे. पण हा मोह टाळणे आणि विचारवंत म्हणून आपली विवक्षित सामाजिक जबाबदारी उचलायला सिद्ध होणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

□

यशवंत दिनकर फडके

# मराठी विचारवंतांची परंपरा काही प्रश्न

भारतातले दुसरे कोणतेही राज्य महाराष्ट्राइतके बुद्धिप्रधान नाही, असे निदान महाराष्ट्रात तरी गृहीत धरले जाते. म्हणूनच महाराष्ट्रात बुद्धी-खेरीज दुसरे काही पिकत नाही असा बोभाटा कानी आला की त्यातील तथ्य पारखून पाहाण्याच्या फंदात मराठी माणूस सहसा पडत नाही. महाराष्ट्र ही लढवय्यांची, त्यागी पुरुषांची व महान विचारवंतांची भूमी आहे, अशी महाराष्ट्राची एक मूर्ती मराठी माणूस मनोमन पूजीत असतो. नजिकच्या भूतकाळात भारताचा इतिहास घडवण्यात व इंग्रजी अमदानीत भारतात वैचारिक जागृती करण्यात महाराष्ट्रातील योद्ध्यांनी, मुत्सद्यांनी व विचारवंतांनी फार मोठा वाटा उचलला आहे हे खरे! त्यामुळेच, राष्ट्रीय स्तरावर सर्व क्षेत्रांत भारताचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींत मराठी भाषिक सदैव अग्रभागी असावेत, ही आपली अपेक्षा मराठी माणसाला वाजवी वाटते. 'महाराष्ट्राला इतिहास आहे; इतरांना भूगोल आहे' असे कोणी म्हटले की टाळ्यांचा कडकडाट करताना, भारतातल्या इतर काही राज्यांना अगर भाषिक गटांना महाराष्ट्रापेक्षाही प्राचीन इतिहास आहे व अभिमान वाटण्याजोग्या व्यक्ती वा प्रसंग यांचा निर्देश तेथील लोकांनाही करता येतो, या वस्तुस्थितीचे मराठी माणसाला भान राहात नाही. बाळशास्त्री जांभेकर किंवा लोकहितवादी यांच्यापासून आंबेडकर

किंवा कोसांबींपर्यंत गेल्या दीडशे वर्षांत महाराष्ट्रात जे विचारवंत होऊन गेले यांच्याविषयी अभिमानाने बोलावेसे वाटले तर ते समजण्यासारखे आहे. पण त्यांच्याविषयी अभिमानाने बोलत असताना राजा राममोहन रॉयपासून ते थेट रवींद्रनाथ टागोर किंवा योगी अरविंदांपर्यंत श्रेष्ठ विचारवंतांची परंपरा बंगालमध्येही निर्माण झाली याचा खरे म्हणजे विसर पडू नये; पण तसा तो पडतो खरा !

**बंगालची आघाडी**

तसे पाहिले तर इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीच्या काळात विचार-मंथनाला प्रारंभ झाला तो प्रथमच बंगालमध्ये ! नवविचारांच्या लाटेने बंगालला जसा स्पर्श केला तसा नंतर महाराष्ट्रालाही स्पर्श केला. बाळशास्त्री जांभेकर यांनी अव्वल इंग्रजीत जे वृत्तपत्र काढले त्याचे नाव बंगालमधल्या एका वृत्तपत्राच्या नावाशी मिळतेजुळते असणे, हा केवळ योगायोग नव्हता; निदान आरंभीच्या काळात तरी बंगालने महाराष्ट्राला प्रेरणा दिली. पुनर्विवाहासंबंधी ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा मराठी अनुवाद विष्णुशास्त्री पंडितांनी महाराष्ट्रात प्रसिद्ध केला होता हेही लक्षात घेण्यासारखे आहे. इंग्रजी राजवटीच्या अगदी आरंभीच्या काळात महाराष्ट्राच्या मानाने बंगाल बराच आघाडीला होता. पुढे रानडे-टिळकांच्या काळात भारताचे वैचारिक नेतृत्व महाराष्ट्राकडे आले असले तरी त्याच काळातील बंकिमचंद्र किंवा शिशिरकुमार घोष यांच्या-सारखे बंगालमधले विचारवंत अगदीच उपेक्षणीय होते असे समजण्याचे कारण नाही. जांभेकर, लोकहितवादी, फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, रानडे, आगरकर, टिळक, गोखले, राजवाडे, केतकर, आंबेडकर, जावडेकर व कोसांबी अशी श्रेष्ठ विचारवंतांची एक अखंड व उज्ज्वल परंपरा जशी महाराष्ट्रात निर्माण झाली तशीच राजा राममोहन रॉय, अक्षयकुमार दत्त, द्वारकानाथ विद्याभूषण, विवेकानंद, बंकिमचंद्र, शिशिरकुमार घोष, रवींद्रनाथ टागोर व अरविंद घोष यांसारख्या श्रेष्ठ विचारवंतांची अखंड व उज्ज्वल परंपरा भावनाप्रधान समजल्या गेलेल्या बंगालमध्येही निर्माण झाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ....७३६७३.... दि: ....१७/५/९४....

....१८७०.... नोंद दि: ....२-३-६९....

## कोल्हटकर व राजवाडे यांचे परखड आढावे

तुलनाच करावयाची झाल्यास महाराष्ट्रापेक्षा बंगाल निदान एका बाबतीत तरी सरस ठरतो. विज्ञानाच्या क्षेत्रात जगदीशचंद्र बोस, आचार्य प्रफुल्लचंद्र रे, मेघनाथ साहा अशी शास्त्रज्ञांची एक उज्ज्वल परंपरा बंगालमध्ये निर्माण झाली. याउलट गणिती म्हणून नाव मिळवणारी कोसांबी किंवा नारळीकर यांच्यासारखी मूठभर मराठी माणसे सोडली तर विज्ञानाच्या क्षेत्रात मराठी माणसाने उल्लेखनीय भर घातली आहे, असा दावा कडव्या महाराष्ट्राभिमान्यालाही करता येणार नाही. जवळजवळ पन्नास वर्षांपूर्वी विविधज्ञानविस्ताराच्या पन्नाशीच्या वाढदिवसानिमित्त, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी 'पन्नास वर्षांपूर्वींचें व आतांचें महाराष्ट्र' या शीर्षकाचा एक लेख लिहिला होता. त्यात "कलांतल्याप्रमाणें शास्त्रीय शोधांत महाराष्ट्र अजून बंगालच्या फारच मागें आहे" व महाराष्ट्रात "नवें शास्त्रीय प्रमेय शोधून काढणारा एकही झाला नाहीं" अशी कोल्हटकरांनी मनमोकळी कबुली दिली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे. पेशवाईची अखेर झाल्यानंतरच्या जवळजवळ शंभर वर्षांतल्या महाराष्ट्रातल्या बुद्धिमान, प्रतिभावान व कर्त्या लोकांची मोजदाद करण्याचा इतिहासाचार्य राजवाड्यांनी एकदा प्रयत्न केला होता. "गणित, काव्येतिहासशोध व वेदांत या तीन शास्त्रीय हालचाली आपण चालवल्या आहेत. त्याचप्रमाणें मुत्सद्देगिरी, कल्पितकथा, समाजसेवा, उपयुक्त ग्रंथकर्तृत्व, वर्तमानपत्रकर्तृत्व व नाटककर्तृत्व अशा सहा व्यावहारिक हालचाली आपण चालविलेल्या आहेत" असे राजवाड्यांना पाहणीअंती आढळून आले. भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, समाजशास्त्र, इतिहासशोध, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, वगैरे एकोणीस मुख्य ज्ञानशाखांची यादी देऊन, आपला एकही शोधक प्रतिनिधी तेथे कसा नाही व बाकी राहिलेल्या शेकडो तात्त्विक व व्यावहारिक हालचालींचा पत्ताही आपल्या समाजाला नाही, या विदारक वस्तुस्थितीची तेव्हा राजवाड्यांनी फटकळपणे जाणीव करून दिली होती. कोल्हटकर किंवा राजवाडे यांनी सुमारे पन्नास वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेताना महाराष्ट्राच्या ज्या उणिवा दाखवल्या होत्या त्या गेल्या पन्नास वर्षांनंतरही बऱ्याच अंशी कायमच

राहिल्या आहेत, असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही. महाराष्ट्र हा बुद्धिप्रधान देश आहे असा डौल मिरवताना, महाराष्ट्रातील बुद्धिवंतांची कुवत व कस किती आहे याचे सतत अवधान राखलेले बरे !

## महाराष्ट्र विज्ञानात मागे का ?

विशेषतः विज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्राने नजरेत भरण्याजोगी अशी कामगिरी का केली नाही याची कारणमीमांसा करण्याचे प्रयत्नही झाले आहेत. "महाराष्ट्रीय विद्वानांचीं डोकीं बहुधा आपल्या जुन्या संस्कृती-संबंधानें शोध लावण्यांत किंवा राजकीय सुधारणेंत गुंतलेलीं आहेत," असे स्पष्टीकरण कोल्हटकरांनी दिले आहे. पण त्याने समाधान होत नाही. कारण कोल्हटकरांनी प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे म्हणून प्रश्नच पुन्हा वेगळ्या शब्दांत मांडला आहे. श्री० दि० के० वेडेकरांनी महाराष्ट्रातल्या बुद्धिजीवी वर्गाविषयी लिहिताना याच उणिवेवर बोट ठेवून चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील बुद्धिजीवी वर्गाचा इंग्रजांशी जो काही काळ संबंध आला त्या काळात महाराष्ट्रातील बुद्धिजीवी वर्गाचा पाश्चिमात्यांच्या विज्ञानाशी, तंत्रविद्येशी किंवा सांस्कृतिक मूल्यांशी पुरेसा परिचय झालेला नव्हता; याउलट ज्या एकाग्रतेने आचार्य प्रफुल्लचंद्र रे किंवा जगदीशचंद्र बोस यांनी विज्ञानक्षेत्राला वाहून घेतले ती सारी पाश्चिमात्यांबरोबरच्या दीर्घकाळच्या सहवासाची परिणती होती असे वेडेकरांना वाटते. कारणे काहीही असोत, विज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्राने नाव घेण्याजोगी कामगिरी बजावलेली नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

या ठिकाणी एक गोष्ट मात्र स्पष्ट करावयास हवी. आपल्या आवडीच्या एखाद्या शास्त्रात रमलेला व प्रयोगशाळेत स्वतःस अक्षरशः कोंडून घेऊन सृष्टीतील घडामोडींचा ज्यामुळे उलगडा होईल अशी प्रमेये शोधून काढणारा एखादा अव्वल दर्जाचा शास्त्रज्ञ हा विचारवंत असेलच असे नाही. तो समाजाभिमुख नसण्याचीही शक्यता आहे. आपल्या संशोधनाचा एकूण समाजावर काय परिणाम होतो हे जाणून घेण्याचा तो प्रयत्न करीत असेलच, असे निश्चित सांगता येणे कठीण असते. म्हणूनच बंगालप्रमाणे महाराष्ट्रातील बुद्धिजीवी वर्गात शास्त्रज्ञ निर्माण झाले नाहीत या तक्रा-

रीचा अर्थ एवढाच की, शास्त्रीय शोध लावण्यात गुंतलेल्या लोकांच्या समाजात विचारवंतांना झपाट्याने बदलत चाललेल्या विज्ञानाच्या व तंत्रविद्येच्या समाजावरील परिणामांचे स्वरूप समजावून घेण्यासाठी शास्त्रज्ञांशी जसा सहजासहजी संपर्क साधता येतो, विचारांची देवाणघेवाण करता येते, तशी शास्त्रज्ञांची परंपरा नसलेल्या समाजात शक्यता नसते.

## सगळे बुद्धिजीवी 'विचारवंत' नसतात

शास्त्रज्ञाप्रमाणेच एखाद्या ज्ञानशाखेतील तज्ञ किंवा आवतीभोवतीच्या जगाला माया समजून, या मायेच्या खेळाविषयी मौन धारण करून आपल्याला झालेल्या ब्रह्मसाक्षात्कारामुळे स्वतःवरच खूष असलेला एखादा आत्मसंतुष्ट संन्यासी, हे आपापल्या परीने थोर असले तरी त्यांचा विचारवंतांमध्ये समावेश करता येणार नाही. खरे म्हणजे विचारवंत बहुधा बुद्धिजीवी वर्गात निर्माण झालेले व तेथे वावरताना दिसले तरी त्यामुळे सर्व बुद्धिजीवी माणसे विचारवंत असतात असे समजण्याचे कारण नाही. पेशाने वकील, डॉक्टर, इंजिनियर असलेले लोक किंवा खाजगी अगर सरकारी क्षेत्रांत वरिष्ठ अधिकारपदे भूषविणारे लोक हे बुद्धिजीवी असले तरी त्यांची विचारवंतांमध्ये गणना करता येणार नाही. त्याचप्रमाणे महाविद्यालये किंवा विद्यापीठांत उदरनिर्वाहासाठी पाट्या टाकण्याच्या वृत्तीने काम करणारे व एरवी वाचन, चिंतन वगैरे भानगडीत न पडणारे प्राध्यापक अगर लोकशिक्षणापेक्षा लोकानुरंजनासाठी रकाने भरणारे धंदेवाईक पत्रकार यांचा समावेश बुद्धिजीवी माणसांमध्ये करता आला तरी त्यांना विचारवंत म्हणता येणार नाही. आपण निवडलेल्या एखाद्या व्यवसायाखेरीज किंवा क्षेत्राखेरीज समाजाच्या इतर अंगांचेही भान असलेला व समाजात प्रत्यही घडणाऱ्या घटनांचा गुंता उकलून, त्यामागील सत्य समजावून घेऊन, ते आपल्याला जसे कळले तसे इतरांना सतत समजावून सांगण्याचा प्रयत्न करणारा माणूस विचारवंत होऊ शकतो. त्यासाठी त्याने ग्रंथरचना केली पाहिजे किंवा वृत्तपत्रे अगर मासिके यांतून सतत लेखन केले असले पाहिजे असे नाही. आपल्या विचारांचा ठेवा ग्रंथ किंवा लेखरूपाने ठेवणाऱ्या माणसाच्या विचारांचा फायदा पुढच्या पिढ्यांनाही मिळू शकतो. याउलट, व्यासपीठा-

सारख्या साधनाचा प्रभावी उपयोग करून वर्षानुवर्षे आपल्या मनातील विचार, समाजास रुचोत किंवा न रुचोत, मोकळेपणाने व्यक्त करणाऱ्या माणसालाही विचारवंत म्हणता येईल. मात्र अशा लोकांचे विचार ऐकणाऱ्यांच्या मनावर संस्कार घडवीत असले तरी नंतर वाऱ्यावर विरून जात असल्यामुळे दीर्घकाल त्यांचा प्रभाव पडू शकत नाही.

## टिळक-आगरकरांची मीमांसा

आपल्याकडील विचारवंतांची व पाश्चिमात्य देशांतील विचारवंतांची तुलना केल्यास कोणाच्याही लक्षात येणारा आपला खुजेपणा महाराष्ट्रातील विचारवंतांना बोचला नव्हता असे नाही. त्यामुळेच पाश्चिमात्यांनी केलेल्या प्रगतीने दिपून गेलेल्या अव्वल इंग्रजीतल्या विचारवंतांच्या पहिल्या पिढीने आपल्या समाजात विद्येची मक्तेदारी भोगणाऱ्या ब्राह्मणवर्गावर कडाडून टीका केली. प्राचीन काळात भारतीयांनी गाजवलेल्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगणाऱ्या लोकमान्य टिळकांसारख्या विचारवंतांनाही आधुनिक काळातील आपल्याकडील विचारवंतांचा उणेपणा मान्य होता. १८९६ साली केसरीत लिहिलेल्या एका लेखात लोकमान्यांनी सवाल विचारला होता, "मुंबई युनिव्हर्सिटी १८५७ सालात स्थापन झाली. पण तेव्हांपासून आतांपर्यंत सुमारें चाळीस वर्षांत या संस्थेतून एकही जगप्रसिद्ध विद्वान निघू नये हें आश्चर्य नव्हे काय?" कोणत्याही शास्त्राचा अथवा विद्येचा शोधक बुद्धीने आस्थापूर्वक अभ्यास करणारे गृहस्थ आमच्या देशात अलीकडे का पैदा होत नाहीत, याची कारणमीमांसा लोकमान्यांनी अनेक प्रसंगांच्या निमित्ताने केलेली दिसते. "या देशांत पाणिनी, कणाद, शंकराचार्य वगैरे विद्वान निपजत नाहींत" याचे मुख्य कारण म्हणजे देशाचे पारतंत्र्य अशी लोकमान्य टिळकांची समजूत होती असे दिसते. 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या प्रि० महादेव शिवराम गोळे यांच्या ग्रंथासंबंधी सात लेख लिहून लोकमान्यांनी त्या ग्रंथाचे परीक्षण केले होते; त्यात व विद्यापीठाचा कारभार अगर भाषेची वाढ यांसारख्या प्रश्नांवरील त्यांच्या लेखांवरून स्वराज्य मिळेपर्यंत "युनिव्ह-र्सिट्या म्हणजे कनिष्ठ प्रतीच्या सरकारी नोकऱ्यांकरितां लागणारे उमेदवार तयार करणाऱ्या टांकसाळी किंवा हमालखानेच राहणार" असे टिळक

मानीत असल्याचे दिसते. देश स्वतंत्र झाला की स्वतंत्र विचारास वाव मिळेल असा टिळकांचा होरा होता. "मराठींत चांगले ग्रंथ कां होत नाहींत?" हे शीर्षक असलेल्या लेखाच्या अखेरीस आगरकरांनी जे प्रश्न विचारले आहेत त्यांचा रोखही असाच आहे. "एलिझाबेथ राणीनंतर इंग्लंडांत जसा ग्रंथविस्तार झाला तसा पूर्वी कां झाला नाहीं? रोमन लोकांनीं ग्रीक लोकांस पादाक्रांत केल्यावर सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांसारखे पुरुष त्यांमध्ये निर्माण कां झाले नाहींत?...स्वतंत्र राष्ट्रांचीं चिन्हें काय व महाराष्ट्र देशांत तीं आहेत किंवा नाहींत? जो या प्रश्नांचीं उत्तरें बरोबर देऊं शकेल त्याला महाराष्ट्र देशांत चांगले ग्रंथ कां होऊं शकत नाहींत" हे समजेल असे आगरकरांचेही मत होते. भारतीयांच्या बौद्धिक मागासलेपणाची व वैचारिक थिटेपणाची ही मीमांसा महाराष्ट्रात मान्य केली गेली व स्वातंत्र्य मिळवण्याच्या प्रयत्नावरच लक्ष केंद्रित केले गेले.

## स्वातंत्र्य आणि विचारसृष्टीचा विकास

पारतंत्र्याच्या काळात आपल्या मागासलेपणाचे खापर परकीय राज्यकर्त्यांच्या माथी मारून मोकळे होण्याची एक मोठी सोय होती; पण देश राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाल्यावर दुर्दैवाने ही सोय उरलेली नाही. एखादा देश राजकीय दृष्ट्या स्वतंत्र असल्यामुळे स्वतंत्र विचारांची वाढ होण्यास पोषक वातावरण तेथे निर्माण करता येण्याची शक्यता जास्त असते, एवढे फार झाले तर म्हणता येईल; पण त्याचा अर्थ असा नव्हे की, स्वतंत्र देशात असे वातावरण असतेच. एखाद्या स्वतंत्र देशात एखाद्या धर्मपंथाचा जबरदस्त पगडा असल्यामुळे विचारवंतांचा कोंडमारा होऊ शकेल किंवा एखाद्या स्वतंत्र देशातील सत्ताधाऱ्यांनी एखाद्या सर्वंकष विचारसरणीचे वाण घेतले असल्यामुळेही विचारवंतांची नाकेबंदी होऊ शकेल. खेरीज सत्ता केवळ स्वकीयांच्या हाती आल्यामुळे स्वतंत्र विचारांची वाढ झाली असती तर ती महाराष्ट्रात शिवाजीच्या काळापासून पेशवाईच्या अखेरपर्यंतच्या काळातही व्हावयास हरकत नव्हती. इंग्रजी राजवटीतही महाराष्ट्रात जे विचारवंत निर्माण झाले ते बहुतेक सर्वजण देशी संस्थानिकांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशात निर्माण झाले नाहीत तर सरळसरळ इंग्रज अधिकाऱ्यांच्या अंमलाखाली असलेल्या प्रदेशांतच

निर्माण झाले होते, हे लक्षात घेण्यासारखे आहे. निजाम किंवा भोसले अगर पटवर्धन या देशी संस्थानिकांच्या राज्यांतले वातावरण सरळसरळ ब्रिटिश अमलाखालच्या प्रदेशातल्या वातावरणाइतकेही विचारवंतांना अनुकूल नव्हते, म्हणून महाराष्ट्रातल्या विचारवंतांची नावे घेताना निजामी राजवटीखाली भरडला गेलेला मराठवाडा किंवा वऱ्हाड अगर भोसल्यांच्या छत्राखालचा नागपूर भाग या मराठी मुलखात विचारवंतांची फार मोठी परंपरा निर्माण झाल्याचे दृश्य दिसत नाही. कोल्हापूरचे भोसले सांगली-मिरजेचे पटवर्धन वगैरेंच्या राज्यांचीही तीच तऱ्हा होती. रानडे, गोखले यांच्यासारख्या विचारवंतांचा बालपणीचा काळ संस्थानी मुलुखात गेला असला तरी ते आयुष्यभर संस्थानी मुलुखात राहिले असते तर त्यांचे काय झाले असते याची कोणालाही कल्पना करण्यासारखी आहे.

## धर्मकल्पनांमुळे पडणाऱ्या मर्यादा

केवळ महाराष्ट्रातच नाही तर सर्व भारतातच सर्जनशील विचार कित्येक शतके वाढू शकला नाही व आपल्याकडील विचारवंत पाश्चिमात्य देशांतील विचारवंतांइतक्या उंचीवर जाऊ शकले नाहीत किंवा झेप घेऊ शकले नाहीत, या परिस्थितीला भारताची पराधीनता जबाबदार होती म्हणण्यापेक्षा धर्मकल्पनांच्या मगरमिठीत सापडलेला परंपरानिष्ठ भारतीय समाजच कारणीभूत होता असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. 'राजकीय आधुनिकीकरण व विचारवंत' या शीर्षकाच्या आपल्या लेखात प्रा० रॉबर्ट स्कॅलापिनो यांनी परंपरानिष्ठ समाजातील विचारवंतांच्या भूमिके-संबंधी जी मते व्यक्त केली आहेत ती या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहेत. धर्मकल्पनांचा जबरदस्त पगडा असलेल्या परंपरानिष्ठ समाजातील विचारवंत त्या समाजाने पवित्र मानलेल्या धर्मग्रंथांचे संरक्षक व भाष्यकार असतात. आपण बदल घडवण्याची सूचना करीत आहोत असा समज होऊ नये म्हणून हे लोक शास्त्रवचनाचा आधार घेऊनच नेहमी बोलत असतात. परंपरानिष्ठ समाजातील विचारवंत हा सर्जनशील असतो असे म्हणण्यापेक्षा तो रूढ विचारांचे जतन करून ते विचार पुढल्या पिढ्यांच्या हाती देणारा भाष्यकार असतो, असे प्रा० स्कॅलापिनोंना वाटते. भारतातील विचारवंतांनी शतकानुशतके बजावलेली भूमिका यापेक्षा फार वेगळी

होती असे म्हणता येणार नाही. धर्मग्रंथांचा पांगुळगाडा घेतल्याशिवाय भारतातील विचार पुढे कधीच सरकू शकला नाही. त्यामुळेच वेदशास्त्रे मुखोद्गत असलेला पंडित हा विचारवंत मानला गेला. धर्मकल्पनांच्या पकडीमुळे सर्जनशील विचार गुदमरला किंवा आडवळणाने, आडमार्गाने चोरट्यासारखा वावरला. आपल्याच कोशात कोंडल्या गेलेल्या भारतीय विचारवंतांना इंग्रजी राजवटीमुळे प्रथमच जबरदस्त आव्हान मिळाले. पवित्र मानल्या गेलेल्या धर्मग्रंथांचा किंवा प्रस्थापित धर्मविषयक समजुतींचा चिकित्सकपणे विचार करून त्या समजुती बुद्धीच्या निकषावर घासूनपुसून स्वीकारल्या किंवा टाकल्या जाऊ लागल्या. आतापर्यंत धर्मग्रंथांचा अन्वयार्थ लावण्यात मशगूल असलेल्या विचारवंतांना, धर्मग्रंथही कालसापेक्ष असतात याची जाणीव झाली. मात्र उदारमतवादी बुद्धिप्रामाण्यवादाचे हे वादळ काही काळ आलेले दिसले तरी ते फार जोरदार नसल्यामुळे लवकर ओसरले. चिवट मुळे असलेला परंपरानिष्ठ समाज त्यामुळे काही काळ हलल्यासारखा दिसला तरी मुळासकट उखडला गेला नाही किंवा वाकलाही नाही.

## जातिव्यवस्थेचा जाच

धर्मकल्पनांच्या जाचाप्रमाणेच जातिव्यवस्थेचा जाचही सर्जनशील विचाराला मारक ठरला. जातीवर आधारलेल्या भारतातील समाजात ब्राह्मणासारख्या जातीवर विचार जोपासण्याची जबाबदारी टाकली गेली होती. त्यांनी ही जबाबदारी नेहमीच पार पाडली असे नाही. उलट विद्येची उपासना करण्याचे आपले आद्य कर्तव्य सोडून सत्तेच्या खेळा-तही जमेल तेव्हा त्यांनी भाग घेतला. विद्या व शक्य झाले तेव्हा सत्ता आपल्या हाती केंद्रित करून समाजातील इतर घटकांना या गोष्टीपासून वंचित करण्याचे प्रयत्न केले गेल्याने या जातीतून उदयास आलेल्या विचारवंतांबद्दलही आज समाजाच्या काही थरांत तरी शत्रुत्वाची भावना दिसते. महाराष्ट्रातील विचारवंतांची परंपरा लक्षात घेतली तरी फुले किंवा आंबेडकर असे अपवाद वगळता ती मुख्यतः व मूलतः ब्राह्मणी परंपराच राहिली आहे. (ब्राह्मणेतरांपैकी फुल्यांच्यासारख्या एखाद्याने नवे विचार आपल्या रीतीने मांडण्याचा प्रयत्न केला तरीही अगदी अलि-

कडच्या काळापर्यंत त्यांची विचारवंत म्हणून गणना केली जात नसे. पेशवाईची अखेर झाल्यापासूनच्या जवळजवळ शंभर वर्षांच्या काळात महाराष्ट्रात होऊन गेलेल्या सुमारे दीडशे बुद्धिमान प्रतिभावान व कर्त्या पुरुषांच्या यादीत राजवाड्यांनी ज्योतिबा फुल्यांचा उल्लेखही केला नाही हे अर्थपूर्ण आहे.) ही स्थिती ज्ञानाचे दरवाजे समाजातील सर्व थरांना खुले झाल्यावर देखील राहू नये; पण महाराष्ट्रात तरी तशी ती या घटकेला आहे. कदाचित नजिकच्या भविष्यकाळात ती बदलेल, पण तोपर्यंत महाराष्ट्रातील विचारवंतांना तरी त्यांनी ज्या जातीत जन्म घेतला ती बाधणारच असे दिसते. जातीवर, आधारलेल्या समाजात जातीचे भांडवल करून सत्ता बळकावणाऱ्या मंडळींना न रुचणारा एखादा विचार मांडणारा विचारवंत ब्राह्मणजातीत जन्माला आला असल्याचा शोध तत्काळ लावला जातो व लोकशाहीत सत्तेला पारख्या झालेल्या अल्पसंख्य ब्राह्मणांपैकी तो एक असल्यामुळे वैफल्यग्रस्त होऊन असे विचार व्यक्त करीत आहे, असे रोगनिदानही केले जाते.

## समाजपरिवर्तनासाठी निर्भयता हवी

इंग्रजी राजवटीत महाराष्ट्रात होऊन गेलेले विचारवंत पाश्चिमात्य विचारवंतांच्या तोलामोलाचे नसले तरी त्यांनी एक फार मोठे कार्य केले आहे. विचारक्रांतीची माध्यमे त्यांनी निर्माण केली व त्यासाठी आवश्यक त्या संस्थांचे जाळे त्यांनी विणले. महाराष्ट्रात चिपळूणकर, टिळक, आगरकरांसारख्या मोठ्या विचारवंतांनी शाळा काढल्या, विद्यालये काढली, वृत्तपत्रे चालवली. लोकहितवादींसारख्यांनी ग्रंथालये स्थापन करून ग्रंथप्रसारास उत्तेजन दिले. महाराष्ट्रातील विचारवंतांनी निरनिराळ्या संस्थांचा कारभार चालवला. व्यासपीठाला प्रतिष्ठा मिळवून दिली. विचारवंताला कोणत्याही समाजात जी संपर्कक्षेत्रे उपलब्ध असावयास हवीत ती उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्रातील विचारवंतांनी आपल्या आयुष्यातील उमेदीचा काळ घालवला. त्यांचे हे ऋण मोठे आहे. कारण त्यामुळेच विचारवंतांना समाजातल्या इतर थरांबरोबर आज नाते जोडता येते. मात्र स्वातंत्र्यपूर्वकाळापेक्षा आज विचार व्यक्त करण्याची अधिक साधने उपलब्ध असली किंवा तशी संधी सहजासहजी मिळत असली तरी

त्या काळाच्या मानाने विचारवंतांचे काम अधिक कठीण झाले आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात परकीयांविरुद्ध झगडणे हे एका अर्थाने सोपे होते. पण स्वातंत्र्योत्तर काळात परिवर्तनाला अडथळा आणू पाहाणाऱ्या स्वकीयांविरुद्ध विचारवंतांना आवाज उठवावयाचा आहे. विचारवंतांवर अनुग्रह करून त्यांना विकत घेण्याची अनेक तंत्रे आता स्वकीय सत्ताधीशांना अवगत झालेली आहेत. तशात महाराष्ट्रातील बहुसंख्य विचारवंतांना निदान आजतरी एका विशिष्ट जातीत जन्म घेतल्याचा कलंक लागलेला आहे. अशा परिस्थितीत कोणाविषयी भय न बाळगता किंवा कोणाच्या मेहेरबानीची अपेक्षा न करता बुद्धीची कसोटी लावून आपल्याला पटेल ते बोलणे व लिहिणे हे वाटते तितके सोपे काम राहिलेले नाही. त्यासाठी लोकांच्या रोषाची किंवा त्यांच्याकडून होणाऱ्या छळाची पर्वा न करता निर्भयपणाने विचार व्यक्त करणारे आगरकर व र० धों० कर्वे यांच्याकडून किंवा विक्षिप्त म्हणून हेटाळणी होत असतानाही अंगीकृत कार्य तडीस नेणाऱ्या राजवाडे, केतकर यांच्यासारख्या विचारवंतांपासून प्रेरणा मिळण्यासारखी आहे.

□

राम जोशी

# ज्ञानपीठांमध्ये मराठी विचारवंत

समाजाच्या भौतिक तसेच सांस्कृतिक उत्कर्षाचे सर्वांत महत्त्वाचे साधन ज्ञान हे आहे. निसर्गाच्या आणि समाजाच्या स्थितिगतीचे नियम शोधून काढून त्यांच्या आधारे परिवर्तनाची योग्य दिशा कोणती ते सूचित करणे, सृष्टीतील अनाकलनीय रहस्यांची उकल करू शकेल व मानवाला निसर्गावर विजय मिळवून देईल असे विज्ञान व वैज्ञानिक दृष्टी समाजाला देणे, आणि व्यक्ती व समूह यांच्या अन्योन्यसंबंधांना बुद्धिवादी व शास्त्रीय अधिष्ठान देऊन व्यक्ती अधिक समाजाभिमुख व सामाजिक आदर्श अधिक मानवतावादी बनविणे हे ज्ञानाचे कार्य आहे. सारांश, सत्यान्वेषण हा ज्ञानसाधनेचा हेतू आहे. या साधनेच्या मार्गाने प्रतीत होणारे सत्य जरी कालसापेक्ष असले व मानवाच्या ज्ञानात नवी भर पडत जाईल तसतसे बदलत जाणारे असले तरी त्या त्या काळापुरते तेच सत्य असल्यामुळे त्यावर विचारवंताची श्रद्धा असणे आवश्यक आहे. खरे विचारवंत सत्य हे मूल्य म्हणून मानतात ते याच अर्थाने. अमूक एक गोष्ट तेवढी सत्य व बाकीचे सारे असत्य असा या मूल्याचा अर्थ नव्हे. उलट, आजवर सत्य मानलेली गोष्ट कालांतराने चुकीची असे सिद्ध झाले तर त्यालाही मान्यता देणे व आपली बौद्धिक किंवा सैद्धांतिक प्रमेये बदलून नव्या प्रमेयांच्या साहाय्याने सत्याचा शोध अखंड चालू ठेवणे व

स्वतःच्या आणि समाजाच्या जीवनात सत्याचे प्रतिबिंब पडत राहील याची काळजी वाहाणे हे विचारवंताचे काम आहे. 'सामाजिक जबाबदारी' या शब्दांचा हाच अर्थ आहे. सामाजिक परिवर्तनाची धुरा आपल्या खांद्यावर घ्यावयास तो काही कृतिशील नेता नव्हे. पण नैसर्गिक, ऐतिहासिक वा सामाजिक घडामोडींचे विश्लेषण करीत असता योग्य किंवा न्याय्य तत्त्व कोणते व विद्यमान समाजाने कशा रीतीने परिवर्तित झाले पाहिजे की ज्यामुळे तो अधिक योग्य किंवा न्याय्य बनेल, याचा विचार हा सत्याच्या शोधाचाच भाग आहे व तो करणे हे विचारवंताचे कर्तव्य आहे. विचारवंत म्हणून त्याने स्वीकारलेल्या भूमिकेचा तो अपरिहार्य सामाजिक आशय आहे. स्वतःला प्रतीत झालेल्या सत्याचे स्पष्टीकरण करून समाजाला त्याची जाणीव देणे, समाजाकडून त्याचा स्वीकार होईल याबद्दल आग्रही असणे, व अशा स्वीकाराच्या आड येणाऱ्या घटनांची, संस्थांची व प्रवृत्तींची कठोर टीका करून समाजप्रबोधन करणे हे विचारवंताचे सामाजिक कार्य आहे. समाजातील दुसरा कोणताही वर्ग सत्य हे मूल्य मानून त्याच्याशी प्रामाणिक राहाण्याविषयी असा आग्रही असत नाही. म्हणून हे कठीण काम विचारवंतांनाच केले पाहिजे.

## दोन एकांतिक दृष्टिकोण

हे इतके निक्षून सांगण्याचे कारण असे की, विचारवंताच्या भूमिकेबद्दल दोन परस्परविरोधी दृष्टिकोण प्रसृत आहेत. एक दृष्टिकोण असा की, ज्ञानसाधनेत रमून जाणे, स्वतःला व समाजाला विसरून जाणे, हस्तिदंती मनोऱ्यात स्वतःला कोंडून घेऊन विचारविश्वात गढून जाणे एवढेच विचारवंताचे काम आहे; याहून आणखी काही सामाजिक ऋण त्याच्यावर नाही. याच्या अगदी विरुद्ध दृष्टिकोण म्हणजे समाजपरिवर्तनाच्या अग्रस्थानी विचारवंताने सतत राहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या विचारांचा खरेखोटेपणा कृतीच्या द्वारे त्याने सिद्ध केला पाहिजे. कोणत्या तरी तात्त्विक, आर्थिक किंवा राजकीय तत्त्वप्रणालीच्या अनुषंगाने होणाऱ्या सामाजिक आंदोलनाचे त्याने धुरीणत्व केले पाहिजे. 'जगाची उपपत्ती सांगण्यात बुद्धी खर्च करण्याऐवजी जग बदलण्याचे कामी ती लावली पाहिजे' या सुप्रसिद्ध वचनावर आधारलेला हा दृष्टिकोण आहे. हे दोन्ही

दृष्टिकोण एकांगी आहेत. एकामध्ये सामाजिक जबाबदारी अमान्य केलेली आहे; दुसऱ्यात वैचारिक कार्य गौण मानण्यात आले आहे : समाज-परिवर्तनाचे साधन एवढेच विचारांचे, ज्ञानाचे मूल्य समजण्यात आले आहे. साध्य म्हणून त्याला असलेले स्वतंत्र मूल्य या दृष्टिकोणात अमान्य आहे. या दोन्ही अग्राह्य दृष्टिकोणांचा आपल्याकडे असा परिणाम झाला आहे की, एक तर समाजपरिवर्तनाच्या कोणत्याही कार्यापासून अलिप्तता राखण्यात विचारवंत धन्यता मानतात व अलिप्तता न राखणाऱ्यांबद्दल तुच्छता दर्शवितात; नाही तर सामाजिक आंदोलनातील सामान्य शिपाई बनून स्वतःला संस्थात्मक शिस्तीने आणि व्यावहारिक तडजोडीच्या गरजांनी बांधून घेतात. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील विचारवंतांनी आपली कामगिरी बजावली नाही, असा आरोप जो त्यांच्यावर करण्यात येतो त्याचा मथितार्थ हाच की, एक तर सगळी गंगा अंगावरून वाहून गेली तरी ते कोरडे राहिले किंवा प्रवाहपतित होऊन गटांगळ्या खात खात वाहात गेले.

## समाजव्यवहाराचे विश्लेषण व ज्ञानपीठे

विचारवंतांचे समाजातील स्थान हे मार्गदर्शक ताऱ्यांसारखे आहे. अविकसित समाजात तर त्यांना अनन्यसाधारण महत्त्व असते; निदान असावयास पाहिजे. कारण, अशा समाजात जडता, रूढिप्रियता, सामाजिक उच्चनीचता यांच्यामुळे प्रगतीचा मार्ग खुंटलेला असतो. प्रगतीच्या मार्गावरील हे अडथळे दूर करून समाजाला विकसनशील बनविणे व त्याच्या आधुनिकीकरणाची शक्यता निर्माण करणे हे कार्य विचारवंतांवाचून दुसरा कोणी करू शकणार नाही. ज्ञानाचे स्वरूप दुहेरी असते. व्यक्तीच्या दृष्टीने ज्ञान म्हणजे आत्माविष्काराची साधना. मन सुसंस्कृत, संवेदनक्षम व सर्जनशील बनवणे हा तिचा हेतू असतो. पण ज्ञान ही एक सामाजिक प्रक्रियाही आहे. समाजधारणा व समाजपरिवर्तन या दोन्ही गोष्टी सुबद्ध रीतीने होण्यासाठी आवश्यक त्या गुणांची जोपासना व्यक्तीच्या मनात करून तिचे समाजाशी संवादित्व प्रस्थापित करणे, हा या प्रक्रियेचा हेतू असतो. आदर्श समाजरचना कोणती, तिचे स्वरूप कसे असेल, तिच्यात व्यक्तीव्यक्तींमधले व व्यक्ती आणि समूह यांच्यांतले संबंध कसे असतील, कोणत्या तत्त्वांवर तिची उभारणी झालेली असली पाहिजे, यांचा शोध

घेणे, त्यासंबंधी समाजाचे शिक्षण करणे व त्याला आदर्श समाजव्यवस्थेप्रत जाण्यासाठी पात्र बनवणे ही कामे विचारवंतांच्या मार्गदर्शनाखाली होत असतात. आणि म्हणूनच विशुद्ध ज्ञानोपासनेबरोबरच समाजव्यवहारांचे निरीक्षण आणि विश्लेषण ज्ञानपीठांमध्ये सतत चालू असते. तसे ते चालू राहाण्यावरच त्यांची उपयुक्तता व परिणामकारकता अवलंबून असते.

ज्ञानपीठांमध्ये महाविद्यालये, विद्यापीठे आणि संशोधनसंस्था यांचा अंतर्भाव होतो. म्हणजे फक्त उच्च शिक्षणाच्या संस्थाच ज्ञानपीठ या संज्ञेला पात्र आहेत असा अर्थ होतो व त्यात गैर असे काही नाही. स्वतंत्रपणे ज्ञानसाधना करण्याची अनुकूलता, वातावरण व बुद्धीची प्रगल्भता उच्च शिक्षणसंस्थांमधील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी यांच्या बाबतीत संभवते; माध्यमिक किंवा प्राथमिक शिक्षणाच्या स्तरांवरील संस्थेशी संबंधित व्यक्तींच्या—शिक्षक व विद्यार्थी—ठिकाणी संभवत नाही. स्वतंत्र ज्ञानसाधनेची पूर्वतयारी अशा संस्थांमधून अवश्य होते पण फक्त पूर्वतयारीच. म्हणून ‘ ज्ञानपीठ ’ या संज्ञेत शालेय शिक्षणसंस्थांचा अंतर्भाव न करणे योग्य ठरेल. असे करण्यात त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे अन्याय होईल असे वाटत नाही.

## संख्या व दर्जा यांचे व्यस्त प्रमाण

याचा असाही अर्थ नाही की, सर्व विश्वविद्यालयीन संस्थांचे ज्ञानपीठ हे नाव सार्थ आहे आणि सर्व प्राध्यापक आणि संशोधक विचारवंत म्हणवून घ्यावयाला लायक आहेत. वस्तुस्थिती तसा अर्थ काढू देणार नाही हे मान्य केले पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा झपाट्याने व अनियोजित प्रसार झाला. त्यामुळे देशातील विद्यापीठांची आणि महाविद्यालयांची संख्या बेसुमार वाढली. त्यांचा दर्जा मात्र वाढला नाही. उलट, संख्या व दर्जा यांच्यांत सर्वसाधारणपणे दिसून येणारे व्यस्त प्रमाण शैक्षणिक संस्थांमध्येही दिसून आले. अतिसामान्य दर्जाची अनेक महाविद्यालये निघाली व प्रत्यही निघताहेत. १९४७ साली भारतात वीस विद्यापीठे आणि सहाशे महाविद्यालये होती. त्यांची संख्या वाढत वाढत १९६७ साली अनुक्रमे सत्तर आणि दोन हजार आठशे पंचेचाळीस इतकी झाली. पण त्यापैकी ज्यांचा शैक्षणिक दर्जा उत्तम आहे अशा

संस्थांची संख्या हाताच्या बोटांवर मोजता येईल इतकी अत्यल्प आहे. महाराष्ट्रात सध्या सहा विद्यापीठे असून सुमारे अडीचशे महाविद्यालये आहेत. त्यांनाही वरील विधान लागू पडते. असे का ?

भारतातील बहुसंख्य विद्यापीठांची रचना लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर केलेली आहे. परीक्षा घेणे व पदवी देणे हीच त्यांची मुख्य कामगिरी. अध्यापनाचे कार्य संलग्न महाविद्यालयांनी करावयाचे व विद्यापीठाने परीक्षा घेऊन, त्यात उत्तीण झालेला विद्यार्थ्यांना पदव्या बहाल करावयाच्या, अशी श्रमविभागणी झालेली असते. पदव्युत्तर पातळीवर काही ज्ञानशाखांचे विभाग जरी प्रत्येक विद्यापीठात असले तरी त्यांची व त्यांत अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांची, तसेच शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या इतकी मर्यादित असते की विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा, तेथील वातावरण वगैरेंवर आपला ठसा उमटविण्यात पदव्युत्तर शिक्षणविभाग असमर्थ ठरतात. आणि शेवटी पदवीपूर्व शिक्षणापलिकडे न गेलेली, संशोधनाशी जवळजवळ मुळीच संबंध नसलेली संलग्न महाविद्यालये, अप्रगल्भ विद्यार्थी व त्यांना वर्षानुवर्षे तेच तेच शिकवून थकलेले व आपला व्यासंग, ज्ञानलालसा, बौद्धिक निष्ठा गमावून बसलेले प्राध्यापक विद्यापीठाचा दर्जा आपल्या पातळीवर आणून ठेवतात. उच्च शिक्षण घेणाऱ्यांपैकी जवळजवळ पंच्याऐंशी टक्के विद्यार्थी संलग्न महाविद्यालयांतून शिकत असतात हे या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.

## बहुसंख्य महाविद्यालये निकृष्ट दर्जाची

विद्यापीठांशी संलग्न असलेली पदवीपूर्व शिक्षण देणारी ही महाविद्यालये खेडोपाडी विखुरलेली आहेत. सरकारी, मिशनऱ्यांनी चालवलेली आणि खाजगी असे त्यांचे तीन प्रकार आहेत. यापैकी पहिल्या दोन प्रकारच्या संस्थांचा बराच दबदबा असतो. प्राध्यापकांचा बौद्धिक वकूब, शिस्त, चालकांकडून होणारी शैक्षणिक मूल्यांची थोडीफार कदर आणि परीक्षांमधले त्यांचे यश या गोष्टींमुळे त्यांचे नाव होते. पण तिसऱ्या प्रकारची म्हणजे खाजगी महाविद्यालये संख्येने सर्वात अधिक. त्यांतली जी जुनी आहेत त्यांच्यामागे ध्येयवादाची, सचोटीच्या व्यवहाराची व चांगल्या शिक्षणाची परंपरा आहे. पण अलिकडच्या काळात, म्हणजे मुख्यतः स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणसंस्थांचे जे अमाप पीक आले ते बरेचसे निकृष्ट दर्जाचे

ठरले आहे. ही महाविद्यालये इमारती, ग्रंथालये, प्रयोगशाळा, निष्णात शिक्षकवर्ग वगैरे साधनांच्या बाबतीत तर निकृष्ट राहिली आहेतच, पण साधनांच्या प्रतिकूलतेपेक्षाही भयानक अशा एका प्रतिकूलतेने त्यांपैकी कित्येकांना ग्रासले आहे. स्थानिक राजकीय सत्तास्पर्धेतून त्यांचा जन्म होतो. चालकवर्गांत सुशिक्षित माणसे कमी, ज्ञान हे जीवनमूल्य आहे असे मानणारे त्याहूनही कमी; त्यामुळे विद्यापीठाने घालून दिलेल्या नियमांचे कसोशीने पालन करणे, विद्यालयाच्या दैनंदिन कारभारात हस्तक्षेप न करणे, शिक्षणाची व शिक्षकाची बूज राखणे यांसारख्या संस्थेच्या निकोप वाढीसाठी अत्यावश्यक असलेल्या शिस्तीचे त्यांच्या हातून पालन होत नाही. ठिकठिकाणी चालू असलेले भलेबुरे प्रकार विद्यापीठातर्फे तपासणीसाठी जाणाऱ्या ज्येष्ठ व अनुभवी शिक्षणतज्ज्ञांनी चव्हाट्यावर आणलेले आहेत; पण तरीदेखील ते कायमचे बंद करण्याची उपाययोजना विद्यापीठांमार्फत अद्याप झालेली नाही. असे प्रकार महाराष्ट्राच्या शैक्षणिक भवितव्याबद्दल चिंता निर्माण करतात. नोकरीपायी गैरप्रकार सहन करण्याची व क्वचित प्रसंगी त्यात सहभागी होण्याची सवय एकदा प्राध्यापकांना लागली की त्यांचे व्यक्तिमत्व डागळते, स्वाभिमान हरवतो. ज्ञान हे सामर्थ्य आहे याची जाणीव विसरलेला व स्वतःच नैतिक कण्यात मोडलेला शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवणार काय व भावी पिढ्यांचा शिल्पकार होणार तरी कसा?

## नियंत्रणांचा काच आणि मार्गदर्शनाची वाण

महाविद्यालयांवर आर्थिक आणि शैक्षणिक असे दुहेरी नियंत्रण असते. विद्यार्थ्यांनी द्यावयाच्या फीची रक्कम विद्यापीठ निश्चित करते व त्याहून अधिक फी आकारण्याचे स्वातंत्र्य महाविद्यालयाच्या चालकांना नसते. बहुसंख्य संस्था सरकारी अनुदानावर चालत असल्यामुळे राज्यसरकारच्या शिक्षणखात्याचेही नियंत्रण त्यांना मान्य करावे लागते. या बाबतीतले अनेक सरकारी नियम जाचक, कार्यनिष्पत्तीला बाधक व विलंबकारक असतात. बऱ्याच वेळा त्यांची अंमलबजावणी इतक्या निर्बुद्धपणे केली जाते की, काही नवे करू पाहाणाऱ्या, प्रयोगशील संस्थाचालकाला आपल्या ध्येयवादाबद्दल व उत्साहाबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी येते.

हे झाले आर्थिक नियंत्रणांबद्दल. शैक्षणिक नियंत्रण विद्यापीठामार्फत होते. अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, विषयागणिक नेमून दिलेल्या तासांची संख्या, वार्षिक परीक्षेचे स्वरूप, प्राध्यापकांच्या नेमणुकीबाबतची पात्रता वगैरे सर्व गोष्टी विद्यापीठ ठरवते व त्याबरहुकूम संलग्न महाविद्यालयांना वागावेच लागते. जो अभ्यासक्रम ठरवताना त्याला सहभागी केले गेले नाही तो अभ्यासक्रम शिक्षकाला शिकवावा लागतो. ज्या परीक्षेचे स्वरूप त्याला विचारून ठरवण्यात आलेले नाही, त्या परीक्षेसाठी आपल्या विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्याची जबाबदारी शिक्षकावर येते. अशा वातावरणात ज्ञानाला प्राणभूत असणारी उपक्रमशीलता टिकणे शक्य नाही. बरे, ज्या विद्यापीठाकडून शिक्षणाच्या सर्वांगावर नियंत्रणे लादली जातात त्या विद्यापीठाकडून शिक्षकाला किंवा खाजगी महाविद्यालयांना शैक्षणिक नेतृत्व व मार्गदर्शन लाभते का ? नाही. कारण, त्यासाठी लागणारा शैक्षणिक ध्येयवाद, अनुकूल वातावरण व पुरेशी तयारी विद्यापीठांमध्ये आढळत नाही. आर्तेगा य ग्यासे या सुप्रसिद्ध विचारवंताने आपल्या 'मिशन ऑफ द युनिव्हर्सिटी' या पुस्तकात सांगितलेली कार्ये आपल्याकडची किती विद्यापीठे पार पाडीत असतात ? परीक्षा घेऊन पदव्या वाटणाऱ्या विद्यापीठांचे कार्य आमूलाग्र बदलल्यावाचून त्यांच्याकडून प्रेरणा किंवा मार्गदर्शन यांची अपेक्षा करण्यात काही अर्थ नाही. पदव्युत्तर शिक्षणाचा अभ्यासक्रम सघन करून नवनवीन ज्ञानशाखा सुरू करणे, मूलग्राही संशोधनाचा मोठा कार्यक्रम हाती घेऊन ज्ञान अद्ययावत बनवणे व विद्यापीठांतील शिक्षणतज्ञांचे सहाय्य घेऊन अभ्यासक्रम, पुस्तके, परीक्षापद्धती यांमध्ये सुधारणा घडवून आणून त्यायोगे संलग्न महाविद्यालयांची गुणवत्ता वाढवणे, ही विद्यापीठाची खरी कामे. त्याऐवजी आपल्याला सध्या दिसते ते शिक्षणक्षेत्रातील राजकारण, सत्तास्पर्धा, गटबाजी व कारस्थाने. महाराष्ट्रातील विद्यापीठे जरी अजूनपर्यंत या अश्लाघ्य परिस्थितीपासून दूर असली तरी किती काळ या राष्ट्रव्यापी रोगराईपासून ती स्वतःचा बचाव करू शकतील, हे खात्रीपूर्वक सांगता येणार नाही.

## दारिद्र्य : बौद्धिक आणि लौकिक

उच्च शिक्षणाच्या संस्थांमधील वातावरण किती निराशाजनक आहे ते

आपण पाहिले. अशा संस्थांत कार्य करणारे विचारवंत तरी कसे आहेत ते पाहू. अनेक 'विचारवंतां'ना विचार करावयालाही फुरसद नसते. त्यांना मिळणारे वेतन अपुरे असते, त्यांच्या डोक्यावरील अध्यापनाचे ओझे फार जड असते (आठवड्याला पंधरा ते वीस तास), अध्यापनाची पातळी अगदी सामान्य असते, वर्ग संख्येने फार मोठे व कावूत ठेवायला कठीण असतात. निवांत वाचनासाठी घरी किंवा संस्थेत स्वतःसाठी अभ्यासिका नसते. महाविद्यालयातील ग्रंथालय अपुरे असते व स्वतः पुस्तके विकत घ्यावयाची म्हटले तर पैसा नसतो, व थोडाफार असला तरी पुस्तकांवर खर्च करण्याची सवय नसते. या संदर्भात पुणे विद्यापीठ शिक्षक संघाने केलेल्या पाहाणीचा निष्कर्ष सूचक आहे. ही पाहाणी जरी पंधरा वर्षांपूर्वी करण्यात आली असली तरी थोड्याफार फरकाने तिचे निष्कर्ष आजही लागू पडतील असे वाटते. त्या पाहाणीनुसार शिक्षकांचे सरासरी वार्षिक उत्पन्न चार हजार दोनशे सोळा रुपये होते व त्यांचा पुस्तकांवरील सरासरी वार्षिक खर्च एकूणऐंशी रुपये होता.

स्वतंत्रपणे संशोधन करणे, बौद्धिक जिज्ञासा वाढत जाईल अशा वातावरणात, कार्यक्रमात वा व्यक्तींच्या सहवासात राहून वाचन, लेखन, चर्चा, वादसंवाद, यांत भाग घेत राहाणे या बौद्धिक जीवनक्रमाची व्यापक परंपरा आपल्याकडे नाही. ज्या थोड्याशा लोकांमध्ये ती असते त्यांना आपल्या सहकाऱ्यांची असूया व वरिष्ठांची उदासीनता यांना तोंड द्यावे लागते. महाराष्ट्रातील सहा विद्यापीठांच्या वार्षिक अहवालांवर नजर टाकली म्हणजे संशोधन, लेखन, चर्चासत्रांचे आयोजन यांसारख्या बौद्धिक कार्यक्षेत्रांतील निराशाजनक परिस्थिती लक्षात यावयास वेळ लागणार नाही. ज्या विषयांसाठी पदव्युत्तर शिक्षणाचे स्वतंत्र विभाग आहेत तेथेच थोडेफार संशोधन चालू आहे. त्या संशोधनाचा दर्जादेखील काही सन्माननीय अपवाद वगळता, अगदी सामान्य असतो. पीएच० डी० पदवीसाठी होणाऱ्या संशोधनाचा वाटा त्यात सर्वात अधिक असतो. त्यासाठी लिहिल्या जाणाऱ्या अनेक प्रबंधांच्या बौद्धिक दारिद्र्याकडे पाहिले की ते पदवीसाठी कसे स्वीकारले गेले, याचेच आश्चर्य वाटते. आपला प्रबंध प्रकाशित न करण्याची अट विद्यार्थ्याला मान्य असेल तर पीएच० डी०साठी तो स्वीकारावा अशी शिफारस देखील कधी कधी लादली जाते व मान्यही

केली जाते असे ऐकिवात आहे. एकदा पदवी पदरात पडली की संशोधन संपले असेच बहुसंख्य विद्वानांच्या बाबतीत घडते. संशोधनाबद्दल अनास्था, त्यासंबंधीच्या तांत्रिक अभ्यासाच्या सोयीचा शिक्षणक्रमात अभाव, पदवीपूर्व अध्यापनात त्याच्या आवश्यकतेविषयी साशंकता, साधनांची प्रतिकूलता आणि व्यावसायिक स्थैर्यासाठी किंवा बढतीसाठी त्याची अनावश्यकता—या सगळ्या कारणांमुळे महाविद्यालयांतील विचारवंताना संशोधनाची, स्वतंत्र लेखनाची, प्रकाशनांची कशाचीही गरज वाटत नाही. महाविद्यालयांच्या चालकांकडून देखील या बाबतीत प्रोत्साहन मिळत नसल्यामुळे ज्या थोड्या लोकांना काहीतरी करावे असे वाटते त्यांना आर्थिक सहाय्य, ग्रंथालय, कामाचा बोजा वगैरे बाबतीत अनुकूलता मिळत नाही. सुरुवातीच्या काळात धडपडणारे थोडेफार असतात; ते एकदा तेच तेच शिकवून सुस्तावले की संपले. मग 'पाट्या टाकण्या'-पलिकडे त्यांच्या हातून कसलेच बौद्धिक कार्य होत नाही.

## विचारवंताला आव्हानच नाही

या दृष्टीने पाहिले तर बहुसंख्य महाविद्यालयांतील परिस्थिती गंभीर आहे. विचारवंताला तिथे कोणत्याच प्रकारचे आव्हान नाही. विद्यार्थ्यां-कडून नाही, सहकाऱ्यांकडून नाही; संस्थाचालकांकडून तसा आग्रह नाही. इतकेच नव्हे, तर वर्गात जाऊन शिकण्यापलिकडे प्राध्यापकांनी आणखी काही न केलेले बरे अशीच त्यांची वृत्ती आहे. आपल्या विषयातील पुस्तके ग्रंथालयासाठी खरीदण्याकरता अधिक खर्चाची मंजुरी मागण्यासाठी प्राचार्यांकडे गेलेल्या एका प्राध्यापकाला, "गेली तीस वर्षे वाचताच आहात की! आता आणखी किती वर्षे वाचन करणार?" असा सवाल करणारे प्राचार्य अपवादात्मक नव्हेत. त्यामुळे शिकविण्यात हयात गेली तरी आपल्या विषयासंबंधी स्वतंत्र विचार करणारे व लेख किंवा प्रबंध किंवा पुस्तकांच्या द्वारे ते प्रकाशित करणारे प्राध्यापक अगदी दुर्मिळ. इतिहासाचे, अर्थशास्त्राचे, राज्यशास्त्राचे, पदार्थविज्ञानशास्त्राचे वा तत्त्वज्ञानाचे हजारो प्राध्यापक चहूकडे झाले आहेत, पण इतिहासज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ मात्र कोणी नाही, अशी आजच्या ज्ञानपीठांची शोकांतिका आहे. स्वतःपाशी असलेले अर्धेकच्चे ज्ञान कसेतरी विद्यार्थ्यांना

द्यावयाचे व त्यातच आपण काहीतरी राष्ट्राच्या उभारणीचे काम करतो पण समाजाला त्याची कदर नाही, अशी स्वतःची समजूत करून घेऊन त्या दुखलेल्या अहंकाराचा फोड कुरवाळीत बसावयाचे यात शिक्षणक्षेत्रातील अनेक विचारवंतांचा वेळ जातो. प्राध्यापकाने आपले ज्ञान वाढवावे, त्याकरता ग्रंथालयात बसावे, चर्चासंमलेनांत भाग घ्यावा, स्वतंत्रपणे लेखन करावे अशी त्याच्या अंतर्यामी ईर्षा नाही. आणि त्याच्यावर परिस्थितीचीही सक्ती नाही. त्यामुळे तो चर्चा, सभा-संमेलने यांच्या वाटेला जात नाही आणि गेला तरी त्या मागचा उद्देश बौद्धिकेतर असणार. अखिल भारतीय पातळीवर ज्या परिषदा होतात त्यांना किती प्राध्यापक उपस्थित राहातात? किती जण त्या ठिकाणी प्रबंध वाचतात, वा चर्चेत भाग घेतात? वाचल्या जाणाऱ्या प्रबंधांचा दर्जा काय असतो, हा आणखी एक प्रश्न झाला. त्याची उत्तरे शोधली म्हणजे बौद्धिक कार्याबद्दलच्या अनास्थेचा आणखी एक पुरावा मिळेल.

## शिक्षकच ज्ञानविरोधी!

काही दिवसांपूर्वी मुंबई विद्यापीठ शिक्षक संघाने महाराष्ट्र सरकारच्या शिक्षणविषयक श्वेतपत्रिकेवर एक चर्चा घडवून आणली. संघाच्या बाराशेहून अधिक सभासदांपैकी फक्त तीस ते चाळीस सभासद उपस्थित होते. पुढे काही दिवसांनी संघाच्या कार्यकारिणीच्या सभासदांनी केलेल्या कामाबद्दल तीव्र नापसंती दर्शवणारे एक पत्रक काही शिक्षकांनी प्रसृत केले. त्यात जे अनेक आरोप कार्यकारिणीवर करण्यात आले होते, त्यांत एक आरोप असा होता की, कार्यकारिणीच्या सभासदांनी वेतनश्रेणीवर सर्व लक्ष व वेळ केंद्रित करण्याऐवजी श्वेतपत्रिकेवर चर्चा घडवून आणण्यात वेळेचा व शक्तीचा अपव्यय केला. या घटनेवरून ज्ञानाच्या क्षेत्रात वावरणाऱ्या कित्येकांचा दृष्टिकोण कसा ज्ञानविरोधी आहे याची कल्पना येईल. अशा परिस्थितीत जुन्या विचारधनाचा वारसा घेण्यासाठी व नवीन ज्ञान मिळविण्यासाठी ज्ञानपीठामध्ये प्रवेश करणाऱ्या तरुण पिढीला तिथे नैराश्याव्यतिरिक्त दुसरे काय मिळणार? व त्यामुळे चिडून ती पिढी शिक्षणाबद्दल, शिक्षकांबद्दल व हे चालू देणाऱ्या समाजव्यवस्थेबद्दल अश्रद्ध बनली तर तिला दोष कसा देता येईल?

समाजप्रबोधन आणि समाजपरिवर्तन यांविषयी देखील मराठी विचारवंतांमध्ये अनास्था दिसून येते. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, आर्थिक, राजकीय आणि सामाजिक समता, सत्तेचे विकेंद्रीकरण या राष्ट्रीय ध्येयांबद्दल त्यांना उत्सुकता वाटत नाही. त्या ध्येयांशी बुद्धीने व भावनेने समरस व्हावे व उक्ती आणि कृतीच्या द्वारे समाजात त्या ध्येयांविषयी समज निर्माण करावी अशी पोटातिडीक त्यांना लागलेली दिसत नाही. खरे पाहाता विचारवंत म्हणजे समाजाचे डोळे. त्यांनीच नवी दृष्टी समाजाला द्यावयाची व स्वतः त्याचे धुरीणत्व पत्करून समाजाला प्रगतीच्या मार्गावर आणावयाचे. पण वस्तुस्थिती मुळीच तशी नाही हे मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही.

## दुभंगलेले व्यक्तित्व : विचारवंतांचे—

वर उल्लेखलेल्या ध्येयांबाबत विचारवंतांचा मोठा वर्ग नुसता उदासीन नाही तर अश्रद्ध आहे. जेव्हा जेव्हा त्या ध्येयांना आव्हान देणाऱ्या घटना समाजात घडतात तेव्हा तेव्हा त्यांच्या समर्थनासाठी विचारवंत पुढे सरसावले आहेत असे होत नाही. भारतातील इतर विचारवंतांप्रमाणेच मराठी विचारवंताचे व्यक्तित्व काहीसे दुभंगलेले आहे. त्याला मिळालेले शिक्षण आधुनिक आहे, पण त्याचे जीवन परंपरानिष्ठ आहे. कारण आधुनिक शिक्षणाचा स्वीकार हातचे राखून केला जातो. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी किंवा व्यवसाय करण्यासाठी फक्त त्याचा उपयोग केला जातो; पण शिक्षणाचे संस्कार जीवनावर होत नाहीत. विचारांची आणि वर्तनाची जडणघडण तपासून पाहाण्याचा, ती बुद्धिनिष्ठ करण्याचा व त्यात आधुनिकता आणण्याचा प्रयत्न होत नाही. वैचारिक जीवन आणि व्यावहारिक जीवन, असे जणू काही दोन बंदिस्त कप्पे आहेत व त्यांच्यांत सामंजस्य निर्माण करण्याची काही जरूर नाही असे धरून वागण्याची भारतीयांची जुनी परंपरा आहे. त्यामुळे आधुनिक शिक्षणाचा प्रसार झाला तरी सुशिक्षितांमधली धर्मांधता, रूढिप्रियता, पारंपारिकता कमी झालेली नाही. उलट सुशिक्षितांमध्ये बुवाबाजी वाढत असलेली दृष्टीस पडते.

## —आणि समाजाचे

आधुनिक विद्या आणि शास्त्रीय दृष्टिकोण यांच्याशी ही पारंपरिकता

विसंगत आहे हे त्यांच्या लक्षात येत नसावे किंवा आले तरी परंपरागत संस्कृतीचा त्यांच्या मनावर इतका पगडा असतो की, ती विसंगती दूर करण्याचा ते यत्न करीत नाहीत. हिंदू संस्कृतीचा हा वारसा व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिविकास यांना मारक ठरला आहे. व्यक्तिमत्त्वाला त्यात गौणस्थान असते. त्यामुळे व्यक्तीचे हक्क, विचार व वर्तनस्वातंत्र्य ह्या ऐहिक मूल्यांना त्यात जागा नाही. त्यामुळे लहानपणापासून जी शिकवण मनाला मिळते ती कुटुंब, जात व फार तर धार्मिक किंवा भाषिक गट यांच्या पलिकडे जाऊन व्यापक मानवी वा सामाजिक निष्ठा शिकवीत नाही. हिंदू समाज इतर समाजांबद्दल उदारता दाखवीत असला तर अंतर्गत व्यवहारात वर्तनभिन्नता मान्य करीत नाही. तात्त्विक विचारांच्या क्षेत्रात बुद्धीला स्वैरविहाराची मुभा दिली गेली तरी व्यवहारात कर्मठपणा लादला जातो.

या सर्वांचा परिणाम असा झाला आहे की, आधुनिक विज्ञान व त्याला अनुरूप अशा सामाजिक संस्थांची चौकट जरी देशात उभी राहिली असली तरी रूढ नैतिक कल्पना परंपरानिष्ठ राहिल्या आहेत. त्यामुळे समाज-जीवनात नानाविध विसंगती दिसतात. अहिंसेचा डंका वाजविणारे सरकार पोलिसी अत्याचार व गोळीबार थांबविण्यासाठी काही करीत नाही. स्वतःला निधर्मी म्हणवीत असले तरी हिंदू पंचांगातील मुहूर्त पाहिल्याशिवाय व ब्राह्मणांकडून भूमिपूजन करविल्याशिवाय विकासयोजनेची सुरुवात करीत नाही. राजकीय पक्षांची वागणूकदेखील तशीच. सर्व व्यक्ती समान आहेत या तत्त्वावर आधारलेल्या लोकशाहीचे आचरण करताना मतदाराची व उमेदवाराची जातपात लक्षात घ्यावयाला ते विसरत नाहीत. सूर्यग्रहणाच्या दिवशी नदीत बुडी मारून शुचिर्भूत होण्यासाठी धडपडणाऱ्यांमध्ये सुशिक्षित, पदवीधरदेखील असतात. स्वामी, योगी वगैरे साधूंच्या सेवेला अशिक्षितांबरोबर सुशिक्षित असतात. मंत्री, आमदार, जिल्हापरिषदेचे सदस्य, सरकारी अधिकारी, प्राध्यापक वगैरे सर्वजण तिथे असतात.

## राजकारणी आणि विचारवंत यांच्यामधील दुरावा

महाराष्ट्रात गांधीयुगात राजकारणी आणि विचारवंत यांच्यांत दुरावा निर्माण झाला तो स्वातंत्र्योत्तर काळातही चालू आहे. गांधीयुगात कृतीला महत्त्व होते; कृतीमागील वैचारिक अधिष्ठानाला नव्हते. त्यामुळे टिळक-

युगापर्यंत चालू असलेला राजकारणाचा वैचारिक वारसा खंडित झाला. ज्या विचारवंतांना राजकीय कार्य करावयाचे होते ते समाजवादी आंदोलनाकडे वळले व बाकीचे राजकारणापासून दूर राहिले. आता स्वातंत्र्योत्तर काळातही तीच परिस्थिती चालू आहे. १९६०नंतर महाराष्ट्रात जे नेतृत्व कॉंग्रेसमध्ये पुढे आले त्यात विचारवंतांना आवाहन करील असे काही नव्हते. लोकशाहीचे राजकारण हे निवडणुकांचे राजकारण असते. त्यात सत्ताप्राप्तीसाठी बुद्धिबलापेक्षा संख्याबल लागते. परंपरागत समाजात असे संख्याबल जातींपातींसारख्या प्राथमिक समूहनिष्ठांना आवाहन करून जमवता येते. त्यामुळे प्रादेशिक पातळीवरील नेत्यांना विचारवंतांच्या सहकार्याची गरज वाटत नाही. त्यामुळे विचारवंत आणि राजकीय नेते यांच्यांतील दुरावा कायम राहिला आहे. परिणामी एकीकडे वैफल्य व दुसरीकडे सत्तापूजन व तत्त्वहीनता यांचे प्राबल्य सर्वत्र वाढले आहे. राजकीय नेते विचारवंतांची कुचेष्टा करतात किंवा त्यांचा तात्कालिक लाभासाठी वापर करून घेतात, तर दुसरीकडे विचारवंत हा होत असलेल्या राजकीय स्थित्यंतराबद्दल उदासीन किंबहुना नाखूष असतो. एकीकडे लोकशाहीचे तो समर्थन करतो तर दुसरीकडे लोकशाहीमुळे आपले महत्त्व कमी झाले, बहुजनसमाजाचे नेतृत्व पुढे आले, याबद्दल तो नाराज असतो. वास्तविक त्याने अशा सत्तांतराचे स्वागत करावयास पाहिजे व बदललेल्या परिस्थितीत जी नवी जबाबदारी त्याच्याकडून अपेक्षित आहे ती त्याने मनःपूर्वक पार पाडावयाला सिद्ध असले पाहिजे. त्याऐवजी तो नव्या नेतृत्वाबद्दल अनुदार उद्गार काढण्यात व त्यांनी चालवलेल्या नव्या प्रयोगांबद्दल बेजबाबदारपणे टीका करण्यात स्वतःला धन्य मानतो. उदाहरण द्यावयाचे तर महाराष्ट्रातील पंचायत राज्याचे—सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे—देता येईल. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दोनशेवर महाविद्यालये आहेत व तेथेच हा अभिनव प्रयोग चालू आहे. पण किती विचारवंत त्याचा आस्थेने अभ्यास करताना दिसतात? त्यामागील विचारसरणीची चिकित्सा करणे, पंचायत राज्यसंस्थांची पाहाणी करून त्यांतील उणिवा दाखवणे, व्यावहारिक अडचणी दूर करण्यासाठी मार्गदर्शन करणे या गोष्टी करण्याची किती विचारवंतांची तयारी आहे? सत्तास्थाने मिळवण्यासाठी 'पांढरपेशे विरुद्ध बहुजनसमाज' असा वाद

वेळोवेळी उपस्थित करणारे बहुजनसमाजातील विचारवंतदेखील या प्रयोगांबद्दल पांढरपेशी अलिप्तता स्वीकारतात. विचारवंताची भूमिका न सोडता सामाजिक घडामोडी व प्रवृत्ती यांचा अभ्यास करून आपली मते परखडपणे मांडणे व अशा रीतीने समाजाचे व सत्ताधाऱ्यांचे मार्गदर्शन करणे ही विचारवंतांची जबाबदारी आहे. परिणामांची पर्वा न करता ती पार पाडण्यासाठी जोवर विचारवंत पुढे येत नाहीत तोवर बुद्धिवाद-विरोधी सत्ताधीशांवर—अँटी-इंटलेक्चुअल एस्टॅब्लिशमेंटवर—अंकुश कोण चालवणार ?

## चिंताजनक परभृतता

पुणे विद्यापीठात समाजप्रबोधनाच्या हेतूने बहिःशाल व्याख्यानांची व्यवस्था करण्यात आली. पण किती विचारवंतांनी त्या हेतूशी समरस होऊन त्या उपक्रमाला सहकार्य दिले ? तीच गोष्ट नियतकालिके, नभोवाणी, वगैरे माध्यमांबाबत. महाराष्ट्रात साक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. पण वैचारिक साहित्याला वाहिलेल्या नियतकालिकांची संख्या अत्यल्प आहे व आर्थिक झीज सोसून ती चालवावी लागतात. त्यांना जसा पुरेसा वाचक-वर्ग नसतो तसा लेखकवर्गही नसतो. या संदर्भात साहित्य, भाषा वगैरे विषयांमधले विचारवंत त्यांच्या क्षेत्रांत उद्भवणाऱ्या वादांबद्दल अधिक जागरूक असतात असे दिसते. वास्तविक स्वातंत्र्योत्तर काळात या विषयाची काहीशी आबाळ ज्ञानपीठांमध्ये झाली. तुलनेने अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, यांसारख्या समाजशास्त्रांना अधिक प्रोत्साहन मिळाले. असे असूनही महाराष्ट्रात त्यासंबंधी विचारवंतांनी मूलग्राही विचरमंथन, निरीक्षण किंवा विश्लेषण केले आहे असे दिसत नाही. जे थोडेफार झाले आहे त्यातील परभृतता चिंताजनक आहे.

अर्थातच या निराशाजनक परिस्थितीबद्दल ज्ञानक्षेत्रातील विचारवंतांवर सर्व दोष ठेवता येणार नाही. सरकार, शिक्षणसंस्थाचालक, विद्यापीठे, समाज ही सर्व या अपश्रेयातील भागीदार आहेत. पण प्रतिकूल परिस्थिती-वर मात करण्याचा प्रयत्न करणे हे तर विचारवंताचे मुख्य कर्तव्य आहे. ‘संक्रमणकाळाचे आव्हान’ या ग्रंथातील आपल्या लेखात प्रा० गं० बा० सरदार म्हणतात त्याप्रमाणे, “समाजप्रबोधकाचे हे कार्य वाटते इतके

सोपे नाही. ज्ञानसंवर्धन आणि विचारजागृती हा सामाजिक जीवनाचाच भाग असल्याने समाजातील बऱ्यावाईट प्रवृत्तींचे व शक्तिसंघर्षांचे पडसाद या क्षेत्रातही उमटल्याखेरीज राहात नाहीत. नवविचारांच्या प्रणेत्यांना स्वतःच्या पूर्वग्रहांशी तर झगडावे लागतेच. पण त्याचबरोबर प्रस्थापित हितसंबंधांचा कडवा विरोध वारंवार सहन करावा लागतो; त्या वेळी विचारवंताची खरी कसोटी असते. ज्ञानोपासना हा केवळ एक बौद्धिक व्यापार नसून समग्र मानवी जीवन उजळून टाकणारी ती एक दुर्दम्य प्रेरणा आहे. म्हणून आपल्या भूमिकेचे पावित्र्य राखण्यासाठी पडेल ती किंमत द्यावयास जो तयार असेल तो खरा नैष्ठिक विचारवंत असे म्हटले पाहिजे."

□

प्रभाकर पाध्ये

# निष्ठा, प्रेरणा—आणि मोह

आजच्या महाराष्ट्रातील विचारवंतांच्या धारणेच्या प्रश्नावर विदारक प्रकाश टाकणारी एक अर्थपूर्ण घटना अगदी अलिकडेच घडली. आणि ती म्हणजे, आल्डस हक्स्ले यांच्या 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड'चा पुण्याच्या नगरपालिकेने केलेला निषेध. पुणे विद्यापीठाने ही कादंबरी बी० ए०च्या अभ्यासक्रमासाठी नेमली आहे. ही कादंबरी अश्लील आहे, असा शोध एका वर्तमानपत्राने एका सुप्रभाती लावला. त्याबरोबर पुण्याच्या नगरपालिकेच्या—नव्हे, महापालिकेच्या—काही सभासदांना स्फूर्ती मिळाली. त्यांनी या कादंबरीच्या निषेधार्थ महापालिकेची बैठक तहकूब करण्याचा ठराव आणला. या ठरावाला विरोध करणारे अवघे तीन सभासद निघाले. आता पुणे हे भारताचे एक मोठे शैक्षणिक केंद्र आहे. भारताचे एक बौद्धिक केंद्र, अशी त्याची ख्याती आज कित्येक शतके दरवळत आहे. पूर्वी या ख्यातीचा आधार काही महान प्रतिभाशाली विद्वान व्यक्ती होत्या. त्या गेल्या, पण त्यांची जागा आता काही नामवंत संस्थांनी घेतलेली आहे. या संस्थांपैकीच पुणे विद्यापीठ ही एक प्रमुख. तिने ही कादंबरी बी० ए०च्या अभ्यासक्रमासाठी विचारपूर्वकच लावलेली असणार. पण तिचा हा विचार काय आहे हे पाहाण्याची काडीमात्र गरज महापालिकेस वाटली नाही. या बाबतीत

दा. क्र. १७७३१५

थोडी अधिक चवकशी करायला हवी, थोडा अधिक विवेक दाखवायला हवा; निदान चारदोन विद्वानांची, किमानपक्षी चारदोन सभासदांची एक समिती नेमून हे पुस्तक काय आहे याची चवकशी करायला हवी, असे काही या महापालिकेच्या बहुसंख्य—प्रचंड बहुसंख्य—सभासदांना वाटले नाही. या मंडळीपैकी कित्येकांनी ही कादंबरी वाचलेली असण्याचा संभव सोडाच, पण तिचे अगर तिच्या कर्त्यांचे नावही ऐकले असण्याचा संभव थोडा. यात अर्थात त्यांचा काही दोष नाही. पण पुण्याची गटारे नीट वाहातात की नाही, याबरोबर पुण्याची नैतिक गटारे नीट वाहातात की नाही, हे पाहाण्याची त्यांची उबळ बलवत्तर ठरली. तिने विवेकावर मात केली. या वर्तमानपत्राने त्या कादंबरीतले जे काही उतारे सादर केले होते तेवढे त्यांना पुरले. हे उतारे संदर्भरहित असू शकतील, त्यांचे भाषांतर कदाचित नीट झालेले नसेल, वगैरे विचार त्यांच्या मनातही आला नाही. निषेधाचा हात आपसूक वर गेला!

### ‘आकस’ आणि ‘वापर’

भारताचे आजचे जे राज्यकर्ते आहेत, ज्यांचे चेले अगर अनुयायी महापालिकादी संस्थांत वर्चस्व गाजवून आहेत त्यांना विद्वान अगर विद्वत्ता यांच्याबद्दल आंतरिक प्रेम अगर आदर वाटत नाही, हे यातले मोठे सत्य आहे. (या राज्यकर्त्यांचे जनसंघ अगर कम्युनिस्ट यांच्यासारखे जे विरोधक आहेत त्यांच्याशी काही बाबतीत येथे त्यांचे विलक्षण जमते ही त्यातली एक गंमत आहे. पुणे महापालिकेत या गमतीचाच अनुभव आला!) ज्या राज्यकर्त्यांचे नेतृत्व पंडित जवाहरलाल नेहरू अगर मौलाना अबुल कलम आझाद यांनी केले, त्यांच्याबद्दलचे हे विधान कित्येकांना आश्चर्यकारक वाटेल. पण नेहरू-आझादांचा तो जमाना गेला आहे हे कटू सत्य आपण ओळखले पाहिजे. विद्वत्तेची कदर करणारा एखाददुसरा पुढारी राज्यकर्त्यांच्या रांकेत इकडेतिकडे आढळणार नाही असे नव्हे. (श्री० अशोक मेहता हे सहज लक्षात येण्यासारखे उदाहरण आहे.) पण अशा पुढाऱ्यांना आज फारसे महत्त्व उरलेले नाही—आणि त्यांचे उरलेसुरले महत्त्वही झपाट्याने नष्ट होत आहे.

आपल्या राज्यकर्त्यांना विद्वत्तेची फारशी कदर कधी वाटत नाही, ती



...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७३६७३ दि: ...

त्यांची प्रकृतीच नव्हे, याचा एक लहानसा अनुभव मला दिल्लीला आला. मुंबईचा एक मोठा पुढारी दिल्लीला गेला आणि मंत्री झाला. मुंबईत असताना, विद्वानांशी आपुलकीचे संबंध ठेवण्याबद्दल या गृहस्थाची ख्याती होती. दिल्लीला त्याला भेटण्याचा योग आला तेव्हा त्याने तसेच करावे असे मी सुचविले. त्याने त्या कल्पनेचे मोठे स्वागत केले, पण प्रत्यक्षात काहीही केले नाही. आपण आपली एक निराळ्याच प्रकारची 'लॉबी' तयार करीत आहोत असा आक्षेप आपल्यावर येईल, या भीतीमुळे त्याने हा अंगचोरपणा केला असावा, असे मला वाटले. पण त्या मंत्र्याला बालवयापासून ओळखणाऱ्या एका मित्राने माझी ही समजूत दुरुस्त केली आणि त्या दुरुस्तीने या प्रश्नावर एक निराळाच प्रकाश पाडला. तो मित्र म्हणाला, "विद्वान लोकांबद्दल अगर विद्वत्तेबद्दल या गृहस्थाला प्रेम अगर आदर वाटतो, हे तुम्हांला सांगितले कोणी?" मी म्हटले, "पण मुंबईत विद्वानांची मर्जी संपादण्यासाठी तो खास खटपट करीत असे." "कारण, त्याचा राजकीय उपयोग होता. येथे त्याची गरज नाही." तो मित्र उत्तरला. आणि एवढे सांगून तो पुढे म्हणाला, "तुम्हांला खरे सांगू? विद्वानांबद्दल असला तर थोडा आकसच याला आहे. अर्थात विद्वानांना वापरण्यासाठी त्यांच्याशी लगट करण्याची त्याची तयारी असते." या माझ्या मित्राच्या उत्तरातले 'विद्वानांबद्दलचा आकस' आणि 'विद्वानांचा वापर' हे दोन शब्दप्रयोग माझ्या नीट लक्षात राहिले आहेत. खरे म्हणजे माझ्या मनाला ते झोंबलेच.

## मंत्री आणि विद्वत्ता

मंत्री आणि विद्वत्ता यांच्या परस्परसंबंधांबद्दल मला पूर्वी काहीच कल्पना नव्हती असे नव्हे. या संबंधात प्रो० न० र० फाटकांनी एका केंद्रीय मंत्र्याला कसे फटकारले होते याची रोचक हकीगत एका मुंबईकर मित्राने मला सांगितली होती. हा मंत्री स्वतः थोडासा विद्वान म्हणून प्रसिद्ध होता. निदान तो एका पाश्चात्य विद्यापीठाचा पीएच० डी० होता. (म्हणून तर नेहरूंची त्याच्यावर इतकी मर्जी होती, म्हणतात!) एकदा फाटकांशी भेट झाली तेव्हा तो त्यांना मंत्रीपदाच्या त्या विशिष्ट आढ्यताखोर शिष्टपणाने म्हणाला, "तुमचे ते १८५७ वरचे पुस्तक वाचले पाहिजे

बरे का ! " त्यावर फाटक ताडकन म्हणाले, " वाचू नका. तुमचा तो विषय नाही. तो ज्ञानाचा विषय आहे." मंत्री आणि विद्वत्ता यांतील प्रचलित भारतीय संबंधाचे मर्म फाटकांनी नीट ओळखले होते ! (पुनः एकदा, नेहरू आणि आझाद हे दोन मोठे अपवाद !) याचा अर्थ ज्ञानाचा उपयोग मंत्र्यांना कळत नाही असा नव्हे. ज्ञानाचा उपयोग त्यांना नीट कळतो. आजच्या यांत्रिक युगात ज्ञानाची हेळसांड अगर अवहेलना करून चालणार नाही, एवढे त्यांना समजते. आज खेड्यातल्या शेतकऱ्यालासुद्धा आधुनिक यंत्राची या ना त्या रीतीने आराधना करावी लागते. शेतकऱ्याच्या व्यवहाराच्या मानाने आजच्या राज्ययंत्राचा व्यवहार किती अवजड आणि किती गुंतागुंतीचा आहे हे सांगण्याचे कारण नाही. त्यासाठी यंत्रज्ञ लागतात, शास्त्रज्ञ लागतात. पण ते विकत मिळतात किंवा भाड्याने मिळतात. (कसे का मिळतना, मिळाले म्हणजे झाले !) त्यासाठी ज्ञान, शास्त्र, विद्वत्ता यांची एक स्वतंत्र सार्वभौम मूल्य म्हणून कदर करावी लागत नाही. ज्ञान वापरणे आणि ज्ञानाची सार्वभौम भूमिका मान्य करणे या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. दुसरी गोष्ट कठीण आहे. काहीशी विवाद्यही आहे. पहिल्या गोष्टीबद्दल वाद नाही, आणि त्याबद्दल फारशी अडचण येत नाही, असा आजच्या राज्यकर्त्यांचा अनुभव आहे. ज्ञानाचा वापर करण्यासाठी विद्वानांचा वापर करता आला म्हणजे झाले. आणि जरूर तेवढे विद्वान वापरायला मिळाले म्हणजे झाले. तसे विद्वान उदंड मिळतात. पण विद्वानाविद्वानांत फरक असतो. काही विद्वान सरळ विकत मिळतात. म्हणजे त्यांना नोकरीवर ठेवता येते. पण नोकऱ्या किती उभ्या करता येतात याला काही मर्यादा असते. शिवाय काही विद्वानांना सरकारी नोकरीचे वातावरण मानवत नाही. सरकारी नोकरीत त्यांची विद्वत्ता गुदमरते. त्यांना विद्यापीठीय वातावरण मानवते. येथेही त्यांना नोकरीमय करून टाकता येते; पण ते अप्रत्यक्ष रीतीने. शिवाय काही विद्वानांचे स्वतंत्र स्थान शाबूत राखून त्यांचा उपयोग करून घेण्यात अधिक मौज असते. आपली शान शाबूत राहिली असे त्या विद्वानांना वाटते. आणि या तालेवार विद्वानांना तारेवरची कसरत करायला लावण्यात एक आगळा आनंद असतो. (सत्तेचे आनंद विविध असतात !) विद्वत्तेचे मूल्य सार्वभौम मानल्याने हा आनंद उपभोगता येणार नाही.

## जुन्या-नव्या वहिवाटी

पूर्वीच्या राजवटीत राज्यकर्त्यांना विद्वानांची सार्वभौम कदर करण्याची थोडीबहूत सवय होती. चातुर्वर्ण्यपद्धतीत विद्वान ब्रह्मणांची प्रतिष्ठा तर धर्मविहितच होती. पण मुसलमान राजवटीतही विद्वानांची चहा करणारे अकबरासारखे बादशहा अधूनमधून निर्माण होत होते. त्यानंतर इंग्रजी राजवट आली. ही कंपनी सरकारची अस्सल व्यापारी राजवट. पण त्याही वेळी राजा राममोहन रायसारख्यांशी संपर्क साधून धोरणे आखणारे राज्यकर्ते निघत. (बाळ गंगाधर टिळक हा आपला शिष्य आहे, याचा खराखोटा अभिमान बाळगणारा ब्रिटिश प्राध्यापक हा त्या वेळचा अपवाद नव्हता.) स्वातंत्र्याच्या काळात नेहरू अगर आझाद आले ते खरोखर ब्रिटिशांच्या काळातील एका परंपरेचे वारसदार म्हणून. ब्रिटिशांच्या काळात सरकारदरबारी विद्वानांची शान असे याला एक राजकीय कारण असावे. ब्रिटिशांशी थोडेबहूत सहकार्याने वागणारे नेमस्त पुढारी स्वतः थोर विद्वान होते आणि विद्वत्तेचे पुरस्कर्ते होते. गांधींच्या राजवटीत विद्वत्तेचे हे मूल्य थोडेबहूत घसरले, पण गांधींनी विद्वानांनाही आकर्षित केले. त्यांत नेहरू-आझाद होते आणि त्यांनी विद्वत्तेचे मोल राजकारणाच्या झंझावातात वाऱ्यावर सोडून दिले नाही. म्हणून नेहरू राज्यकर्ते झाल्यावर त्यांच्या दरबारात विद्वानांची कदर होत राहिली. पण आजच्या राजकारणाची प्रवृत्ती त्यांच्या काळातही प्रबल होत होती, आणि राजकारणावर विद्वत्तेचा प्रभाव नाही असे अधिकाधिक जाणवू लागले होते. म्हणून दिल्लीचे डॉ० राजकृष्ण म्हणत की, सरकार आणि विद्वान यांच्या दरम्यान विचारविनिमयाच्या 'पाइपलाइन्स' टाकायला हव्यात. त्यांच्यासमोर कदाचित प्रेसिडेंट केनेडींचा आदर्श होता. पण केनेडी गेल्याबरोबर वॉशिंग्टनमध्ये जमा झालेले एकेक विद्वान कसे निघून गेले हे प्रसिद्धच आहे. आजच्या भारतात खरोखर केनेडीला वावच नाही. आजची भारतातली सरकारे ही श्रीमंत शेतकऱ्यांची सरकारे आहेत. (आजच्या साखरेच्या भावाची तपासणी केली म्हणजे या सरकारच्या वर्गीय प्रकृतीवर बरोबर प्रकाश पडेल.) या सरकारला विद्वत्तेच्या सार्वभौम मूल्याबद्दल आदर वाटण्याचे कारण नाही. पूर्वीच्या (मध्यंतरीच्या) राजवटीत विद्वत्तेबद्दल जेव्हा

जातीय आपुलकी वाटण्यासारखी परिस्थिती होती तेव्हा विद्वत्तेची काय परवड झालेली होती याची साक्ष इतिहासच देतो. विद्वत्तेची नवी अर्थपूर्ण प्रतिष्ठा ब्रिटिशांच्या काळात निर्माण झाली. पण तिचा स्पर्श आजच्या राज्यकर्त्यांना अगर त्यांच्या पूर्वजांना झालेला नव्हता. मग आजच्या राज्यकर्त्यांना विद्वत्तेबद्दल थोडा दुरावा, नव्हे दुःस्वासही, वाटला तर त्यात नवल काय? पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्वत्तेचा उपयोग त्यांना समजतो. हेही काही थोडे नसे! समजा, आजच्या राज्यकर्त्यांनी ठोंब्यांचेच राज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असता तर आपण काय करणार होतो?

## समित्यांचे शहाजोग जाळे

सर्वच विद्वानांना विकत घेणे शक्य नसते आणि हितकारकही नसते हे वर सांगितलेच, पण विद्वानांना भाड्याने घेता येते, आणि मग मनमुराद राबविता येते, आणि राबवूनसवरून नामानिराळे राहाता येते. असे त्यांना राबविण्याचे एक शहाजोग शास्त्र आधुनिक राज्यशास्त्राने निर्माण केले आहे. ते म्हणजे कमिट्या, किंवा याला तोडीस तोड असा देशी शब्द म्हणजे समित्या! या समितीचे जाळे सरकार पसरते आणि त्यात आमच्या विद्वत्तेच्या 'माशा' मजेत अडकतात. 'समिती' हे आमच्या विद्वानांचा एकसमयावच्छेदे सन्मान करण्याचे आणि त्यांच्या बुद्धीसभोवती हवे ते रसायन निर्माण करण्याचे एक मोठे समर्थ औषध आपल्या सरकारला सापडलेले आहे. या औषधाने कोणत्याही विद्वानाच्या मेंदूला हवी तशी भूल देता येते असा अनुभव आहे. या समितीवर चार नामवंत विद्वानांची सोय करून टाकली म्हणजे आमच्या सरकारला निश्चित राहाता येते. कारभाराची निश्चिती आणि समितीच्या कामकाजाचीही निश्चिती! या समितीवर कोणाची वर्णी कशी लागेल याबद्दलचे एक शास्त्रच बांधता येईल. पण कधी कधी त्यात गमती आढळतात. मुंबईचा एक इंग्रजीचा प्राध्यापक एकदा दिल्लीला गेला आणि एका सभेत त्याने फर्मास इंग्रजीत भाषण केले. त्याच्या सुदैवाने नेहरू या सभेला हजर होते. त्याच्या फर्डेबाज इंग्रजीवर ते खूष झाले आणि त्यांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. झाले! हा हात म्हणजे राजसत्तेचा कायमचा वरदहस्त ठरला!

आता हे फर्मास इंग्रजीचे प्राध्यापक मराठी साहित्याचे प्रतिनिधित्व मुंबई-दिल्ली-सिमल्याच्या अनेक समित्यांवर आणि सेमिनारमध्ये करतात. त्यासाठी या गृहस्थाच्या मराठी साहित्यातील अधिकाराची (म्हणजे अनधिकाराची) चवकशी करण्याचे कारण काही पडत नाही. अर्थात हा एक अपवाद! अशा अपवादांनी नियमांना खुमारी येते. नियम असा की, समित्यांचे सदस्यत्व संपादण्यासाठी साहित्यिक-सांस्कृतिक-वृत्तपत्रीय जीवनामध्ये थोडासा अधिकार प्राप्त करून घेतला पाहिजे आणि मुख्य म्हणजे एखाद्या मातबर मंत्र्याची नजर पकडण्याची करामत केलेली असली पाहिजे.

## ‘सरकार-पक्ष’ आणि ‘स्व-पक्ष’

अशा समित्यांचे कार्य कसे चालत असेल हे एका विद्वान—नामवंत विद्वान—समितिसदस्याच्या एका उद्गाराने माझ्या चांगले ध्यानात आले. संदर्भ होता महाराष्ट्रातील एका विद्वानावर झालेल्या अन्यायाचा. महाराष्ट्र सरकारच्या एका सांस्कृतिक कार्याशी या विद्वानाचा निकटचा संबंध जडला. पण दुर्दैवाने या विद्वानाचे त्या कार्याच्या संचालकांशी पटले नाही, आणि त्याला आपल्या नोकरीला मुकावे लागले. पुढे ते प्रकरण कोर्टात गेले. कोर्टात या विद्वानाला आर्थिक नुकसानभरपाई काही मिळाली नाही, पण त्याचा नैतिक विजय झाला असे अनेकांचे मत पडले. यासंबंधी समितीच्या एका मातबर सभासदाशी एकदा बोलणे निघाले. हा सभासद मोठा विद्वान म्हणून प्रसिद्ध होता. सुस्वभावी म्हणून प्रसिद्ध होता. निःस्पृहपणाबद्दल त्याची थोडीबहूत खरीखोटी ख्याती होती. ज्याच्यावर अन्याय झाला तोही आपल्या विद्वत्तेबद्दल, आणि विद्वत्तेइतकाच सज्जनपणाबद्दल प्रसिद्ध होता, तेव्हा त्याच्याबद्दल या समितिसदस्याला सहानुभूती वाटत असावी, असा माझा कयास होता. आणि तशी सहानुभूती त्याला वाटतही होती. म्हणून मी त्याला विचारले, “या विद्वानावर असा अन्याय होत आहे असे तुम्हांला वाटत असताना समितीतच त्याला न्याय देण्याचा प्रयत्न तुम्ही का केला नाही?” त्यावर या समितिसभासदाने जे मासलेवाईक उत्तर दिले ते माझ्या नीट लक्षात राहिले आहे. तो म्हणाला, “अशा भांडणात नेहमी सरकारपक्षीयांचा जय होत असतो,

मग निष्कारण वाद करण्यात फायदा काय ?" या उत्तराने आमच्या या समितिसभासदांच्या नीतिमत्तेवर पुरेसा प्रकाश पडतो. सरकारपक्षाला न दुखवताना जेवढे कार्य करता येईल तेवढे कार्य हे करणार. पण सरकारपक्षाखेरीज आणखी एक पक्ष असतो. तो म्हणजे स्व–पक्ष! या स्व-पक्षाला सांभाळता सांभाळता सार्वजनिक कार्यांचे धिंडवडे उडतात; पण त्याला इलाज काय!

## नवी पिढीही त्यातलीच ?

आमच्या या मातबर दर्जेदार विद्वानांचे आणि साहित्यिकांचे अनुकरण करणारे 'ज्यूनियर' विद्वान आणि साहित्यिक कमी नाहीत. पासरीने मोजले जातील इतके आहेत. श्रेष्ठांचा सार्वजनिक अधिकार अद्याप त्यांनी संपादन केलेला नसेल. त्याला नाही म्हटले तरी वेळ लागतो, आणि कष्ट करावे लागतात. ते सहजासहजी जमणारे नाही. पण या प्रकरणातले दुसरे जे साधन ते इतके कष्टप्रद नाही. ते म्हणजे 'मंत्र्याचा डोळा पकडण्याचे'— मंत्र्याचा 'आय' 'कॅच' करण्याचे. या बाबतीत आमचे तरुण विद्वान आणि साहित्यिक (अर्थात काही सन्मान्य अपवाद सोडून) मागे पडण्यास तयार नसतात! कसेही करून मंत्र्याच्या नजरेस पडण्याची त्यांची खटपट जोमात सुरू असते. (कॉलेजमध्ये असताना मुलींच्या नजरेस पडण्यासाठी असेल तशी. "आपली पन्नास टक्के बाजू नेहमी शंभर टक्के तयार असावी—उगीच मागाहून पश्चात्ताप नको"!) मग एखादी मंत्र्याची 'पार्टी' असो, एखादा सार्वजनिक समारंभ असो, अगर एखाद्या अधिकाऱ्याच्या पत्नीच्या पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ असो. त्याला हजर राहाण्यास ते धडपडत असतात. त्यासाठी एक मोठे 'साहित्यिक' कारणही त्यांच्यापाशी तयार असते. एखाद्या भिकार समारंभाला अगर संशयास्पद पार्टीला हजर राहिल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले तर ते लगेच उद्गारतील, "अहो, अनुभव हवा!" आमचे विद्वान आणि साहित्यिक असे अनुभवाच्या 'हव्यासा'मागे लागल्यानंतर सत्ताधाऱ्यांचे फावले तर नवल काय? राज्यकर्त्यांचे खरे मूल्य म्हणजे सत्ता. लोककल्याण हे खरोखर त्या आद्यमूल्याचे साधन! विद्वानांना राबवून लोककल्याणाचा देखावा साधत असेल तर कोणता राज्यकर्ता त्याबाबत खळखळ करील?

माझे असे स्वच्छ मत झाले आहे की, महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचे दीप जे आज मंदावले आहेत त्याला सरकारी समित्यांची विस्तृत आणि गुंतागुंतीची जाळी हे एक महत्त्वाचे कारण आहे. या समित्यांनी काही कार्य होत नसेल, अगर कार्य होत असल्याचा देखावा घडत नसेल, असे मला म्हणायचे नाही. काही थोडे कार्य घडतच असेल. पण त्यासाठी आमचे विद्वान आणि साहित्यिक जी किंमत मोजीत आहेत ती जबरदस्त आहे. ही किंमत त्यांना जाणवत नसेल याचे कारण ही किंमत सार्वजनिक आहे. त्यांची वैयक्तिक हानी त्यात फारशी नाही— म्हणजे जी आहे ती बौद्धिक स्वरूपाची आहे. पण त्याची त्यांना पर्वा वाटत नसावीसे दिसते. मला एक विद्वान म्हणालाच, "अहो, आजकाल मला अभ्यासाला फारसा वेळ मिळतच नाही. सरकारी समित्यांची कामे इतकी असतात!" दुर्दैव एवढेच की, सरकारी समित्या म्हणजे केवळ भत्ते नव्हत. सरकारी समित्यांत बौद्धिक बोटचेपेपणा करण्याची सवय लागते आणि ती सवय सरकारी समित्यांतून बाहेर पडून सार्वजनिक जीवनाच्या इतर अंगांत शिरते!

## शिमगा आणि तमासगीर

मला असे मुळींच म्हणायचे नाही की, आमच्या सार्वजनिक जीवनात आज जो हिणकसपणा आलेला आहे तो या बोटचेपेपणामुळे आज नव्याने आला आहे. मस्तवाल संपादकांचा वृत्तपत्रीय मवालीपणा हे आजच्या हिणकसपणाचे एक कारण सांगितले जाते. प्रथम म्हणजे ते कारण नसून लक्षण आहे. आणि ते नवीन, महाराष्ट्राला पूर्वी माहीत नसलेले आहे असे मुळीच नाही. 'टिळक बाळंत झाले' असा मथळा देऊन अग्रलेख लिहिणारा संपादक या महाराष्ट्रात पन्नास वर्षां-पूर्वीच होऊन गेला. त्याला अर्थात समाजाने चांगले शासन केले. तसे आजच्या मस्तवाल संपादकांना होत नाही. पण त्याच्यापूर्वी अनेक वर्षे 'माळावरचा महारोगी!' असे मथळे देऊन वृत्तपत्रे सजविण्याची वृत्ती मोठमोठ्यांनी दाखविलेली होतीच! महाराष्ट्राच्या वृत्तपत्रीय जीवनाला हा पुराणा शाप आहे, आणि मराठी भाषेचा शिवाजीही या शापापासून पूर्णपणे मुक्त होता असे म्हणता येणार नाही. गर्दभानंदाची मिरवणूक या

शिवाजीच्या काळातच निघाली (आणि तिचे मोठे 'रोचक' वर्णन त्याच्या पत्रात आले.) आणि पुढे आगरकरांची त्यांच्या जिवंतपणी प्रेतयात्रा काढली ती या शिवाजीच्या पुढीलवंशीय चेल्यांनीच! (विद्यार्थ्यांनी कावळ्याची प्रेतयात्रा काढावी या कल्पनेने जे कासावीस होतात त्यांनी या कुप्रसिद्ध प्रेतयात्रेच्या स्मरणाने काय वाटते याचा थोडा अनुभव घ्यावा!) मस्तवाल संपादकांनी लेखणीच्या, शैलीच्या, टारगेपणाच्या जोरावर हवा तसा शिमगा घालावा आणि लोकांनी भाविकाच्या उत्साहाने त्याचे कौतुक करावे, ही गोष्ट महाराष्ट्राला मुळीच नवीन नाही. गेली कित्येक वर्षे एक-मेकांवर चिखलमारा करणारे दोन वडे साहित्यिक आज एकत्र येऊन एकमेकांवर गुलाल फेकू लागले म्हणून त्यांचे कौतुक करण्यासाठीच काय ती लोकांची झुंड जमा होते असे नाही; पंचवीसतीस वर्षांपूर्वी ते एकमेकांना चापून शिवीगाळ करीत असत तेव्हा ती शिवीगाळ ऐकण्यासाठी उभयपक्षांचे लोक निर्विकार निःपक्षपातीपणाने उभयतांच्या सभांना गर्दी करीत असत.

## लोटांगण घालण्याची कला

आपले वडेवडे विद्वान कासरहंड्या डोक्यावर मिरवीत जाऊन राज्यकर्त्यांवर दुग्धाभिषेक करण्यासाठी अहमहमिकता मांडतात, हाही काही नवा अनुभव नाही. आपले कित्येक विद्वान जुन्या जमान्यात राज्यकर्त्यांच्या चरणी लीन होण्यासाठी कसे धावत असत हे जाणण्या-साठी इतिहासाला कौल लावण्याची गरज नाही. केवळ राज्यकर्त्यांच्या नव्हे तर राज्यकर्त्यांच्या कृपाप्रसादाने पुनीत झालेल्यांच्याही पुढे लीन होण्यासाठीसुद्धा! मुंबईचा साहित्यसंघ ही एक मातबर आणि मान्यवर संस्था आहे. तिचे नेते डॉ० भालेराव हे एक चारित्र्यशाली कार्यकर्ते होते. पण त्यांच्या कारकिर्दीत देखील, एका प्रतिष्ठित वकिलाला ब्रिटिशांनी न्यायाधीशपद बहाल केल्याबद्दल संघातर्फे त्याचा सन्मान करण्याचा बूट निघाला होता. या सद्गृहस्थाचा साहित्याशी काडीमात्र संबंध नव्हता हे ध्यानात घेतले गेले नव्हते. या समारंभाला विरोध केल्याबद्दल निर्माण झालेली त्याची खप्पामर्जी अद्यापही निवालेली नाही. राज्यकर्त्यांपुढे लोटांगण घालण्याची ही आमची अभिजात वृत्ती आग्ही दिल्लीला नेऊन तिची खास कला बनविली आहे. डॉ० चिंतामणराव

देशमुख यांना मी एक आदर्श महाराष्ट्रीय सद्गृहस्थ म्हणेन. महाराष्ट्रासाठी त्यांनी मंत्रिपद सोडले. पण त्यांची सत्ता गेल्यापासून महाराष्ट्रीय लोक त्यांना विसरू लागले. त्यांना साठ वर्षे पुरी झाली तेव्हा त्यांचा एकसष्टी-समारंभ करण्याचे कोणाला सुचले नाही, पण सत्तेवर असलेल्या महाराष्ट्रीयांना रानडे, आगरकर, शिवाजी अशा पदव्या बहाल करून त्यांची पाद्यपूजा करण्यास आम्ही चुकत नाही. आणि अशा एखाद्या समारंभासाठी चिंतामणराव देशमुखांनी भाषण करावे अशी त्यांना विनंती करण्यासाठी त्यांच्याकडे जाण्यास मात्र आम्हांला शरमही वाटत नाही. (चिंतामणरावांचा मोठेपणा असा की, ते या विनंतीला मान देतात. पण या त्यांच्या मोठेपणानेही आम्हांला काही खंत वाटत नाही. चिंतामणराव दिल्ली सोडून हैद्राबादला गेले तेव्हा त्यांना निरोप देण्यासाठी योग्य असा बडा समारंभ झाल्याचे ऐकिवात नाही.)

महाराष्ट्रीय नाट्यक्षेत्रातल्या सर्जनशीलतेच्या आजच्या अभावाने मन थक्क होते. १९४३ साली मुंबई साहित्य संघाने मराठी रंगभूमीची शताब्दी साजरी केली तेव्हा प्रेक्षकांचा प्रतिसाद कसा मिळेल याची डॉ० भालेराव-प्रभृतींना काळजी वाटत होती. पण प्रतिसाद मिळाला तो विस्मयजनक! हा खरोखर एक साक्षात्कार होता. १९३०-३२ सालापासून महाराष्ट्रीय रंगभूमीला उतरती कळा लागली होती, आणि याबाबत तज्ज्ञांची अशी मीमांसा होती की, सिनेमाने प्रेक्षकांना पळविल्यामुळे रंगभूमीची अशी हलाखीची स्थिती झाली. १९४३ साली मराठी प्रेक्षकांनी या आरोपाला ठणठणीत उत्तर दिले. तेव्हापासून मराठी प्रेक्षकांनी अक्षरशः लाखो रुपये मराठी रंगभूमीच्या चरणी वाहिले आहेत. पण या उत्साहातून किती नाटके, किती नट, किती नट्या आणि किती दिग्दर्शक—अभिजात दर्जाचे, विजया मेहतांसारखे—निर्माण झाले? महाराष्ट्रीय नाट्यक्षेत्रातली ही सर्जनशून्यता आश्चर्यकारक आहे. पण याच कालात मर्ढेकरांसारखा टीकाकार-कवी, गंगाधर गाडगिळांसारखा कथालेखक, 'कोसला'सारखी कादंबरी निर्माण झाली आहे. तेव्हा सर्जनशीलतेच्या नावाने अगदी खडखडाट आहे अशी ओरड करण्याचे कारण नाही. पण वाङ्मयीन अगर कलात्मक सर्जनशीलतेचे नियम वेगळे असतात, आणि मी जी चर्चा करीत आहे तिने महाराष्ट्रीय सर्जनशीलतेच्या प्रकृतीवर फारसा प्रकाश

पडण्याचा संभव नाही. रशियातील झारच्या काळातले वातावरण वाङ्मयीन सर्जनाला पोषक होते असे नियमानुसार म्हणता येणार नाही. पण अर्नाल्ड बेनेट यांना एकदा जगातल्या दहा सर्वोत्कृष्ट कादंबऱ्यांची नामावली तयार करण्यास सांगण्यात आले तेव्हा त्यांनी जी यादी तयार केली ती सारीच्या सारी रशियन कादंबऱ्यांची होती, आणि त्या साऱ्या कादंबऱ्या झारच्या काळात निर्माण झालेल्या होत्या! सर्जनशीलतेचा मुद्दा मी या चर्चेत घेतच नाही.

आमच्या सामाजिक जीवनावरच्या गळवांची जी उदाहरणे मी वर दिली त्याबद्दल माझी खरी खंत नाही. आमच्या एका जुन्याच रोगाची ती लक्षणे आहेत. माझी खंत आहे ती निराळीच आहे, अधिक करुणात्मक आहे. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रीय विचारवंतांनी आम्हांला एक परंपरा घालून दिली, तिचे आज काय झाले आहे ते पाहा, अशी माझी विनंती आहे. ज्या ज्ञानाची हेळसांड केल्यामुळे आमचा समाज अधोगतीला गेला आणि ज्याची उपासना केल्यामुळे इंग्रजांचा वर आला त्या ज्ञानाचा प्रसार करण्याच्या बुद्धीने नवमहाराष्ट्राचे आद्य पत्रकार आणि आद्य विचारवंत बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२ मध्ये 'दर्पण' पत्र सुरू केले. याच बाण्याने पुढे लोकहितवादींनी शतपत्रे लिहिली आणि आगरकरांनी सुधारकपत्र चालविले. ज्ञानोपासना आणि समाजसुधारणा याच चिपळूणकर, टिळक, परांजपे, खाडिलकर, केळकर, जावडेकर यांच्या प्रेरणा होत्या. या प्रेरणेचे पत्रकार आज दिसतात काय? पां० वा० गाडगीळ आहेत, पण तेही आता निवृत्त झाले आहेत. आणि खरे म्हणजे ते जुन्या जमान्यातले. लोकहितवादी सरकारी अधिकारी होते. ते कोठेही गेले की तेथे एखादी वादविवादसभा, एखादे ग्रंथालय काढीत. या कार्याला ते आद्यक्रम देत. आज हे कार्य सरकारने स्वीकारले आहे. आणि तरी ते तळमळीने करणारे किती सरकारी अधिकारी दाखविता येतील? सरकारी नोकरीतील प्रतिष्ठेच्या काळात चिपळूणकरांनी स्वभाषा आणि स्वधर्म यांच्या उद्धारासाठी सरकारी नोकरी सोडली. पण आज आम्हांला सरकारबद्दल असे काही विलक्षण प्रेम निर्माण झाले आहे की सरकारी समारंभ, सरकारी समागम आणि सरकारी सत्कार हे 'वाङ्मयीन आणि कलात्मक अनुभवांचे झरे' आम्हांला वाटू लागले

आहेत. महाराष्ट्रीय विद्वत्तेला भरभक्कमपणा आणण्यासाठी रावसाहेब रानडे जन्मभर झटले. पण आज विद्वत्तेच्या गुणधर्मापेक्षा विद्वत्तेचा संख्यात्मक विकास सुरू आहे.

## संख्यात्मक बनलेली मूल्ये

आजची आपली मूल्येच संख्यात्मक बनली आहेत. ज्योतिबा फुल्यांनी जी सत्यशोधक चळवळ सुरू केली तिचा समता हा आत्मा होता. आज सत्यशोधक समाजाच्या मंत्रांनी अंगात येणारे पुढारी श्रीमंत शेतकऱ्यांसाठी झटतात, आणि खेड्यांतील हरिजनांवर अत्याचार करतात! आगरकरांचे सारे चारित्र्यच इतके प्रखर आणि जाज्वल्य होते की, त्यांचे अनुयायित्व कोठे आढळते किंवा काय हे पाहाण्यासाठी माझी नजर धजावतच नाही. लोकमान्य टिळकांनी प्रतिपक्षावर सतत जालीम टीका केली. पण प्रतिपक्षीय पुढाऱ्यांच्या निधनानंतर त्यांच्या कार्याचे जे मोजमाप त्यांनी केले तितके अर्थपूर्ण मोजमाप या पुढाऱ्यांच्या कट्टर अनुयायांनासुद्धा कधी जमले नाही. रानड्यांनी या देशाच्या थंड गोळ्यात ऊब आणली, गोखल्यांनी स्वार्थत्यागाचा महिमा प्रस्थापित केला, इत्यादी जे अभिप्राय लोकमान्य टिळकांनी व्यक्त केले त्यांच्या मागे मूलभूत दृष्टी होती. अशा मूलभूत दृष्टिकोणाची विद्वत्ता आज मला दिसत नाही. वामन मल्हारांनी विद्वत्ता आणि सात्त्विकता यांच्या संगमाचा जो आदर्श घालून दिला त्याचा कित्ता गिरविलेला मला फारसा कोठे दिसत नाही. प्राचीन धर्माकडे अगर तत्त्वज्ञानाकडे प्रभावी आधुनिक दृष्टीने पाहाण्याची लक्ष्मणशास्त्री जोश्यांची शक्ती मला विशेष दिसत नाही. राज्यनीतिशास्त्राला तत्त्वज्ञानाचा पाया देऊन स्वतंत्र दृष्टीचे राज्यनीतिशास्त्र निर्माण करण्याची आचार्य जावडेकरांची ताकद मला फारशी आढळत नाही. अभिजात विद्वत्तेने आणि अंगीकृत कार्यांच्या तळमळीने खुमासदार बनलेला इतिहासाचार्य राजवाडे अगर ज्ञानकोशकार केतकर यांचा विक्षिप्तपणाही फारसा कोठे आढळत. नाही. पं० सातवळेकर अगर दप्तरी यांच्यासारखे ज्ञानतपस्वी तर नाहीतच. आणखी अशी कितीतरी उदाहरणे देता येतील, पण त्याची गरज नाही.

ही विधानें करताना एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. मी कोणत्या विचारवंतांबद्दल बोलत आहे? आजचे विचारवंत. पण आजचे विचारवंत म्हणजे नक्की कोण? नव्या पिढीचे त्यांच्यांत स्थान कोणते? नव्या पिढीबद्दल बोलायचे असेल तर ज्यांचे शिक्षण स्वातंत्र्यानंतर झाले त्यांच्याबद्दल बोलावे लागेल. त्यांच्याबद्दल मी येथे बोलत नाही. त्यांच्यात परत दोन भाग करावे लागतील. ज्यांचे शिक्षण—म्हणजे माध्यमिक वा उच्च शिक्षण —१९४७ नंतर झाले ते आणि ज्यांचे सारे शिक्षण १९४७ नंतर सुरूच झाले ते. पहिल्या वर्गाबद्दल एक विधान सर्वसाधारणपणे करता येईल. दुसऱ्या महायुद्धानंतर, विशेषतः स्वातंत्र्यानंतर, विज्ञानशास्त्रांचे शिक्षण घेण्याची लाट उसळली. आमचे मोठमोठे बुद्धिवान विद्यार्थी विज्ञानाची आराधना करू लागले. स्थापत्यशास्त्र, वैद्यकशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र यांच्या विद्यालयांत विद्यार्थ्यांची गर्दी होऊ लागली. यांतून अनेक डॉक्टर्स, इंजिनिअर्स, विज्ञानशास्त्रज्ञ निर्माण झाले. त्यांनी आपल्या वैज्ञानिक ज्ञानाला तत्त्वज्ञानाची जोड दिली आहे काय, मला माहीत नाही. बहुतेक दिलेली नसावी. अगदी पाश्चात्य विद्यापीठांत शिकून आलेल्या विद्यार्थ्यांनीसुद्धा दिलेली नसावी असे वाटते. ते आपापल्या धंद्यात मश्गूल आहेत. क्वचित प्रसंगी आपल्या वैज्ञानिक शास्त्रांसंबंधी, त्यातल्या नवनव्या शोधांसंबंधी ते लिहितात. पण विज्ञानाचा मानवी जीवनाशी, मानवाच्या अंतःप्रवृत्तीशी, मानवाच्या भवितव्याशी काय संबंध आहे, असल्या तात्त्विक-तत्त्वज्ञानात्मक प्रश्नांच्या फंदात ते पडत असतीलसे वाटत नाही. त्यांच्या वैज्ञानिक विशारदत्वाचा महाराष्ट्राच्या वैचारिक संस्कृतीला विशेष फायदा झालेला दिसत नाही. आमच्यासारख्या सामान्यांच्या नजरेत भरण्याइतका खासच झालेला नाही. ज्यांचे शिक्षण १९४७ नंतर सुरू झाले त्यांच्याबद्दल इतक्यात निश्चयाने बोलणे योग्य होणार नाही. त्यांचे उच्च शिक्षण अद्याप पुरेदेखील झालेले नसेल. ते बहुतेक अद्याप विद्यार्थिदशेतच असणार. एक गोष्ट सांगता येते. या पिढीवर परंपरागत संस्कार फार थोडे झालेले आहेत. या पिढीचा अधःपात झाला आहे वगैरे प्रलाप मी काढणार नाही. परंपरागत संस्कार

इतके सुभगसोज्ज्वळ होते याची मला खात्री नाही. नव्या जीवनाचे संस्कार भयंकर आहेत असेही मला वाटत नाही. त्यांच्यांत काही नव्या अभिनंदनीय प्रवृत्तीच निर्माण होत असतील. कालच मी श्री० जयंतराव टिळकांना आपला अनुभव सांगताना ऐकले की, कोल्हापूर-साताऱ्या-कडच्या नवीन पिढीच्या लोकांना, हा आपला म्हणून एखाद्याच्या अपकृत्यांची गय केली पाहिजे असे मुळींच वाटत नाही; एखाद्याची जातपात न पाहाता त्याच्या कृत्यावरून त्याची परीक्षा केली पाहिजे, असे त्यांना आग्रहाने वाटू लागले आहे. राज्यकर्त्यांच्या कृपाप्रसादामुळे जे नूतन श्रीमंत ग्रामीण भागात आणि नागर भागात निर्माण झाले आहेत त्यांच्या मुलांत गुंडगिरीची प्रवृत्ती थोडीबहूत आढळते, असे मी तज्ज्ञांकडून ऐकले आहे; पण एकंदरीने नवी पिढी निकोप आहे असे धरून चालणेच बरोबर ठरेल.

मी या युद्धोत्तर पिढ्यांबद्दल येथे लिहीत नाही आहे. तर मी ज्या पिढीबद्दल बोलत आहे ती स्वातंत्र्यपूर्व कालातच निर्माण झालेली आहे. मी स्वातंत्र्यपूर्व कालातील काही आदर्शांचा उल्लेख केला. पण हे आदर्श ज्या काळात झळकले त्या काळात बुद्धीला फूस लावणारी प्रलोभने फारशी नव्हतीच. या पिढीत मधू लिमये, एस० एम० जोशी, नारायणराव गोरे, अशोक मेहता, अच्युतराव पटवर्धन, जयप्रकाश नारायण, राममनोहर लोहिया इत्यादी मंडळींनी आयुष्याचा होम केला. त्यांपैकी काहींना लौकिक आयुष्य सुखासमृद्धीने जगण्याची सुसंधी प्राप्त झाली असती, म्हणून त्यांच्या त्यागाचे महत्त्व. पण इतरेजनांना अशी संधी होती कोठे? मी माझेच उदाहरण घेऊन बोलतो. दुसरे काहीही होणे शक्य नव्हते म्हणून मी वृत्तपत्रव्यवसायात शिरलो आणि स्वभावाला औषध नसल्यामुळे परखडपणाने वागलो. मी पत्रव्यवसाय सोडला तेव्हा संयुक्त महाराष्ट्र झालेला नव्हता. ज्या प्रलोभनांबद्दल मी बोलत आहे त्यात अडकण्याची संधीच मला लाभली नाही—किंवा मी त्या दिशेने जाऊ शकलो नाही असे म्हणावे. आज समित्यांच्या जाळ्यात अडकलेल्या विद्वानांना तशी पूर्वी संधीच नव्हती. त्यांच्या पूर्वीच्या पिढीला ती नव्हतीच नव्हती. शिवाय या संधीने केवळ आर्थिक लाभ होतो किंवा सन्मान पदरी पडतो असे नव्हे; काही तरी कार्य केल्याचे, समाजाच्या

उद्धारास हातभार लावल्याचे, संस्कृतीत भर घातल्याचे समाधान मिळते. हे समाधान खरे की खोटे, हा प्रश्न अजिबात निराळा. महत्त्वाचा मुद्दा असा की, ही प्रलोभने पूर्वीच्या पिढीला नव्हती. दरवाज्याच्या आड उभे राहून परपुरुषाशी बोलणाऱ्या गृहिणीच्या नैतिक उज्ज्वलतेचेही अभिनंदन केलेच पाहिजे. तसे आपण त्या पिढीचेही करू या. पण प्रलोभने असती तर किती जण टिकले असते, हा प्रश्न गैर नव्हे.

## दारिद्र्याला बळी पडलेली विद्वत्ता

पण प्रश्न असा की, इतर स्वतंत्र देशांत ही प्रलोभने असताना विद्वानांचा इतका अधःपात झालेला का दिसत नाही? केनेडी प्रेसिडेंट झाले तेव्हा अनेक नामवंत प्राध्यापक त्यांना साहाय्य करण्यासाठी वॉशिंग्टनला गेले, पण केनेडीनंतर त्यांनी आपल्या जागा भराभर सोडल्या. ते आपल्या जागांना चिकटून बसले नाहीत. याचे एक कारण उघड आहे. अमेरिका समृद्ध आहे. आमच्या बऱ्याचशा सार्वजनिक अधःपाताचे मूळ आमच्या दारिद्र्यातच शोधावे लागेल. दारिद्र्यात पिचलेल्या आमच्या विचारवंतांना थोडेसे द्रव्य आणि अल्पस्वल्प शेलापागोटे मिळविण्याची संधी प्रथमच आली तर त्यांनी ती साफ सोडावी असे सांगणारा मी कोण? एकदा अशोक मेहता म्हणाले होते त्याप्रमाणे आमचे राजकारण हे 'दारिद्र्याचे राजकारण (पॉलिटिक्स ऑफ पॉव्हर्टी)' आहे. आमची विद्वत्तासुद्धा या दारिद्र्याला बळी पडली तर इतरांनी नाकाने कांदे का सोलावे?

एवढा एकच मुद्दा असता तर मी या विषयाबद्दल मुळीच काही लिहिले नसते. पण आणखीही एक बाब आहे. ती म्हणजे आमच्या विद्वानांची आणि विचारवंतांची सरकारी मानपानात मोक्ष मानण्याची वृत्ती. आमच्या विद्वानांना याची बाधा झाली आहे, ही अतिशय दुःखाची गोष्ट आहे. समाजवादाचे इतर काय गुणदोष असतील ते असोत, पण प्रत्येक गोष्टीचा मक्ता सरकारला देणे आणि साऱ्या बाबतींत सरकारच्या ओंजळीने पाणी पिण्याची वृत्ती फैलावणे ही भयंकर जाचक वृत्ती सर्वत्र फैलावली आहे. आमच्या विचारवंतांना, विद्वानांना, आणि साहित्यिकांना स्वतःपेक्षा मंत्री अधिक महत्त्वाचे वाटतात. म्हणून आमच्या साहित्य-संमेलनांचेच काय, पण विद्वानांच्या एकसष्टीसमारंभाचे उद्‌घाटकसुद्धा मंत्री

असावे लागतात! आमचे विद्वान मंत्र्यांच्या कृपाकटाक्षासाठी तळमळत आहेत की काय असे वाटते! निदान आमचा आर्थिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक उद्धार सरकारी प्रेरणेने, सरकारी कृपेने आणि सरकारी प्रसादाने होणार याबद्दल त्यांची खात्री झालेली दिसते. म्हणून ते सरकारी छायेत वावरण्याचा प्रयत्न करतात. आणि जेथे प्रत्यक्ष सरकारी छाया नसेल तेथे निमसरकारी छाया शोधतात. मग ती निमसरकारी छाया एखाद्या विद्यापीठाची असो, अकादमीची असो, नाहीतर नगरपालिकेची असो! पूर्वी या संस्थांत विद्वत्तेचा दरारा असे. आता विद्वानांवर या संस्थांचा दरारा असतो. याला अपवाद नाहीत असे नाही. ते विद्वानांत आहेत तसे सुदैवाने मंत्र्यांतही आहेत. हे अपवाद म्हणजे खरोखर आमची आशास्थाने. पण ती किती आहेत? आणि त्यांना महत्त्व किती?

□

दिलीप पुरुषोत्तम चित्रे

# विचारवंत आणि साहित्यिक

विचारवंत एकटा असूच शकत नाही. त्याच्या पाठीशी बुद्धिप्रधान सांस्कृतिक शिस्तीची लहानशी का होईना, जोरदार परंपरा असावी लागते. एकूण सांस्कृतिक वातावरणाचे चैतन्य जर सततच्या मर्मग्राही चिकित्सेने टिकावयाचे असेल तर अशी चिकित्सा स्वीकारणारा समाज भोवती हवा, निदान नेटाने अशी परंपरा जोपासणारा विचारवंतांचा एक वर्ग सतत अस्तित्वात हवा.

मानवाच्या कर्तेपणावर पूर्ण विश्वास ठेवल्यानंतरच मानवी बुद्धीवर संस्कृतिविकासाची जबाबदारी निःशंकपणे टाकता येईल. आपला समाज अजूनही पौराणिक आहे. त्यामुळे त्यात विचारवंतांचा वर्ग आणि त्यांची परंपरा अस्तित्वात असेल अशीसुद्धा शंका क्वचितच येते. श्रीज्ञानदेवांच्या काळापासून चिकित्सक आत्मभानाची व वस्तुविज्ञानाची परंपरा महाराष्ट्रात उत्पन्न होऊ शकली असती. पण ज्ञानदेवांनी जेथे सूक्ष्म, बुद्धिनिष्ठ विचार केला तेथेच त्यांच्या अनुयायांनी मात्र भक्तिमार्गी भावनेत त्यांच्या तत्त्वचिकित्सेचे विसर्जन करून टाकले. ही घटना वेगवेगळ्या रूपांत पुन्हापुन्हा घडत आलेली आहे. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात ज्या प्रबोधनांची चाहूल लागत होती ते विसाव्या शतकात हळूहळू क्षीणच होत गेले. अगदी नजिकच्या काळातल्या एका उदाहर-

णाने या शोकांतिकेचे स्वरूप स्पष्ट होईल. कै० रघुनाथ धोंडो कर्वे यांच्या चरित्राचा व कार्याचा आपण विचार करावा. १९२७ पासून त्यांनी 'समाजस्वास्थ्य' हे नियतकालिक चालवून, नाना समकालीन प्रश्नांची बुद्धिप्रधान व दूरदर्शी चिकित्सा केलेली आढळते. कर्व्यांचे नाव कामशास्त्रीय विचार, लैंगिक शिक्षण, व संततिनियमन यांच्याशी निगडित झालेले आहे. पण त्यांनी इतर अनेक सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक प्रश्नांचा बुद्धिप्रधान व चिकित्सक दृष्टीने विचार केला आणि मांडला. कर्व्यांना फ्रॉईड, हॅवलॉक एलिस किंवा कीन्से यांच्याइतके महत्त्व स्वतःच्या समाजात मिळणे अशक्यच होते. पण बुद्धिवंत आणि विचार-वंत वर्गाच्या दृष्टीने तरी कर्व्यांची आज काय किंमत आहे? ज्या विचार-वंताला कोणत्याही विचारवंतांच्या परंपरागत मोहिमेत स्थान मिळाले असते, तो एखाद्या बेटासारखा एकटा राहून जाणे, याचा समाजापेक्षाही समाजातल्या बुद्धिजीवी वर्गाकडे जास्त दोष येतो. लोकहितवादींपासून आजवर पाहिले तर हेच दिसेल की, महाराष्ट्रातल्या एखाद्या विचारवंताची व्यक्तिपूजा एक वेळ कालांतराने तरी होईल, पण त्याने जो वैचारिक वादसंवाद उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला तो मात्र टिकणार नाही. तो त्याच्या मृत्यूसकटच मरण पावेल.

महाराष्ट्रातल्या सार्वजनिक जीवनात राजकारणाला अत्यधिक महत्त्व मिळाले आणि त्या प्रमाणात वैचारिक जीवन प्रगल्भ झाले नाही. यामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणालासुद्धा सांस्कृतिक शिस्तीचा भक्कम पाया लाभला नाही. मुळातच ही सांस्कृतिक शिस्त अंगी न बाणवल्यामुळे, आपला समाज अजून विचारवंत वर्गाचा उपयोग करून घेण्यास असमर्थ आहे, आणि याचा परिणाम म्हणजे आपल्या येथील व्यक्तिजीवनाची व समाजजीवनाची गुणवत्ता वाढणे शक्य होत नाही.

## संस्कृतीची मूलभूत सूक्ष्मलिपी

संस्कृती ही एखाद्या मूलभूत सूक्ष्मलिपीसारखी असते. सजीव पेशी-तल्या सूक्ष्मलिपीत ज्याप्रमाणे स्वतःचे संवर्धन करण्याची व विविध शाखल्यांच्या रूपाने वेगवेगळी कार्यक्षम रूपे धारण करण्याची शक्ती असते, तशी मूळ सांस्कृतिक सूक्ष्मलिपीत ती असते. विविध ज्ञानशाखांचा

विस्तार, कलात्मक सर्जन, विविध स्वायत्त सामाजिक संस्थांची निर्मिती, या सर्व गोष्टींचा संबंध समाजाच्या मूळ सांस्कृतिक पेशींशी पोहोचतो. जीवनाबद्दलचा, स्वतःविषयीचा व नैसर्गिक बाह्य विश्वाबद्दलचा दृष्टिकोण या सूक्ष्मलिपीत ग्रथित झालेला आढळतो, असा माझा कयास आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीने आपण बुद्धिप्रधान व प्रयोगक्षम असल्याचा टेंभा अनेकदा मिरवला आहे, पण त्यात मला तथ्य आढळत नाही. याचाही संबंध मी मुळात पुराणाभिमानी असलेल्या आणि सांस्कृतिक प्रयोगक्षमता नसलेल्या समाजाशी लावतो. विचारवंतांचा एकजीव असा वर्ग (म्हणजे एकमत असलेला नव्हे, पण बुद्धिप्रधान संस्कृतिकल्पनेला बांधलेला) महाराष्ट्रात असता तर परिस्थिती झपाट्याने बदलली असती.

## विचारवंत आहेतच कोठे?

आज असे होण्याची चिन्हे फारशी दिसत नाहीत. याचे कारण, विचारवंत म्हणवले जाणारे व म्हणवून घेणारे महाराष्ट्रीय बहुधा खऱ्या अर्थाने विचारवंत नाहीतच. येथे माजणाऱ्या वेगवेगळ्या वादांचे विश्लेषण करून पाहिले तर असे दिसून येते की, त्यांत बुद्धिप्रधानतेचा मुलामा दिलेले आवाहक वक्तृत्वच जास्त असते. ही दर्शनी बुद्धिप्रधानता राजकीय व राजकीयसदृश नेतृत्वातून आलेली आहे, हे समजण्यास अडचण पडत नाही. स्वातंत्र्यपूर्व इतिहासाचा हा वारसा आहे. युक्तिवादी आवाहक कौशल्य आणि स्वतःची प्रतिष्ठित प्रतिमा स्थापन करण्यासाठी लागणारे 'इल्म' सर्वत्र पुष्कळ दिसते. त्यामुळेच किमान वैचारिक शिस्तसुद्धा नसलेले लोक सरसकट सर्व विषयांना हात घालावयाला धजतात.

सर्जनशील लेखक याच वर्गात मोडतील. आचार्य अत्र्यांपासून अशोक शहाण्यांपर्यंतचे सर्व लेखक पाहिले तरी हीच गोष्ट स्पष्ट दिसेल की, बुद्धिप्रधान संस्कृतीच्या मूलभूत शिस्तीला विरोध करणारी एक वृत्ती महाराष्ट्रीय लेखकांत कोठेतरी खोलवर रुजलेली आहे. जेव्हा सार्त्रचा, काम्यूचा, अलिकडे हर्बर्ट मार्क्यूजचा, आधार घेऊन महाराष्ट्रीय (विचारवंतसदृश) माणसे—तरुण लोक—एक बुद्धिविरोधी व नाठाळ वृत्तीचा पुरस्कार करतात तेव्हा माझ्या मनात त्यांच्या समजशक्तीविषयीच संदेह उत्पन्न होतो. (अत्र्यांविषयी निदान हा संदेह नाही!) पाश्चिमात्य संस्कृतीतला

'क्रायसिस' व भारतीय संस्कृतीतला 'क्रायसिस' हे वेगवेगळे 'पर्सनॅलिटी क्रायसिस' आहेत. त्यांतली साम्यविरोध-स्थळे पाहाताना त्यांचे वेगळे संदर्भ पाहिले पाहिजेत. यासाठी जी चिकित्सेची अवजारे लागतील ती बाहेरून आयात करण्यापूर्वी प्रथम बुद्धिप्रधान संस्कृतीची शिस्त आत्मसात केली पाहिजे. कवचातल्या कवचात हे करता येणार नाही. नुसत्या चळवळीं-उलाढालींनी हे होऊ शकत नाही.

## बुद्धिप्रधान वादसंवाद हाच उपाय

स्वतःच्या प्रतिमेकडे अवास्तव लक्ष पुरवणारा विचारवंत हा मूलभूत अर्थाने विचारवंतच नव्हे. सर्जनशील लेखक विचारवंत नसूनही थोर लेखक असू शकतो. पण या दोन भूमिकांची सरमिसळ झाल्याने सहज टाळ्या मिळाल्या तरी एक सांस्कृतिक न्यून कायमच राहून जाते. आपल्याकडे धड सर्जनशील लेखक नसलेले व विचारवंतही नसलेले लोक दोन्ही भूमिका पार पाडतात आणि त्यातली मख्खी कोणाच्या ध्यानातही येत नाही. विचारवंतावर इतर विचारवंतांचा, वैचारिक परंपरेचा, आणि शिस्तीचा अंतर्गत वचक नसल्यामुळे हे असेच चालू राहिले आहे.

यावर चुटकीसरसा असा कोणताही उपाय नाही. जर महाराष्ट्रीय विचारवंत—यात काही लेखकही आले—किमान बुद्धिप्रधान सांस्कृतिक शिस्त मान्य करून एक वर्ग या नात्याने परस्परांशी वादसंवाद करीत राहातील तर त्याचे संस्कार हळूहळू ह्या आकारशून्य आणि मख्ख समाजावरही होऊ शकतील.

गेल्या बारा वर्षांत मी सर्जनशील लेखक या नात्याने मराठीभाषिक समाजात वावरतो आहे. याच काळात प्रथम वाङ्मयीन प्रश्नांची चिकित्सा करताना आणि नंतर भोवतालच्या एकूण सर्व सांस्कृतिक जीवनाचे स्वरूप समजून घेताना काही गोष्टी माझ्या दृष्टोत्पत्तीला आल्या आहेत. एका परीने स्वतःचे लेखन आणि भोवतालचे जीवन यांचा परस्परसंबंध तपासताना पुढले सर्व निष्कर्ष मी काढले आहेत. तरी ते वस्तुनिष्ठ स्वरूपाचे निष्कर्ष आहेत, त्यांचा त्या दृष्टीने विचार करता येईल, असा मला भरवसा वाटतो.

## साहित्याचा सांस्कृतिक संदर्भ

माझा स्वतःचा लेखक म्हणून विचार करताना मी स्वतःची आवश्यक पूर्वपरिस्थिती कोणती, असा स्वतःलाच प्रश्न करतो. ज्याअर्थी मी मराठी भाषा वापरतो, त्याअर्थी मराठी भाषेचे किमान व्यवहाराचे नियम तरी मी पाळतोच. या भाषेतल्या शब्दांचा मी निवेदनासाठी उपयोग करतो. या भाषेतल्या वाक्यरचनांचे आदर्श समजून त्या संदर्भात मी माझी वाक्ये रचतो. ही भाषेची जाणीव हे माझे सामाजिक व्यवहाराचे इंद्रिय आहे. इंग्रजी भाषा वापरताना मी निराळे नियम पाळतो, निराळे वाक्यादर्श समोर ठेवतो. आता, मराठी भाषेत केले जाणारे जे काही व्यवहार आहेत ते मराठीभाषिकांच्या सांस्कृतिक संकेतांना व वैचारिक जीवनाला बांधलेले आहेत. याचा अर्थ असा की, या व्यवहारांना मराठीभाषिकांच्या सांप्रतच्या जीवनाचा व त्यांच्या सांस्कृतिक परंपरेचा संदर्भ आहे.

यामुळे सर्जनशील लेखकाचा संबंध एकूण सांस्कृतिक परिस्थितीशी पोहोचतो. तो जे लिहितो त्याची निवेदनक्षमता त्याच्या भाषिक व्यवहारांमधल्या गुणांवर अवलंबून असते. पण हे भाषिक व्यवहार परंपरागत असल्यामुळे जितपत तो परंपरागत संदर्भात व्यवहार करतो तितपतच तो इतरांना आकलनीय ठरतो. यामुळे जसे विचारवंत एकटे उत्पन्न होत नाहीत तसे आधुनिक लेखकही एकटे उत्पन्न होऊ शकत नाहीत. (चांगल्या-वाइटाचा मी येथे विचार करत नाही.) त्यासाठी छोटासा का होईना, आधुनिक माणसांचा *वर्ग* असावा लागतो. आधुनिकतेची अशी एक परंपरा असावी लागते.

## समाईक 'वातावरण'

येथे एका विशिष्ट गोष्टीची आपल्याला दखल घ्यावी लागेल. भारतात आधुनिकता इंग्रजी शिक्षणाद्वारा आली. पण इंग्रजी येणे म्हणजे आधुनिक असणे नव्हे. माझ्या मते आधुनिक असणे म्हणजे निर्णायकपणे आत्मचिकित्सा करत राहून प्रत्येक गोष्ट स्वतःच्या बुद्धीवर आणि अनुभवावर पारखून घेणे; प्रत्येक बाबतीत प्रयोगतत्पर दृष्टिकोण ठेवणे. आधुनिक विचारवंत आणि सर्जनशील लेखक या दोघांनाही ही वृत्ती समाईक आहे.

दोघेही चिकित्सक बुद्धीने स्वतःचे व भोवतालच्या जीवनाचे परीक्षण करत असतात. याचा अर्थ लेखन ही एक बौद्धिक शिस्तच आहे असा नव्हे. पण लेखन ही एक प्रगल्भ सांस्कृतिक शिस्त आहे. इतर अनेक संस्कारांशी तिचा संबंध आहे. सर्जनशील लेखन जरी मुळात मानवी संवेदनस्वभावाच्या अत्यंत मूलभूत गुणांवर आधारलेले असले तरी लेखकाची आविष्कार-क्षमता वाढते ती समग्र संस्कृतीचे गुणदोष मुळातून अनुभवून आणि पारखून. तो ज्या माध्यमातून आविष्कार करतो त्यावरली त्याची पकड ही त्याची संस्कृतीवरलीच पकड होय. आणि हा व्यवहार एकतर्फी कधी असूच शकत नाही. त्या त्या काळचे वेगवेगळ्या क्षेत्रांतले प्रतिभावंत एक वातावरण निर्माण करत असतात. त्या त्या संस्कृतीत जगू पाहाणाऱ्या माणसांचे मूलभूत आणि निर्णायक महत्त्वाचे प्रश्न या वातावरणात धसाला लागत असतात. हे वातावरण जितके प्रखर असेल तितकी त्याची विचार-वंतांना आणि सर्जनशील लेखकांना आच लागेल. प्रतिभेचा मुक्तपणा मी मान्य करतो, पण तिच्या आविष्काराचा विशाल संदर्भ मला डोळ्या-आड करता येत नाही.

सर्जनशील लेखकाचा विचारवंतांच्या जगाशी संबंध येतो तो समीक्षकां-द्वारा. वाङ्मयीन समीक्षेचे स्वरूप एक वैचारिक शिस्त असे आहे. समीक्षेमध्ये सर्जनशील कृतींचे विश्लेषण व मूल्यमापन होऊन, तिचा समकालीन सांस्कृतिक जीवनाशी असलेला संबंध स्पष्ट केला जातो आणि एकूणच वाङ्मयपरंपरेशी तिचे नाते दाखवले जाते. महाराष्ट्रात ही परंपरा त्रोटक आणि विस्कळीत आहे. याचा संबंध थेट एकूण मराठी वैचारिक जीवनाच्या कमजोरीशीच लागतो. उत्तम, संवेदनाक्षम आणि चिकित्सक समीक्षा महाराष्ट्रात दुर्मिळ आहे. कारण, तिला साजेसे वैचारिक वातावरणच उपलब्ध नाही. जेथे वेगवेगळ्या वैचारिक शिस्तींना स्वतंत्र अस्तित्वच नाही, तेथे वेगवेगळ्या शिस्ती संकराने फळण्याची भाषाच बोलता येत नाही. मुळात जी सांस्कृतिक शिस्त हवी, तिचाच येथे दुष्काळ आहे.

अव्वल इंग्रजीचा काळ आणि या शतकाच्या सुरुवातीपर्यंतचा काळ यात मराठी विचारवंतांनी आणि सर्जनशील लेखकांनी झपाट्याने प्रगती केली. त्यांच्या कार्याची गुणवत्ता काहीही असो पण पुढल्या कार्याला त्यांनी संदर्भ उत्पन्न केला. मात्र विसाव्या शतकात हा वेग अगदी

मंदावला. त्यामुळे अजून आपण एकोणिसाव्या शतकातच असल्याचे वारंवार जाणवते.

वाङ्मयाकडे पाहिले तर अनेक नवे वाङ्मयप्रकार गेल्या शतकात नव्याने मराठीत आले. पण 'प्रकार' आधी आले आणि त्यांच्या मुळाशी लागणारा आधुनिक संवेदनस्वभाव मात्र फार मंदपणे व अल्प प्रमाणात उत्पन्न झाला. उदाहरण ? मराठी कादंबरी. हीच गोष्ट वैचारिक क्षेत्रात दिसते. जर पाश्चिमात्य विचारपरंपरा खरोखर महाराष्ट्रात मुरल्या असत्या तर महाराष्ट्रात 'ओरिजिनल' आधुनिक विचारवंत उत्पन्न झाले असते. प्रत्येक क्षेत्रात आविष्काराची तंत्रे असतात. आणि या तंत्रांची प्रयोगक्षमता ताडून पाहिली की आपल्याला त्या क्षेत्रातल्या प्रगतीचा अंदाज येतो.

मला असे दिसते की, आधुनिकतेने मराठी जीवनाला जो हादरा दिला तिच्यामुळे मराठी जीवन फक्त द्विधाचित्त बनले. धड परंपरेवर पकड नाही आणि धड आधुनिकतेवर विश्वास नाही अशी परिस्थिती उत्पन्न झाली. शंभर वर्षांपूर्वी माणसे बिस्कुटे खाऊन सुधारक होत; आज ड्रेनपाइप-विजार घालून होतात. बाह्यांग मढवून आधुनिक होण्याची ही युक्ती मराठी विचारवंतांना आणि सर्जनशील लेखकांना समाईक आहे. पूर्वी मी महाराष्ट्रात विचारवंत म्हणण्यासारखे नाहीत, असे म्हटले. यात भर टाकून महाराष्ट्रात सर्जनशील म्हणण्यासारखे लेखकही नाहीत, असे म्हटले पाहिजे. कोठेतरी या दोन्ही गोष्टींचे कारण एकाच सांस्कृतिक न्यूनामध्ये आहे, असा मला संशय येतो.

□

वसंत पळशीकर

# आम्ही मराठी विचारवंत

मराठी विचारवंत या विषयावर लिहिणे एकंदरीत कठीणच. कारण, आपल्या स्वतःसंबंधी आणि आपल्या मित्रासंबंधीच लिहावयाचा प्रसंग आहे.

लेखाच्या सोयींसाठी काही गोष्टी स्पष्ट केल्या पाहिजेत. मराठीत लिहिणारे विचारवंत, ही या लेखाची पहिली मर्यादा. महाराष्ट्रीय विचारवंत—इंग्रजीतून लिहिणारे—यांच्याबद्दल जसे येथे काही लिहिलेले नाही, तसेच जे छाप्याच्या 'प्रकाशा'त नाहीत तेही विचारवंत—आणि तसे विचारवंत असावेत निश्चित—येथे विचारात घेतलेले नाहीत. आपल्याला या विषयावर लिहिण्याचा प्रसंग येईल याचे पूर्वज्ञान नसल्याने मराठीतून लिहिणाऱ्या सर्व विचारवंतांचे लेखन वर्षानुवर्षे काळजीपूर्वक प्रस्तुत लेखकाने वाचलेले नाही. त्याचा स्वतःचा जो आंशिक अनुभव, त्यावर आधारलेली काही आत्मनिष्ठ मते, असे या लेखाचे स्वरूप आहे. बराचसा हा आत्मनिरीक्षणाचाच प्रयत्न आहे असे म्हटले तर चूक होणार नाही.

विचारवंत म्हणून आपला व आपणासारख्या इतरांचा विचार करता येईल का, या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण जाते. आपल्या अभ्यासाच्या विषयातही आपले अतिशय अपुरे वाचन आणि असमाधानकारक चिंतन पाहिल्यावर विचारवंत बनण्याची आपली इच्छा भलेही उत्कट

असो, आपण स्वतःला उत्कट विचारवंत म्हणू शकत नाही, ही गोष्ट सूर्यप्रकाशाहूनही अधिक स्वच्छ दिसते.

## ढिसाळ लेखन व चर्चा

प्रसिद्ध होणाऱ्या लेखनाच्या कसोटीवर ताडून पाहातादेखील, विचारवंत हे विशेषण ज्यांना उद्देशून सार्थपणे वापरता येईल अशा व्यक्ती चारदोनच नजरेसमोर टिकतात. सोयीसाठी अ-ललित विषयांवर लेखन करणाऱ्या सर्वांनाच 'विचारवंत' या कोटीत घातलेले बरे असते हे वेगळे. शिक्षणसंस्थांशी कोणत्याही नात्याने का असेना, पण बरीच वर्षे संबंध आलेला स्वतःस शिक्षणतज्ज्ञ म्हणून घेतो, तितकाच हा खुळचट प्रकार. बाकीच्यांना 'विचारवंत' म्हणावेसे वाटत नाही ते का? तर १. लेखनात विषयाच्या ज्ञानाचे कच्चेपण जाणवते; २. लेखनात व्यक्त झालेली मते, त्यामागील विवेचन यांमध्ये त्याच्या स्वतःच्या चिंतनापेक्षा उसन्या शिदोरीचा वास मारतो; ३. लेखन अघळपघळ असते; ४. विचारवंतांच्या ठिकाणी वैचारिक जीवनाला प्रथम व उत्कट निष्ठा असायला हवी, या अपेक्षेचा भंग करण्याइतके ते लेखन जुजबी, घाईघाईत उरकलेले व विस्कळीत असते; ५. प्रसंगी विशिष्ट लेखन उत्कृष्ट असते, पण ती उत्कृष्टता तांत्रिक स्वरूपाची असते; विचारवंतांच्या ठिकाणी सर्वव्यापी अशी मूल्यदृष्टी, तत्त्वविचार असायला हवा. त्याचा प्रत्यय त्या लेखनात आढळत नाही; आणि ६. बहुतेक वेळा व्यावसायिक जीवनाचे, हितसंबंधांचेच एक अंग (एक्स्टेन्शन) असे लेखनाचे स्वरूप असते. विचाराविषयीच्या पोटतिडिकेतून ते निःस्वार्थी वृत्तीने प्रकट झालेले असत नाही.

आपल्याकडील बहुतेक परिसंवाद, चर्चासत्रे वेळ वाया घालविणारी, मुद्याला सोडून भरकटणारी व उथळ चर्चेला जन्म देणारी ठरतात, हा सार्वत्रिक अनुभवही या संदर्भात महत्त्वाचा व अर्थपूर्ण आहे.

विचारवंत म्हणून जगण्याची बौद्धिक कुवत असलेल्या व्यक्ती आपल्या समाजात नाहीतच, असा निष्कर्ष मात्र निघत नाही. निरीक्षण असे की, ज्यांच्यापाशी अशी बौद्धिक कुवत दिसून येते अशांनीही विचारवंत-जीवनाची निवड केलेली नाही. याचे स्पष्टीकरण काय देता येईल?

## बुद्धिविरोधी संस्कार

स्वातंत्र्योतर काळासंबंधी, व स्वतःच्या आत्मनिष्ठ निरीक्षणाच्या आधारे,या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न लेखाच्या पुढील भागात केला आहे.

आमच्यापैकी बहुतेकांची जीवने प्रवाहपतित आहेत. आमची कौटुंबिक व्यवस्था व कुटुंबातील संस्कार हे व्यक्तीला निर्घृणपणे वयात आल्या क्षणापासून पोटापाण्याच्या व्यवसायाकडे, संसाराकडे ढकलत असतात. या बाबतीत आमच्या घरांतून 'ब्रेन-वॉशिंग' जवळपास परिपूर्ण अवस्थेला पोचले आहे. या प्रक्रियेतील निर्घृणता, पशुता बहुसंख्य मुलांमुलींना जाणवते असे दिसत नाही. जनावरांच्या आंधळेपणाने आणि स्वार्थी वृत्तीने बुद्धिमान मुलेमुली चांगल्या 'करिअर'च्या मागे धावताना दिसतात. विचारवंतांचे जीवन हे साहसी जीवन आहे, बंडखोर जीवन आहे, आर्थिकदृष्ट्या असुरक्षित असे जीवन आहे. आपली सारी समाजव्यवस्था, कौटुंबिक व्यवस्था साहस, असुरक्षितता आणि बंडखोरी या वृत्तींना पापी मानणारी आहे. या प्रचंड सामाजिक 'ब्रेन-वॉशिंग'-मधून शंभरांत एक तरी वाचत असेल की नाही शंकाच आहे !

अशा रीतीने, पुढे विचारवंतांच्या कोटीत सामील होणाऱ्या बहुसंख्य व्यक्ती मुळात खची झालेल्या असतात. त्यांची बुद्धी शाबूत असते, पण ती संसाराच्या गाड्याला जुंपलेली असते. विचारांबद्दलची आस्था उत्कट असते, पण आपले सुरळीत चालणारे कौटुंबिक व सामाजिक जीवन सुस्थितीत व सुबक राखण्यासाठी त्या उत्कटतेला अमूर्तांच्या चौकटीतच राखण्याची काळजी घ्यावी लागते. व्यावसायिक व कौटुंबिक हितसंबंधांची पकड नकोशी वाटत नसते, तिचाच एक आधार असतो. मुळाशीच कोठे तरी कीड लागते.

## सुरक्षिततेचा विचार प्रबळ

भारतासारख्या दरिद्री, विषम समाजस्थितीत विचारवंताचे जीवन पत्करणे विशेषच कठीण आहे. वर्तमानकालीन दैनंदिन जीवनाशी संबंध न आणता जेथे तांत्रिक ('शास्त्रीय') विचार करावयाचा असतो तेथे उत्कृष्टता साधणे तुलनेने सोपे आहे. सामाजिक शास्त्रांच्या क्षेत्रातही अशी

तांत्रिक उत्कृष्टता साधता येते. तज्ज्ञ व विचारवंत यांतील फरक असा की, विचारवंत हा जीवनविषयक मूल्यांना, तत्त्वांना, दृष्टीला प्रतिज्ञाबद्ध असतो. अशा प्रतिज्ञाबद्ध विचारवंताला आपला विचार आणि आपले वैयक्तिक जीवन यांमध्ये कायम पडदा टाकून ठेवता येत नाही. केव्हा ना केव्हा या दोन्हींचा सामना होतो. भारतासारख्या देशात, अन्याय, दारिद्र्य, विषमता या बाबतींतले आपले कर्तव्य काय, हा प्रश्न विचारवंताला टाळता येत नाही. पण त्या बाबतीत विचाराला एकनिष्ठ राहून भूमिका घ्यावयाची तर प्रतिष्ठित समाजाशी संघर्ष अटळ ठरतो. कोणत्या तरी क्षणी, बहुसंख्य (संभाव्य विचारवंत) व्यक्ती—अबोध पातळीवरही असेल—आपले प्रतिष्ठित व्यावसायिक कौटुंबिक जीवन सुरक्षित राखण्याचा निर्णय घेतात. भूतदयेच्या, माणुसकीच्या पातळीवर त्यासाठी सबळ कारणे असतात. पण मग विचारात कच्चेपणा येतो. एका सुरक्षित चौकटीत विचार विरघळ्या घालीत राहातो, वा केवळ तांत्रिक उत्कृष्टतेच्या दिशेने तो विकसित होतो. विचारवंताचे जीवन जगणे हे उघड्या डोळ्यांनी हौतात्म्य पत्करणे ठरत असल्याने विचारवंत दुर्मिळ असावेत ही एक अत्यंत स्वाभाविक गोष्ट आहे.

## लेखन निकृष्ट का?

आपल्या समाजात विचारवंत अभावानेच का आढळावेत याचे स्पष्टीकरण म्हणून वरील विवेचन पुरेसे असले तरी, जे काही विचारवंत आहेत त्यांचेही लेखन असमाधानकारक का, याचे स्पष्टीकरण त्यात मिळत नाही.

याचे एक साधे कारण, लेखनावर पुरेसे परिश्रम घेतले जात नाहीत, हे आहे. आपल्याकडे प्रसिद्ध होणारे बहुतेक लिखाण वस्तुतः पहिल्या कच्च्या खर्ड्याच्या स्वरूपाचे असते. प्रसिद्ध करणाऱ्याच्या ही गोष्ट लक्षात आली तरी तो नेहमीच ह्यासंबंधी कठोर धोरण ठेवू शकत नाही. याची कारणे पुढीलपैकी एक वा अधिक असतात :

१. आपल्याकडील पुष्कळसे वैचारिक लेखन हे लेखकांच्या स्वयंस्फूर्त इच्छेचा, अभ्यासाचा परिपाक म्हणून होत नाही; तर ते मनधरणी करून लिहवून घेतलेले असते. पुष्कळदा ते अगदी ‘आयत्या वेळी’ हाती येते. त्यामुळे आहे तसे स्वीकारल्याखेरीज पर्याय नसतो.

२. वाचकांबद्दल अनादराची भावना असते. त्यांचे समाधान कशाने होईल, याचा मनाशी अंदाज बांधून लेखन-प्रकाशन केले जाते.

३. लेखन करून आपण उपकार करतो आहोत अशी एका चमत्कारिक वृत्ती आढळते. भिकाऱ्याला वाढावी तशी लेखाची भिक्षा वाढली जाते.

४. 'इंग्रजीतले लेखन महत्त्वाचे; मराठीत लिहून विशेष उपयोग नाही; तेव्हा फुकट परिश्रम घ्या कशाला'—असा मराठीला कमी लेखणारा दृष्टिकोण आढळतो.

५. मराठी लेखनाला मोबदला कमी मिळतो; मोबदल्याच्या परिमाणात लेखन; अशी व्यवहारी भूमिकाही दिसते.

६. इतर, दैनंदिन व्यावसायिक जबाबदाऱ्या सांभाळून अव्वल दर्जाचे लेखन करण्याइतके स्वास्थ्य नसते. त्यामुळे इच्छा असूनही हवा तेवढा वेळ लेखनावर खर्च करता येत नाही. अजिबातच न लिहिण्यापेक्षा गुणवत्तेत न्यूनता पत्करूनही लेखन करण्याची उपयुक्तता वाटून लेखन केले जाते.

७. एखादे लेखन काटेकोर, परिपूर्ण करण्यासाठी ग्रंथालय, रजा, प्रवास, इत्यादी सोयी आवश्यक असतात. त्यांचा अभाव जाणवत असूनही त्या मर्यादा पत्करून लेखन करण्याखेरीज गत्यंतर नसते. कारण आर्थिक सुस्थिती—समाजाची वा स्वतःची—येईपर्यंत विचार व लेखन ही क्रिया स्थगित ठेवणे इष्ट नसते.

## परिस्थितीच्या मर्यादा

याशिवाय आजच्या परिस्थितीची काही वैशिष्ट्ये आहेत, आणि त्यांचा विचारवंताच्या घडणीवर चुकीचा परिणाम होतो.

१. विशिष्ट विषयात पदवी मिळाली, व विशेषतः त्या विषयाचा अध्यापक म्हणून ती व्यक्ती महाविद्यालयात काम करू लागली, की त्या विषयातील अधिकारी म्हणून समाज ह्या व्यक्तीस मान्यता देतो. महाविद्यालयातील 'प्राध्यापक'त्व हाच अधिकाराचा पुरावा म्हणून स्वीकारला जात असल्याने हे अधिकारीपण कोणी कोणाला नाकारू शकत नाही—विशेषतः प्राध्यापक = विचारवंत असे एक चुकीचे समीकरण रूढ झाले असल्याने.

२. वैचारिक स्पष्टवक्तेपणामुळे सामाजिक संबंध बिघडवून घेण्याचा धोका

पत्करणे हे 'असभ्य' ठरते, अहंकाराचे लक्षण ठरते. सामाजिक जीवनात वैचारिक निष्ठेला अत्यंत गौण स्थान देणारी आपली सध्याची संस्कृती आहे. वैचारिक क्षेत्रात जोमदार, स्पष्ट टीकेचा अभाव त्यामुळेच आहे. कोणी कोणाची दखल घेत नाही; घेतलीच तर, तोंडदेखले चांगले म्हणून प्रसंग साजरा केला जातो.

३. नातेवाईकांचा, मित्रांचा, शेजाऱ्यापाजाऱ्यांचा गोतावळा जोडून सुरक्षित कौटुंबिक जीवन जगणे याला आपल्या मूल्यश्रेणीत सर्वोच्च स्थान आहे. असे जीवन धोक्यात घालून काही करण्याची प्रवृत्ती कोणात दृग्गोचर झाल्यास त्या व्यक्तीच्या आसपासची सर्व मंडळी त्याला जारीने परावृत्त करू लागतात. विक्षिप्त म्हणून त्याचा आदर करीत, आपण मात्र तसे वागणार नाही, याबद्दल दक्षता बाळगतात. विचाराला वाहिलेले जीवन हे आपल्या समाजात 'चक्रम'पणातच मोडते.

वरीलपैकी पहिल्या वैशिष्ट्यामुळे 'प्राध्यापक विचारवंतां'चा एक हास्यास्पद वर्ग आपल्या समाजात निर्माण झाला आहे. दुसऱ्या वैशिष्ट्यामुळे त्याला आवर घालणे अशक्यप्राय होऊन बसले आहे. आणि तिसऱ्या वैशिष्ट्यामुळे, अधूनमधून पिकनिकला जावे त्या थाटात सहल म्हणून वैचारिक भ्रमण करण्यात समाधान मानणारा विचारवंत व यातच समाधान पावणारा समाज निर्माण होत आहे.

यावर इलाज काय? एकंदरीतच आपले काम चोखपणे करावे, हे मूल्य सर्व समाजव्यवस्थेत मान्य होण्याची आवश्यकता आहे. विचारवंताचे जीवन जगण्याची इच्छा करणाऱ्यांना आतूनच पोटतिडीक निर्माण व्हायला हवी की आपले काम उत्तम झाले पाहिजे, व त्यासाठी आवश्यक तर समाजाचा, कुटुंबाचा रोष पत्करला पाहिजे, जीवन असुरक्षित होईल हा धोका पत्करला पाहिजे, स्नेह आड येऊ न देता कठोरपणे परस्परांच्या विचारांची व लेखनाची चिकित्सा करण्याची व त्या टीका-प्रतिटीकेतून स्नेहात अंतर पडणार नाही अशी परंपरा निर्माण केली पाहिजे.

हे कसे होईल? ज्याने त्याने आपल्या जागी आत्मशुद्धी करावी हा एकच मार्ग दिसतो.

□

मधु पानवलकर

# विचारवंत, समाज आणि शासन

मराठी समाजात विचारवंतांना काही म्हणण्यासारखे स्थान आहे, समाजाकडून वा शासनाकडून त्यांची कदर केली जात आहे, वा त्यांनी कदर करावी असे कार्य विचारवंतांकडून होत आहे, असे म्हणण्यासारखी वस्तुस्थिती नाही. स्पष्टच बोलायचे तर असे म्हणावे लागेल की, या तीन घटकांचे सांधे परस्परांशी जुळलेलेच नाहीत. 'विचारवंत' नावाच्या प्राण्याला मराठी समाजात मानाचे स्थान लाभलेले नाही; कदाचित असेही म्हणावे लागेल की, समाजाचा आदर व मान संपादन करण्यात विचारवंत असमर्थ ठरले आहेत. प्रथमदर्शनी ही विधाने स्वीकारणे थोडे जड जाईल, हे उघड आहे. इंग्रजी राजवट येथे स्थिरावण्यापूर्वीच तिचे कठोर विश्लेषण करणारे लोकहितवादी, आणि कार्ल मार्क्स युरोपात कम्युनिस्ट जाहीरनामा लिहीत असताना तशाच स्वरूपाचे समतावादी विचार मांडणारे विष्णुबुवा ब्रह्मचारी हे ज्या अर्वाचीन महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेतील अग्रदूत, त्या राज्यात विचारवंतांना गौणस्थान लाभावे, हे चमत्कारिक वाटणारच.

पण विचारवंत म्हणजे हस्तिदंती मनोऱ्यात तात्त्विक गूढगुंजन करणारा प्राणी, ही कल्पना येथेही खोल रुजलेली आहे. हे तात्त्विक गूढगुंजन तत्त्ववेत्त्यांच्या बैठकीत मोलाचे ठरत असले तरी तत्त्व आणि व्यवहार वेगळा

असल्याने दैनंदिन जीवनात त्याचे महत्त्व यथातथाच ठरणार, ही समजूत सार्वत्रिक आहे. समाजजीवनाच्या मुख्य प्रवाहाशी समरस न होणाऱ्या शक्ती अशाच बाजूला फेकल्या जाणार व उपेक्षित बनून राहाणार हे समजण्यासारखे आहे.

## गेल्या शतकातील विचारजागृती

वस्तुतः आधुनिक महाराष्ट्र घडविण्याचे बरेचसे श्रेय इंग्रजी अमदानीतील विचारवंतांनाच द्यावे लागेल. पेशवाईचा अंत झाल्यावर मराठी लढवय्ये व राजकारणी दोघेही हतप्रभ झाले होते. पुढारलेल्या वर्गांनी इंग्रजी विद्या आत्मसात करून सांधा जुळवून घेतला व अल्पावधीतच समाजाचे नेतृत्व आपल्याकडे घेतले. अव्वल इंग्रजीपासून स्वातंत्र्याच्या उषःकालापर्यंत हा प्रकार अखंडपणे चालत आला, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. विचारवंत नेत्यांची जी एक मालिका राज्यात निर्माण झाली तिने मराठी समाजाचे मन घडविले. त्यांतूनच एक प्रगतिपर समाज साकार झाला. स्त्रीचे समाजातील स्थान ही समाजाच्या सुसंस्कृतपणाची एक कसोटी मानली जाते. सबंध उत्तर भारतात आणि केरळसारखा एखादा अपवाद सोडला तर दक्षिण भारतात स्त्रीचे स्थान काय आहे? उत्तरेतील हिंदू स्त्रीचीही पडद्यातून सुटका झालेली नाही. तिला शिक्षणसंस्थांचे दरवाजे उघडे असून त्यात शिरता येत नाही किंवा घराचा उंबरठा ओलांडून सामाजिक क्षेत्रात तिला पदार्पण करता येत नाही. स्त्रीला समानतेने वागविण्याचा प्रश्न मग दूरच राहातो. महाराष्ट्रातील स्त्री उत्तरेतील सर्वसाधारण स्त्रीच्या पन्नास-पाऊणशे वर्षे पुढे आहे. महाराष्ट्रात धर्मभोळेपणाही बराच कमी आढळतो. सोवळे-ओवळे, जातीय वा वर्गीय भेदाभेद यांची तीव्रता काही प्रमाणात कमी झालेली आहे; रोटीव्यवहारात आता फारसा विधिनिषेध उरलेला नाही. आणि आंतरजातीय विवाह लोकांच्या चर्चेचा विषय बनून राहाण्याइतके दुर्मिळ उरलेले नाहीत. गोवधबंदीच्या प्रश्नावर उत्तरेत रणे माजली व काँग्रेसला सत्ताभ्रष्ट व्हावे लागले; पण मराठी समाजाची प्रतिक्रिया कितीतरी संयत व समजूतदारपणाची होती. गेल्या शतकातील कर्त्या पुरुषांनी केलेल्या विचारजागृतीचाच हा परिणाम म्हणावा लागेल.

## बहुजनसमाज आणि पांढरपेशे

परंतु गेल्या शतकातील वरील प्रयत्नांचे पुरते माप पदरात पडू शकले नाही. सत्यशोधक चळवळीने वेगळाच विचारप्रवाह निर्माण केला. तो सर्वस्वी अप्रस्तुत वा अनपेक्षित होता, असेही म्हणता येणार नाही. मराठेशाहीत सत्ता उपभोगलेला फार मोठा वर्ग ब्रिटिश अमदानीत सत्तेला वंचित झाला. पांढरपेशांनी इंग्रजी विद्या शिकून अधिकारस्थाने प्राप्त करून घेतली व सत्तेत वाटा मिळविला. बहुसंख्य समाजाच्या कर्तृत्वाला पुरेसा अवसर न उरल्याने त्याची प्रतिक्रिया होणे क्रमप्राप्त होते. ती प्रतिक्रिया पांढरपेशांबद्दलच्या असंतोषाच्या रूपाने व्यक्त झाली व त्यातून निर्माण झालेल्या कटुतेने महाराष्ट्राचे वैचारिक जीवन कित्येक दशके ग्रासून टाकले. त्याच काळात विचारवंतांची समाजावरील पकड ढिली झाली आणि ते स्थान त्यांना पुन्हा केव्हाही परत मिळविता आले नाही. बहुसंख्य समाजाच्या आशाआकांक्षा समजून घेण्याचा त्या वेळी प्रयत्न झाला असता तर ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाची तीव्रता बरीच कमी होऊ शकली असती, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. तसा प्रयत्न त्या वेळी झाला नाही.

राजकीय जागृती, स्वातंत्र्यलढ्याची चढती कमान व राजकीय सुधारणांनी विस्तारित होत गेलेले सत्तेचे दालन इत्यादी कारणांनी वाढू लागलेल्या समाजाच्या आकांक्षांची स्वातंत्र्यचळवळीशी सांगड घातली गेली ती फार उशिरा; पण तोपर्यंतच्या काळात बहुजनसमाज आणि बुद्धिजीवी पांढरपेशे यांच्या दरम्यान एक मोठी दरी उभी राहिली होती. बहुजनसमाजाला पुढारलेल्या वर्गाविषयी एक प्रकारची असूया व अविश्वास वाटत असे, तर पुढारलेल्या वर्गात बहुजनसमाजाविषयी अनास्था आणि उपेक्षा आढळत असे. बहुतेक विचारवंतही याला अपवाद नव्हते. राजकीय चळवळ तीव्र बनून बाकीचे भेदाभेद झाकले गेल्यावर या दोन महत्त्वाच्या समाजघटकांतील मनोभेद बऱ्याच प्रमाणात कमी झाले; परंतु नष्ट मात्र झाले नाहीत.

## लोकशाही पचनी पडली काय ?

वर्तमान महाराष्ट्राकडे पाहाताना ही पार्श्वभूमी लक्षात घेणे जरूर आहे. महाराष्ट्र हे एक बुद्धिप्रधान राज्य मानले जात असले आणि तसे म्हणवून घेण्यात आपणांला गौरव वाटत असला तरी महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनात तर्कदुष्टताच अधिक आढळून येते. बहुजनसमाजातील पांढरपेशांबद्दलचा असंतोष समजण्यासारखा होता, पण त्याला तात्त्विक आधार काहीही नव्हता. तसा तो असता तर त्या चळवळीतून जातीय कटुता निर्माण होण्याचे कारण नव्हते. तशी कटुता तर निर्माण झालीच, पण तिच्या पोटी विचाराची व विवेकाची उपेक्षाही निर्माण झाली. गुणवत्ता गौण ठरू लागली आणि संख्येचे माहात्म्य वाढले.

लोकशाहीमध्ये बहुसंख्याकांचेच प्राबल्य राहाणार, हे उघड असते. तेवढी एकच कसोटी असती तर लोकशाही आणि झुंडशाही यांच्यांत काही फरक उरला नसता; पण तो फरक आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला, कसलेही भेदाभेद आड न येता संपूर्ण संधी देणे, हे लोकशाहीचे एक महत्त्वाचे प्रयोजन आहे. ज्या समाजात जाती, धर्म, वर्ण इत्यादी भिंती उभ्या आहेत आणि पूर्वग्रहांनी ज्याला ग्रासलेले आहे तो समाज लोकशाही पचनी पाडू शकणार नाही. त्याला फारतर बाह्योपचार अवगत होतील, पण मर्म गवसणार नाही. मराठी समाजाची स्थिती यापेक्षा वेगळी आहे, असे म्हणता येईल काय? आपल्या सामाजिक आणि राजकीय जीवनात एखाद्या प्रश्नाचा, व्यक्तीचा वा घटनेचा जातिनिरपेक्ष विचार शक्य आहे काय?

समाज आणि शासन यांची सदसद्विवेकबुद्धी जागृत राखणारा, भविष्यकाळाचे वेध घेऊन दूरगामी विचार समाजाला देणारा, नित्य बदलत जाणाऱ्या परिस्थितीचे अनुसंधान राखून त्या परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या विविध समस्यांची उकल करण्याच्या दृष्टीने नव्या नव्या कल्पना समाजाला आणि शासनाला देणारा घटक, हे विचारवंताचे समाजातील खरे स्थान आहे—असले पाहिजे.

हे आपोआप कोणालाही मिळणारे स्थान नव्हे. त्यासाठी एक तपस्याच करावी लागते. निःस्पृहपणा व निर्भयपणा हे गुण तर हवेतच, पण

लोकप्रियतेचा मोह जसा टाळायला हवा त्याचप्रमाणे शासनापुढे झुकण्याची लाचारीही पत्करता नये. एका बाजूला लोकांचा रोष टाळण्याची धडपड आणि दुसऱ्या बाजूला शासनाची अवकृपा होऊ नये म्हणून चाललेला जिवाचा आटापिटा अशा कात्रीत सापडलेला विचारवंत आपली जबाबदारी कशी काय पार पाडू शकेल ?

## विचारवंतांची कर्तव्य-च्युती

स्वातंत्र्यानंतर कर्तृत्वाची अनेक क्षेत्रे आपणांला खुली झाली; अनेक नव्या जबाबदाऱ्या येऊन पडल्या; अनेक समस्या निर्माण झाल्या. एका नव्या आधुनिक राष्ट्राची उभारणी करणे हे सर्वांत मोठे कार्य होते. मराठी भाषिक राज्याची निर्मिती झाल्यावर आणखी काही प्रश्नांची त्यात भर पडली. लोकांना या सर्व प्रश्नांची जाणीव देऊन लोकजागृती करणे, हे राजकीय पक्षांचे काम असले तरी त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांची दखल घेऊन समाजाला मार्गदर्शक असा विचार पुढे मांडणे हे विचारवंतांचे काम आहे. विचारवंतांनी हे किती प्रमाणात केले ? आज सर्वत्र लोकांना हक्कांची जाणीव आढळते, पण कर्तव्यांची नाही; त्यांना आपले अधिकार माहीत आहेत, पण जबाबदारी नको असते.

संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेल्या चळवळीला जवळजवळ सर्व विचार वंतांचा पाठिंबा होता. पण ही चळवळ निर्दोषपणे चालली होती का ? तिच्यातील विध्वंसक भाग, आत्मकेंद्रित वृत्ती, विघटनकारी प्रवृत्तींना मिळणारा अवसर, संयुक्त महाराष्ट्र मिळाल्यावर तो कसा व कुणासाठी राबवावयाचा याविषयीच्या निश्चित विचाराचा अभाव इत्यादी दोषांची सर्व जबाबदारी त्या चळवळीच्या नेत्यांवर टाकून मोकळे होता येणार नाही. राजकीय नेते लोकमत जागृत करतात तसे काही वेळा त्याच्यामागे फरफटतही जातात. पण विचारवंतांनी अधिक दूरवरचा विचार करावयाचा असतो. ते घडले नाही. महाराष्ट्रात फैलावणाऱ्या द्वेषवादाची त्या वेळी कुणी फारशी दखलच घेतली नाही. आपली न्याय्य मागणी नाकारली म्हणून झगडणे जेवढे अवश्य होते तेवढेच त्या लढ्यातल्या उणिवांवर बोट ठेवून वेळीच लोकांना जागे करणेही अवश्य होते. भाषिक राज्य आणि भाषावाद यांतला फरक स्पष्ट करूनसांगणे, आपले अन्यप्रांतियांबरोबरचे संबंध कायम

राखण्याच्या दृष्टीने अवश्य होते. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रेमात या गोष्टी वाहून गेल्या आणि आता त्या निस्तरताना नाकी नऊ येत आहेत. याच संदर्भात प्रादेशिक आकांक्षा आणि राष्ट्रीय ऐक्य यांची सांगड घालण्याचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. शिवसेनेचे संकट समोर उभे राहीपर्यंत याची आपल्याला आठवणही झाली नाही आणि शिवसेनेने त्याची आठवण करून दिल्यावरही त्या प्रश्नाला आपण सामोरे गेलो नाही. मराठी माणसाची खरी व्यथा काय आहे, तिची कारणे काय आहेत, आपल्या समाजातील अंगभूत दोष तिला किती कारणीभूत आहेत आणि महाराष्ट्रीयेतरांचे प्राबल्य किती जबाबदार आहे इत्यादी प्रश्नांची वस्तुनिष्ठ चिकित्सा करून, या प्रश्नाची कशी उकल करता येईल याविषयीच्या काही मार्गदर्शनाची अपेक्षा समाजाने करू नये काय? शिवसेनेच्या मुंबईतील विजयानंतर 'द्रविड मुन्नेत्र कळघमची महाराष्ट्रीय आवृत्ती मुंबईत निघत आहे' अशी खोचक व महाराष्ट्राला अन्यायकारक टीका होऊनही या प्रश्नाची दखल घेतली जाऊ नये याला काय म्हणावे? आत्यंतिक आत्मकेंद्रित वृत्तीचा स्वीकार करण्यातील धोका, अप्रियतेचा व उपहासाचा धोका पत्करूनही लोकांपुढे मांडला पाहिजे.

## सर्वांगीण छाननी हवी

सगळ्या क्षेत्रांत पातळी ढासळत चालली आहे, असा सामान्य माणसांचा एक सार्वत्रिक ग्रह झालेला आहे. 'जुने शिक्षण चांगले होते, आजच्या शिक्षणात काही दम नाही; जुने नेते म्हणजे थोर विभूती होत्या, आजचे नेते त्यांच्या तोलामोलाचे नाहीत; ब्रिटिशांच्या वेळी कारभार कसा चोख होता आणि आता? सगळीकडे लाचलुचपत आणि वशिलेबाजी!' इत्यादी वाक्ये पदोपदी कानी येतात. अशी उथळ टीका प्रत्येक समाजात होतच असते, असे म्हणून किंवा साक्षात श्रीरामचंद्राबद्दल जेथे लोकांनी संशय घ्यायला सोडले नाही, तेथे मंत्र्यांची काय कथा? असा प्रतिप्रश्न विचारून या सार्वत्रिक अपसमजांचे निराकरण होऊ शकत नाही. निर्भय, वस्तुनिष्ठ विचार हाच त्यावरचा एकमेव उपाय आहे. असा विचार यापैकी एखाद्या बाबतीत मांडण्याचा संघटित प्रयत्न झाला आहे काय? नेतृत्व, प्रशासन, भ्रष्टाचार यांचाच येथे थोडा अधिक विचार करू या. 'लोकांच्या

लायकीप्रमाणे त्यांना प्रशासन लाभते,' हे उसने वाक्य फेकण्यापलिकडे या प्रश्नावर काही साधार, सप्रमाण बोलण्यासाठी काही साधनसामग्रीच आपल्याकडे उपलब्ध नाही. अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ आपल्याकडे येतात, आपल्या राजकीय पक्षांचा, त्यांच्या मूल प्रेरणांचा, त्यांच्या बलस्थानांचा, नेत्यांचा आणि त्यांच्या हितसंबंधांचा अभ्यास करतात व त्यांचे ग्रंथ आपण प्रमाणभूत मानतो. अशी चिकित्सा राजकीयदृष्ट्या अधिक जागृत असलेल्या महाराष्ट्रातही का होऊ नये? गेल्या वीस वर्षांत या राज्यातील सत्तारूढ पक्षाच्या नेतृत्वात महत्त्वाचे बदल झाले. त्याचे राज्याच्या राजकीय जीवनावर दूरगामी परिणाम झालेले आहेत. या स्थित्यंतराची सर्वांगपरिपूर्ण छाननी होणे भविष्यकाळाच्या दृष्टीने अवश्य आहे. पण विचारवंतांनी याचीही फारशी दखल घेतलेली नाही.

महाराष्ट्रात पंचायत-राज्य येऊन पाचसहा वर्षे होऊन गेली. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा एक महत्त्वाकांक्षी प्रयोग असा त्याचा गौरव केला जातो. या विकेंद्रीकरणामुळे जिल्हा-पातळीवर नवे नेतृत्व तयार होत आहे, असे सांगण्यात येते. ते अंशतः खरे असले तरी वस्तुस्थिती बरीच वेगळी व चिंताजनक आहे. सत्तेच्या राजकारणातले जिल्हापातळीवरील आखाडे किंवा 'मुनशिपालटी'ची वाढविलेली (सुधारून नव्हे) आवृत्ती असे स्वरूप त्यांना एवढ्यातच आले आहे. अधिक नुकसान होण्या-पूर्वीच या प्रयोगाची फेरतपासणी होणे जरुरीचे आहे. राजकीय पक्ष ही फेरतपासणी करणार नाहीत; कारण सर्वांचेच हितसंबंध त्यात गुंतलेले आहेत. मर्यादित क्षेत्रात प्राप्त झालेली अमर्याद सत्ता कोण वापरतात? त्यांची शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी काय आहे? त्यांचे हितसंबंध काय आहेत? त्यांचे समर्थक कोण आहेत? त्यांची कार्यपद्धती काय आहे? त्यांचा प्रशासकीय अनुभव काय आहे? त्यांचे चारित्र्य काय आहे? त्यांच्या सामाजिक व राजकीय प्रेरणा काय आहेत?—इत्यादी अनेक कसोट्यांवर जिल्हा-परिषदांतील नेतृत्व घासून पाहाणे, या राज्यातील राजकीय आरोग्य टिकण्याच्या दृष्टीने आणि व्यापक समाजहिताच्या दृष्टीने जरुरीचे आहे.

पण विचारवंतांनी राजकारणाकडे मुळी पाठच फिरविली आहे. विचा-राला थोडेफार महत्त्व देणारे विरोधी पक्ष संख्येच्या दृष्टीने दुबळ आहेत

आणि बहुमताच्या जोरावर राज्य करणे शक्य असल्याने सत्ताधाऱ्यांना विचाराचे लोढणे गळ्यात बांधून घेण्यात स्वारस्य नाही, अशी ही शोकांतिका आहे.

## बहुसंख्येच्या राजकारणात विचारवंत पोरके

विचारवंताचे समाजजीवनातील कार्य त्याच्या सभोवारच्या वातावरणावरही अवलंबून असते. जेथे विचाराला अनिर्बंध स्वातंत्र्य नाही, विचारांच्या खुल्या देवाणघेवाणीची शक्यता नाही, प्रतिकूल वा अप्रिय विचारही जेथे निर्भयपणे मांडता येत नाही किंवा जेथे विचाराचीच फारशी कदर केली जात नाही, तेथे वैचारिक हालचाल थंडावून विचारवंतांऐवजी पोपटांची संख्या वाढणार हे उघड आहे. कोणताही समाज विचारांच्या संघर्षातून पुढे जात असतो. वैचारिक संघर्ष हे त्या समाजाच्या जिवंतपणाचे, गतिशीलतेचे द्योतक असते. मराठी विचारवंत आपल्या कर्तव्याला विसरले आहेत, असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा समाजानेच त्यांच्यावर तशी पाळी आणलेली नाही ना, याचीही थोडी चिकित्सा करणे आवश्यक होऊन बसते. कळतनकळत का होईना, पण आपला समाज दिवसेदिवस व्यवहारवादी बनत आहे. लोकशाही म्हणजे बहुसंख्येचे राजकारण हे कठोर सत्य अर्धशिक्षित खेडुतांनाही आता चांगले कळून चुकले आहे. ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंतच्या निवडणुकींनी तो धडा त्यांना शिकविला आहे. सत्तेच्या वारूवर स्वार व्हावयाचे असेल तर निवडणुका जिंकल्या पाहिजेत व त्या जिंकण्यात विचार, तत्त्वनिष्ठा, नीतिमत्ता असल्या गोष्टींची काहीच मदत होत नाही. निवडणुका जिंकण्याचे मार्ग वेगळे असतात. राजकीय पक्षांच्या निवडणूक-जाहीरनाम्यांना फारसा अर्थ राहिलेला नाही, कारण त्यात प्रकट होणारा ध्येयवाद व प्रत्यक्ष राजकारण यांत कल्पनातीत अंतर पडले आहे. ग्रामपंचायत व लहान-लहान सरकारी संस्थांपासून लोकसभेपर्यंतच्या निवडणुकांचा हा 'पॅटर्न' आता ठरून गेला आहे. त्यात तात्त्विक चर्चेला तर राहू द्याच, पण संबंधित संस्थेपुढील प्रश्नाच्या गंभीर चर्चेलाही काही स्थान उरलेले दिसत नाही. बहुमतवाद हा सत्तेप्रत पोचण्याचा राजमार्ग असल्याने येनकेनप्रकारेण आपले बहुमत करणे हा कार्याचा केंद्रबिंदू बनला आहे.

अशा वातावरणात विचार आणि विचारवंत—दोघांनाही गुदमरून जावे लागले नाही तरच नवल.

## विचार-माध्यमांचा दुबळेपणा

वृत्तपत्रे ही आधुनिक समाजातली मोठी शक्ती आहे. ते जनता-संपर्काचे जसे साधन आहे तसेच लोकशिक्षणाचेही आहे. ग्रामीण भागातील वृत्तपत्रांना आपल्या सभोवारच्या जीवनाचे अधिक जवळून दर्शन घेता येते. लोकांच्या अडी-अडचणींची, गरजांची, विचारांची त्यांना अधिक माहिती असते—निदान असावी अशी अपेक्षा असते. पण त्यांच्या स्तंभांतून त्याचा प्रत्यय येत नाही. सभोवारच्या घटनांचा निर्भीडपणे परामर्श घेणे तर फारच दुर्मिळ. असे का होते याची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर संपादक असे सांगतील की, आम्हांला जिवंत राहावयाचे आहे. 'चक्षुर्वैसत्यम' पाहिलेले प्रकारही जसेच्या तसे छापले तर त्या वृत्तपत्रांच्या कचेऱ्यांवर मोर्चे जातात व संपादकाकडे जाब मागतात.

दैनिकांच्या संपादकांची स्थिती यापेक्षा फारशी वेगळी नसते. आपल्या संपादकीय स्तंभांतून मनास येईल ते लिहिण्याचा अधिकार त्यांना असतो, हा सार्वत्रिक समज तेवढासा बरोबर नाही. एखादी गोष्ट चुकीची वाटत असूनसुद्धा कोणाचा ना कोणाचा प्रक्षोभ टाळण्यासाठी तसे म्हणण्याची सोय नसते. कधी एखादी बातमी छापल्याबद्दल धमक्या व मोर्चे यांना तोंड द्यावे लागते, पण तेच संकट एखादी बातमी न छापल्यामुळेही ओढवते. मालकांचे हितसंबंध, पत्राचे हितसंबंध, आपले व आपल्या सहकाऱ्यांचे हितसंबंध आणि विविध प्रकारची दडपणे यामुळे संपादकांची स्थिती केविलवाणी होते. समाजाची ही 'चौथी इस्टेट' त्यामुळे दुबळी ठरते आणि विचारस्वातंत्र्याला आधीच फारसे अनुकूल नसलेले वातावरण अधिकच कोंदट बनते.

वर घेतलेले उदाहरण केवळ अपवादभूत नाही. केवळ वैचारिक कार्य करणाऱ्या संस्थांची दयनीय अवस्था हा त्याचा आणखी एक पुरावा आहे. आधीच अशा संस्थांचा आपल्याकडे दुष्काळ आहे आणि ज्या आहेत त्यांना आपले अस्तित्व टिकविण्यासाठीच आटापिटा करावा

लागतो. समाजप्रबोधन संस्थेसारख्या संस्थेला समाजाभिमुख राहून कार्य करण्याचा, समाजाच्या जिव्हाळ्याचे प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न करूनही वाळसे येऊ शकत नाही; पुरेसा लोकाश्रय मिळू शकत नाही. समाजप्रबोधनाच्या कामाविषयीची अनास्था यापलिकडे याचे दुसरे कोणते कारण आहे? खरे तर ही अनास्था कार्याविषयी नसून कार्यामागील विचाराविषयी आहे. कोणत्याही कार्याला, चळवळीला विचाराचे अधिष्ठान असते, असावे लागते, यावरचाच विश्वास उडाला आहे. महत्त्व आहे ते प्रसिद्धी, थोरामोठ्यांचा परिचय, निवडणुकीचे तिकीट आणि शेवटी एखादे सत्तास्थान यांना. एवढी उद्दिष्टे ठेवून केलेली धडपडही सुफळ, संपूर्ण होते. विचार आणि विचारवंत यांची अडचण मग हवीच कशाला? सत्कारसभेत, एकसष्टी वा तत्सम समारंभांत भाषणे करायला एखादा विचारवंत धरून आणला की काम भागते. तो अशा वेळी काय सांगतो हे ऐकून घेण्याचीही मग गरज नसते; समारोपादाखल अध्यक्ष जी चार वाक्ये बोलतात ती ऐकून आपण तासभर उगाचच वडबड केली, असे वाटून विद्वान वक्ता खजील होतो.

## दृश्य आणि अदृश्य दडपणे

असहिष्णुता, अडाणीपणा सामान्यजनांतच आढळतो असे नव्हे. इये मुंबईचिये नगरीसुद्धा तोच प्रकार दिसतो. एक अर्थपूर्ण व प्रातिनिधिक असे उदाहरण येथे देण्याजोगे आहे. एका सरकारी कलाशिक्षणसंस्थेतील एक कलाशिक्षक वृत्तपत्रांतून निर्भीड, चोखंदळ कलासमीक्षण करीत असत. कलाबाह्य प्रश्नांत त्यांनी कधीच हस्तक्षेप केला नव्हता. कलेशी संबंधित असलेल्या एका संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्या संस्थेतील एका समारंभात केलेल्या भाषणाची त्यांनी कठोर चिकित्सा केली. आपल्यावरील टीका सहन करण्याइतकी सहिष्णुता त्या पदाधिकाऱ्यांकडे नव्हती. त्यांनी संपादकांकडून समीक्षकाचे नाव मिळविले. विचारस्वातंत्र्याची कदर बाळगून संपादकांनी नाव सांगता नये होते; पण सत्तेपुढे ते नमले. पुढचे काम सोपे होते. उच्चपदस्थांमार्फत शिक्षणसंस्थेच्या प्रमुखांवर दडपण आणून, 'तुम्ही सरकारी नोकर असल्याने अमूक अमूक नियमाखाली तुम्हांला वृत्तपत्रांत लेखन करता येणार नाही,' अशी लेखकाला समज

देण्यात आली. सरकारी नोकराने राजकारणाविषयी, सरकारी धोरणाविषयी लेखन करू नये, हे समजण्याजोगे आहे; पण कलाशिक्षक असलेल्या सरकारी नोकराने कलेविषयी केलेल्या लिखाणाला तोच नियम लावणे अडाणीपणाचे नव्हे काय? कलाक्षेत्रात परखड कलासमीक्षण खपत नाही, एवढेच नाही, तर कलाशिक्षकाने कलाशिक्षणाविषयी व्यक्त केलेले काही तात्त्विक विचारसुद्धा अशाच मार्गाने दडपले जातात. तसे या मुंबई शहरात प्रत्यक्ष घडलेले आहे. आपल्या शिक्षणसंस्थांतील वातावरण नव्या विचारांच्या, नव्या कल्पनांच्या प्रसाराला किती प्रतिकूल आहे, हे यावरून स्पष्ट होतेच; पण शिक्षणसंस्थांचे प्रमुख शासनाच्या आहारी जाऊन आपले कर्तव्य कसे विसरतात याचेही दर्शन घडते. सर्व दृष्टींनी सोयीचे व्हावे म्हणून शिक्षणसंस्था शासनाने घालून दिलेल्या चाकोरीतून चालणेच पसंत करतात; नवे प्रयोग सहसा होत नाहीत; नव्या कल्पना पुढे येत नाहीत. खाजगी शिक्षणसंस्थांमध्ये शिक्षकांवर इतकी असंख्य दडपणे येत असतात की ती झुगारून एखाद्याने व्यवसायनिष्ठा राखावयाचे ठरविले तर त्याला नोकरीला मुकावे लागते. शिक्षणसंस्थांचे असे कोंडवाडे बनलेले असता त्यांतून गगनला गवसणी घालणारे विचारवंत निर्माण कसे होणार?

## शहामृगी वृत्तीमुळे वचक गेला

यामुळे परिस्थिती अशी ओढवली आहे की तात्त्विक चर्चेचे जुने आखाडे बंद पडले आहेत आणि नवी व्यासपीठे तयार झालेली नाहीत. जेथे समाजातील कर्ती व विचारवंत मंडळी जमतात, विविध प्रश्नांचा वस्तुनिष्ठ दृष्टीने विचार करतात, विविध घडामोडींच्या युक्तायुक्ततेची चर्चा करतात असे व्यासपीठ आज राज्यात आहे कुठे? आपल्या कृत्याचा अशा एखाद्या व्यासपीठावर पंचनामा केला जाईल असा धाक राज्यकर्त्यांपासून सामान्यजनांपर्यंत सर्वांनाच वाटला पाहिजे. आज तो तसा वाटत नाही. कोणतीही बिकट समस्या निर्माण झाली तर तिच्या बाबतीत निःपक्षपाती मत द्यायला, वेळप्रसंगी योग्य मार्गदर्शन करायलाही, अशा व्यासपीठाचा उपयोग होतो. कृषिविद्यापीठाच्या प्रश्नावरून राज्यात सध्या माजलेला वेडाचार पाहिला की ही उणीव तीव्रतेने जाणवते. विद्यापीठ, पोलादाचा

वा ॲल्युमिनियमचा कारखाना इत्यादी गोष्टी कुठे निघाव्यात हे जर अशा विध्वंसक चळवळींवरून ठरू लागले तर देशातील लोकशाही संपुष्टात यायला फारसा वेळ लागणार नाही. विद्यापीठ राहुरीला काढावयाचे ठरले म्हणून विदर्भ विरुद्ध पश्चिम महाराष्ट्र असा वाद आज माजला आहे; पण ते विदर्भात निघाले असते तरी अकोला विरुद्ध अमरावती असा वाद माजलाच नसता हे कोण सांगू शकेल ? ॲल्युमिनियमचा कारखाना रत्नागिरीला काढावयाचे ठरले तेव्हाही जयगड विरुद्ध रत्नागिरी असा वाद माजलाच होता. लोकांना या वेडाचाराची स्पष्ट जाणीव देणारा व त्यापासून त्यांना परावृत्त करणारा विचारवंतांचा आवाज या राज्यात उमटू शकला नाही.

अशा वेळी विचारवंतांच्या सामाजिक जाणिवेबाबतच शंका येऊ लागते. ते सामाजिक प्रश्नांची, समाजातील घडामोडींची दखल घेतात की नाही, त्याबद्दल काही चिंतन करतात की नाही, हे एक कोडेच आहे. वादळ घोंगावू लागले की शहामृग म्हणे वाळूत चोच खुपसून बसतो; विचारवंतांचे तसेच काही झालेले दिसते !

गेल्या काही वर्षांत शासनाची कार्यकक्षा सारखी रुंदावत जात आहे. समाजजीवनाचे आता एकही क्षेत्र असे उरलेले नाही की ज्याच्याशी शासनाचा संबंध पोचत नाही. कायदा आणि सुव्यवस्था राखणे, परचक्रा-पासून संरक्षण करणे इत्यादी कामांबरोबरच समाजाची सर्वांगीण उन्नती साधणे ही जबाबदारी आता शासनावर येऊन पडलेली आहे. आर्थिक विकासापासून ललितकलांच्या विकासापर्यंत सर्व क्षेत्रांचा त्यात अंतर्भाव होतो. शासनाची याबाबत काय दृष्टी आहे ? काहीही नाही, हे त्याचे थोडक्यात उत्तर आहे.

तसे असणे एका दृष्टीने स्वाभाविक आहे. जसा समाज तसे शासन. वैचारिक मरगळीने पछाडलेल्या समाजाचे प्रतिनिधी जवळजवळ तसेच असणार व वैचारिक कार्याबद्दलची समाजाची अनास्था त्यांच्या ठायीही प्रतिबिंबित झालेली असणार. पण प्रश्न असा आहे की, नेत्यांनी समाजाला आपल्याबरोबर खेचून पुढे न्यावयाचे की समाजाच्या मागोमाग आपण फरफटत जावयाचे ? समाजाबरोबर राहाणे, निदान समाजाबरोबर फटकून न वागणे राजकीयदृष्ट्या सुरक्षितपणाचे असते. आणि फक्त असाधारण

नेताच धोका पत्करायला तयार होतो. इतरांना आपल्या सत्तास्थानाइतकी दुसरी कोणतीच गोष्ट प्रिय नसते. हे सर्वसाधारण नियम महाराष्ट्राच्या बाबतीतही खरे आहेत.

## अभ्यासमंडळांची आवश्यकता

मराठी भाषिक राज्याची निर्मिती झाल्यावर राज्यापुढे अनेक प्रश्न नव्याने निर्माण झाले होते. भिन्न पार्श्वभूमी असलेल्या तीन विभागांमध्ये भावनात्मक समतानता साधणे, कोकण, विदर्भ, मराठवाडा यांसारख्या अविकसित प्रदेशांचा विकास करणे, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत दुरावलेले मराठी व अमराठी लोकांचे परस्परसंबंध पुन्हा सुधारणे, मराठी भाषिकांच्या वाजवी आकांक्षा पुऱ्या करण्याचा प्रयत्न करणे, राज्याच्या एकांगी व जवळजवळ एककेंद्री औद्योगिक विकासाचा पाया व्यापक करून औद्योगिक समतोल व त्याद्वारे उत्पन्नातील समतोल स्थापन करण्याचा प्रयत्न करणे, इत्यादी असंख्य प्रश्न होते. हे प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत व काहींना तर आता वेगळेच फाटे फुटत आहेत. असे का घडले याची चिकित्सा करू गेल्यास असे आढळेल की, या प्रश्नांचे संपूर्ण स्वरूपच समजून घेतलेले नव्हते; त्यांची संभाव्य उत्तरे कोणती आहेत हे काळजीपूर्वक अजमावलेले नव्हते; त्यांपैकी सर्वोत्कृष्ट पर्याय निवडला गेला व त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न झाला असे घडले नाही. यासाठी त्या विषयातील तज्ज्ञांचीच मदत घेणे अवश्य असते. सनदी नोकर कितीही कार्यक्षम असले तरी ते सर्वज्ञ असू शकत नाहीत व म्हणूनच सर्वस्वी त्यांच्यावर विसंबून राहाणे इष्ट नसते.

अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतरच्या अवघ्या दहा आठवड्यांत जॉन केनेडींनी अमेरिकेतील सर्वश्रेष्ठ विचारवंत व तज्ज्ञ यांचे सहकार्य घेतले आणि डझनावारी अभ्यासमंडळे नेमली. त्या अभ्यासमंडळांना त्यांनी विशिष्ट प्रश्नांचा अभ्यास करायला सांगितला, उपाययोजना सुचवायला सांगितले व अवश्य तेथे कायद्याचा मसुदा तयार करून देण्यासही सांगितले. हे अहवाल आल्यावर अभ्यासमंडळातील तज्ज्ञांची त्यांनी जवळजवळ उलटतपासणी घेतली; वेगवेगळ्या कल्पना पुढे मांडल्या; त्यांवरील तज्ज्ञांच्या प्रतिक्रिया समजून घेतल्या व मग आपली धोरणे व

कार्यक्रम त्यांनी निश्चित केले. केनेडी स्वतः कसलेले राजकारणी असूनही त्यांनी ही जी पद्धत अवलंबिली ती अधिक महत्त्वाची आहे. दोन परस्पर-विरुद्ध विचारांच्या संघर्षातूनच योग्य विचार पुढे येतो ही श्रद्धा, विचार-वंतांविषयीचा आदर व त्यांच्या ज्ञानाचा व्यापक समाजहितासाठी वापर करून घेण्याची दृष्टी इत्यादी अनेक गोष्टी त्यातून स्पष्ट होतात. अल्प प्रमाणात तरी का होईना, ही पद्धती आपल्याला अवलंबिणे अशक्य आहे काय ? धोरणे आणि कार्यक्रम ठरविताना आपल्याकडे संबंधित तज्ज्ञांनाही विश्वासात घेतले जात नाही.

## दुपदरी संबंध

राज्यकर्त्यांना आपल्या पक्षीय चौकटीपलिकडचा निःपक्षपाती सल्ला नको असतो; कारण शक्य असलेला प्रत्येक पर्याय विचारात घेऊन त्यांतील सर्वोत्कृष्ट पर्यायच पसंत करावयाचा ही आपल्याकडे रूढी नसून अपवाद आहे. हा दोष केवळ सरकारचा नसून आपल्या देशातल्या निर्णय घेण्याच्या एकूण पद्धतीचाच आहे. शासनात तो थोडा अधिक आढळतो एवढेच. शासन आणि विचारवंत यांच्यांत फारसे सामंजस्य नसल्यानेही तसे घडत असेल. स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षांत विचारवंतांची सहानु-भूती बऱ्याच प्रमाणात समाजवाद्यांना लाभलेली होती. १९५०-५२ च्या काळात अधिकांश विचारवंतांचा त्या पक्षाकडे ओढा होता. पण पहिल्याच सार्वत्रिक निवडणुकीत समाजवाद्यांचा जो जबरदस्त पराभव झाला त्यानंतर त्याला एकदम ओहोटी लागली. ते समाजवाद्यापासून दूर गेले, पण काँग्रे-सच्या जवळ गेले नाहीत. शासनाला त्या वेळी विचारवंतांची विशेष कदर वाटत नव्हती; उलट काहीसा अविश्वासच होता. श्री० यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यावर हे चित्र थोडे बदलले. जी बिकट जबाबदारी त्यांनी शिरावर घेतली होती ती पार पाडण्यासाठी त्यांना प्रत्येक समाजघटकाच्या मदतीची जरुर होती. त्यात त्यांनी विचारवंतांनाही आकर्षित करून घेतले. विशेषतः जुन्या रॉयवादी विचारवंतांनी त्यांना चांगला प्रतिसाद दिला. पण शेवटी हा प्रयत्न चव्हाणांचा व्यक्तिगत प्रयत्न ठरला. शासन आणि विचारवंत यांच्यांतील सामंजस्याचे, किमानपक्षी परस्पर देवाणघेवाणीचे स्वरूप त्याला येऊ शकले नाही. शासन आणि विचारवंत यांची कार्ये परस्परपूरक आहेत

व म्हणून दोघांमध्ये जवळचे संबंध हवेत, ही गोष्ट अजूनही उभयपक्षी मान्य झालेली दिसत नाही. जनतेच्या व्यावहारिक हिताची काळजी शासन घेत असते, तर तिचे वैचारिक पोषण विचारवंतांनी करावयाचे असते.

याचा अर्थ दोघांनी नेहमीच हातात हात घालून काम करावे असा नाही. कधीकधी ते शक्य होणारही नाही व एकमेकांविरुद्ध ते उभे असलेले दिसतील. पण एकमेकांचे महत्त्व उभयतांनी जाणले असले तर अशा संघर्षातील कटुता कमी होईल आणि त्या संघर्षामुळे समाजाचे पाऊल पुढेच पडेल. शासकीय निर्णय घेताना अखेरचा शब्द उच्चारण्याचा अधिकार प्रशासकांचाच राहाणार, हे जेवढे खरे, तेवढेच हेही खरे की शासक म्हणजे कोणी अस्मानातून अवतरलेले सर्वज्ञ नव्हेत; तेव्हा दूरगामी धोरणे ठरविताना किंवा कार्यक्रम आखताना इतरांची मदत घेण्यात उणेपणा वाटण्याचे कारण नाही.

मात्र हे श्रेय विचारवंतांना आपसूक लाभणार नाही. शासनकर्त्यांना आपली मदत घ्यावीच लागेल, असा आपला अधिकार विचारवंतांनी प्रस्थापित केला नसला तर आपली उपेक्षा झाली, अशी तक्रार त्यांना करता येणार नाही. आपला अधिकार त्यांनी स्वतंत्रपणे प्रस्थापित करायला हवा. नवे विचार, नव्या कल्पना राज्याश्रयाखालीच फुलतात असे नव्हे. विचारमंथन हेच ज्यांचे कार्य आहे त्यांनी राज्याश्रयाची पर्वा न करता नित्य नवा विचार लोकांपुढे मांडीत राहिले पाहिजे. तर्कदुष्ट समजुतीवर आघात केले पाहिजेत. रूढ व्यवस्थेतील दोषांवर, चुकीच्या धोरणांवर व दोषास्पद कारभारावर कठोर टीका केली पाहिजे आणि तिथेच न थांबता पुढे जाऊन परिवर्तनाची दिशा सूचित केली पाहिजे. श्री० हमीद दलवाई आज अशाच स्वरूपाचे कार्य हिंदु-मुस्लिमसंबंधांच्या क्षेत्रात करीत आहेत. त्यांची धडाडी, त्यांची कर्तव्यपरायणता, त्यांची कार्यैकनिष्ठा विचारवंतांनी दाखविली तर समाजाचे चित्र पालटायला फार वेळ लागणार नाही. पण नेमका याच गोष्टीचा आज दुष्काळ पडलेला आहे.

## उपलब्ध व्यासपीठे वाया जात आहेत

शासनकर्ते आणि विचारवंत यांच्यांतील परस्परसंबंधांचा विचार करताना एक उणीव जाणवते ती अशी की, त्या दोघांना जोडणारे दुवे

दुर्मिळ आहेतच, पण त्यांना एकत्र आणणारी व्यासपीठेही दुर्मिळ आहेत.

बौद्धिक कार्याचे मर्यादित क्षेत्रच उदाहरण म्हणून विचारात घेऊ या. लेखक, कवी, नाटककार, इतिहासाभ्यासक, पत्रकार, प्राध्यापक इत्यादींचे हे क्षेत्र आहे. या क्षेत्रात काही व्यासपीठे अस्तित्वात आहेत. वेगवेगळ्या साहित्यसंस्था आहेत आणि सरकारने स्थापलेले साहित्य-संस्कृति-मंडळही आहे. दुर्दैव असे की, ही सर्व व्यासपीठे ओस पडलेली आहेत. राज्यसरकारने साहित्य-संस्कृति-मंडळ स्थापन केले आणि त्याची धुरा एका ज्येष्ठ विचारवंताच्या खांद्यावर दिली. मंडळाला कार्यालय थाटून दिले आणि पैशाची व्यवस्था केली. सात-आठ वर्षांच्या काळात या मंडळाने राज्याच्या साहित्यिक व सांस्कृतिक जीवनावर काय परिणाम केला आहे, याचा पत्ता काळजीपूर्वक संशोधन केल्यावाचून लागणे कठीण आहे. या मंडळातर्फे विश्वकोशाची रचना वाङ्क्षेत्री चालली आहे. काही ग्रंथ मंडळ स्वतः प्रकाशित करते तर काही ग्रंथांच्या लेखन-प्रकाशनास आर्थिक मदत दिली जाते. साहित्य-संस्कृति-मंडळाचे कार्य हे एवढेच. परिणामतः साहित्य-संस्कृति-मंडळाला ग्रंथप्रकाशन करणारी व अनुदाने वाटणारी संस्था एवढेच स्वरूप प्राप्त झाले. या मंडळाकडून शासनाने एवढीच अपेक्षा केली होती की काय कोण जाणे! तसे असेल तर मंडळाचा पसारा सरकारने व्यर्थ उभारला असे म्हणावे लागेल; कारण ही दोन्ही कामे मूळ सरकारी यंत्रणेकडूनच होऊ शकली असती. वेगळे मंडळ काढण्यातच सरकारला वेगळे काहीतरी अभिप्रेत असावे हे स्पष्ट होते. सरकारी आदेश नेहमीच कोरड्या, व्यावहारिक भाषेत असतात. त्यात आपण आपल्या कल्पकतेने, संघटनाचातुर्याने, दूरदृष्टीने नवा आशय भरला पाहिजे. साहित्य-संस्कृति-मंडळाच्या बाबतीत असे काही झाले नाही; अनुदाने देणारा, नियमाप्रमाणे हिशेब मागणारा, न दिल्यास नियमाची आठवण करून देणारा सरकारी यंत्रणेचा एक निर्जीव उप-विभाग, असे भयानक रूप त्याने घेतले. सरकारी उपक्रमाचा फायदा घेऊन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व साहित्यिक जीवनात नवचैतन्य खेळ-विणारे व्यासपीठ साकार करण्याएवढी कल्पकता, योजकता, उपक्रम-शीलता व दूरदृष्टी आपल्याकडे असू नये हे केवढे दुर्दैव! मंडळाने अनुदाने देण्यात व ग्रंथप्रकाशन करण्यात गैर काही नाही; ही कामे त्याने अवश्य

कराव्रीत; पण ते तेवढेच करणार असेल तर मात्र ती बौद्धिक दिवाळखोरी म्हणावी लागेल. साहित्य-संस्कृति-मंडळ हे वस्तुतः महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रांतील विचारवंतांचे प्रमुख व्यासपीठ बनायला हवे होते. ज्याच्याकडे काही सांगण्याजोगे आहे, त्या विचारवंताने या व्यासपीठावर यावे, आपल्या चिंतनाचे निष्कर्ष आपल्या सहधर्मियांपुढे मांडावेत, त्यावर उलटसुलट चर्चा व्हावी; कधी एखाद्या तात्कालीन ज्वलंत प्रश्नाची विचारवंतांनी सांगोपांग चर्चा करावी; कधी अन्य राज्यातील विचारवंतांना बोलावून त्यांच्याशी वैचारिक देवाणघेवाण करावी. संशोधनाला, तत्त्व-चिंतनाला, तौलनिक अभ्यासाला, वैचारिक देवाणघेवाणीला चालना देण्याचे कार्य हे अधिक मौलिक स्वरूपाचे व चिरपरिणामी ठरणारे आहे. या दृष्टीने आठ वर्षे केवळ वाया गेली आहेत. नवल वाटते ते याचे की, आठ वर्षे या मंडळाची अशी परवड चालली असता विचारवंतांनी आणि साहित्यिकांनी ती निमूटपणे पाहिली. आपल्याशी संबंधित अशा संस्थेबद्दल ही उदासीनता, मग समाजाच्या प्रश्नांची दखल कोण व कशी घेणार ?

### अनास्था व मरगळ

हा प्रश्न उपस्थित करणे वस्तुतः अर्थशून्य आहे. साहित्यिकांनी आपल्या स्वतःच्या साहित्यसंस्था जर नीटशा चालविलेल्या नाहीत तर ते साहित्य-संस्कृति-मंडळाकडे लक्ष देणे अशक्यच आहे, हे आपोआपच उघड होते. साहित्यसंस्थांकडे साहित्यिक लक्ष देत नाहीत, ही तक्रार सार्वत्रिक आहे. मग एखादी संस्था त्रैमासिक चालवीत बसते, तर दुसरी नाटकातच रस घेते; फार तर अनुदानाच्या अटींची आठवण करून देणारे सरकारी पत्र आले म्हणजे एखादी व्याख्यानमाला किंवा परिसंवाद आयोजित करून प्रसंग साजरा करण्यात येतो. गेल्या दहा वर्षांत साहित्य-संस्थांत निव्वळ साहित्यविषयक चर्चा किती झाली आहे ? साहित्येतर वादग्रस्त प्रश्न बाजूला पडले तर त्याबद्दल खेद नाही; पण साहित्यविचारा-विषयीचीच ही अनास्था व उदासीनता विलक्षणच म्हटली पाहिजे.

वैचारिक क्षेत्रांत आज थोडीफार हालचाल दिसते ती परकीयांच्या छत्राखाली. भारतीय विचारवंत दोरी तुटलेल्या पतंगासारखे इतस्ततः तरंगत तरी असतात किंवा एखाद्या झाडाच्या फांदीला अडकून बसतात, ही

स्थिती परकीयांच्या दृष्टीने फारच चांगली. अशा अवस्थेत त्यांना 'रिक्रूट' मिळणे सोपे जाते. परदेशयात्रा, पारितोषिके इत्यादी प्रलोभनांचा मोह जबरदस्त असतो. वेताची मासिक प्राप्ती असलेल्या देशात आठदहा हजारांचे पारितोषिक, चारदोन आठवड्यांची परदेशयात्रा, किमानपक्षी भाषांतरे आणि परदेशांतील सभासंमेलनांची निमंत्रणे यांचे कौतुक असणे साहजिक आहे. यासाठी का होईना, सांस्कृतिक स्वातंत्र्याचा वा शांततेचा ध्यास घ्यायला हरकत नाही. अपेक्षा एवढीच की, त्या निमित्ताने तरी काही सखोल चिंतन, मनन, लेखन व्हावे. पण तसे फारसे घडत नाही हे त्या चळवळीवर अफाट पैसा खर्च होऊनही त्या मरगळलेल्याच राहिल्या आहेत यावरून स्पष्ट होते.

## सुस्पष्ट पर्यायांचा अभाव

राजकीय पक्ष म्हणजे समाज आणि शासन यांच्यामधला दुवा. त्यांचा विचार केल्यावाचून हा विषय पूर्ण होणार नाही. राजकारणाचे अध्यात्मीकरण झाले पाहिजे असे सांगणाऱ्या गोखल्यांच्या महाराष्ट्राला आज असे सांगण्याची वेळ आलेली आहे की, राजकारणाचे अध्यात्मीकरण बाजूला राहू द्या; त्यात थोडीफार तरी तर्कशुद्धता आणण्याचा प्रयत्न झाला तर फार बरे होईल. एक काळ असा होता की, राजकीय कार्यकर्ते तात्त्विक विचारावर जगत असत. प्रत्येक पक्षाची तात्त्विक भूमिका वेगवेगळी असे. आता प्रत्येक पक्षाला वेगळे तत्त्वज्ञान असलेच पाहिजे, असे नाही, असा नवा विचार आहे. त्यामुळे एकाच तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवणारे अनेक पक्ष निर्माण झाले आहेत आणि त्यांचे राजकारण त्यांच्या तत्त्वज्ञानापेक्षा व्यावहारिक नफ्यातोट्यावर आधारलेले आहे. विविध पक्षांच्या शय्यासोबतीची गणती केली की पक्षपद्धतीच्या लवचिकपणाचे कौतुक करावे की हा गोंधळ पाहून कपाळाला हात लावावा, असा प्रश्न पडतो. कॉंग्रेसला एकट्याने सत्ताभ्रष्ट करण्यास असमर्थ ठरलेले पक्ष संयुक्तपणे तसे करू शकतात, हे सिद्ध झाल्यापासून तर राजकारणाला सौदेबाजीचेच स्वरूप आलेले आहे. राजकीय सोयीसाठी, परस्परविरुद्ध निष्ठांच्या पक्षांना एकत्र यावे लागत असल्याने देशापुढील वा राज्यापुढील महत्त्वाच्या प्रश्नांची सखोल व तत्त्वनिष्ठ चर्चा कोणालाच परवडणारी नसते. राजकारणाचे

तात्त्विक अधिष्ठान तर त्यामुळे ढासळतेच, पण विविध पक्षांतील तात्त्विक चर्चाही बंद पडते. एका काळी विरोधी पक्षांची साथ करणारे विचारवंत हळूहळू राजकारणापासून दूर गेले, याचे हेच कारण असेल काय ?

राजकारणावर याचा आणखीही एका दृष्टीने महत्त्वाचा परिणाम होत आहे. संयुक्त आघाड्यांच्या राजकारणातून किमान कार्यक्रम पुढे आले. हे कार्यक्रम म्हणजे सर्वांनी तडजोड करून प्रसंग साजरा करण्याची एक युक्ती आहे. त्यामुळे सत्तारूढ पक्षाच्या धोरणांना आणि कार्यक्रमांना सुस्पष्ट असे पर्याय लोकापुढे येत नाहीत. विविध पक्षांच्या प्रतिमा त्यामुळे अस्पष्ट, धूसर होत जातात. लोकशाही समाजामध्ये नित्य नव्या प्रश्नांचा परामर्श घेणारे जे चर्चासत्र अखंड धगधगत राहाणे अवश्य असते, ते हळूहळू थंडावत जाते. प्रवाहाचा ओघ थांबला की शेवाळ धरू लागते, हा नियम येथेही लागू पडतो.

## तरुण पिढीची सहनशीलता संपत आली

असा हा आपला समाज, आपले शासन आणि आपले विचारवंत. सगळ्यांनाच मरगळ आलेली. आपापल्या कुंपणापलिकडे न पाहाण्याची, तत्कालिक हितसंबंधापुरताच विचार करण्याची सर्वांची वृत्ती. भविष्याचे वेध घेण्याची, भव्य-दिव्य स्वप्ने पाहून ती साकार करण्यासाठी धडपडण्याची वृत्ती दुर्मिळ होऊ लागली आहे. यातून केवढ्या तरी समस्या उद्या आपल्यापुढे उभ्या राहाणार आहेत. एका बाजूला आपले सामाजिक मन असे बधिर झालेले असले तरी दुसऱ्या बाजूने कालचक्र पुढे सरकत आहे. हळूहळू उद्योगीकरण होत आहे. तंत्रविज्ञानाचा प्रसार वाढत आहे. नव्या पिढीचा कल विज्ञानाकडे व तंत्रविज्ञानाकडे आहे. अमेरिका, जर्मनी, जपान, स्कॅंडिनेव्हियन देश यांनी या मर्गाने केवढी प्रगती केली व समृद्धी मिळविली हे या तरुण पिढीला चांगले माहीत आहे. भौतिक विकासाची फळे त्यांना आजच थोडीफार चाखता येऊ लागली आहेत. येथील वातावरणात आपल्या कर्तृत्वाला पुरेसा अवसर मिळत नाही, असे वाटणारे तरुण परदेशांकडे धाव घेतात. देशातील सर्वोत्कृष्ट तरुणांचा परदेशी वाहाणारा ओघ हा एक चिंतेचा विषय बनून राहिला आहे. सगळेच तंत्रज्ञ आणि वैज्ञानिक बाहेर जाऊ शकणार नाहीत.

उद्योगप्रधान विज्ञानाभिमुख असा जो समाज येथे उद्या निर्माण होणार आहे, त्याचे स्वरूप निश्चित करणे चालू पिढीच्या कितपत हाती आहे, हे नीटसे सांगता येणार नाही; पण तरुणांची सहनशीलता संपत आली आहे आणि आपले मार्ग आपण सुधारले नाहीत तर तरुणांतील असंतोषाचा भडका उडाल्यावाचून राहाणार नाही, हे स्पष्ट आहे. त्यातून क्रांती होईल असे नव्हे; ती नक्कीच होणार नाही; पण उलथापालथ अवश्य होईल. या संदर्भात फ्रान्सच्या डी गॉलचे हात कसे पोळले हे आपल्याला अलिकडेच पाहावयास मिळाले आहे. अमेरिकन तरुण पिढी तोच धडा केनेडी-मार्गाचा त्याग करणाऱ्या जॉन्सन-हंफ्रींना आज देत आहे. आपण त्यांपासून काहीच शहाणपणा शिकणार नाही आहोत काय ?

## निःस्पृह निरपेक्ष धडाडी हवी

या परिस्थितीला तोंड देण्याचा मार्ग विचारवंतांनी तरी निर्भयपणे पुढे येऊन दाखविला पाहिजे. जेव्हा सबंध समाजाच्याच हिताचा प्रश्न उपस्थित होतो, तेव्हा कोणी तरी धोका पत्करण्यास सिद्ध झाल्यावाचून कोंडी फुटत नाही. आज झालेली कोंडी त्यांनीच फोडली पाहिजे. हे अशक्य नाही. कर्मठ व साचेबंद मुस्लिम समाजाला एकटे हमीद दलवाई धक्का देण्यासाठी धडपडू शकतात तर इतरांना भय वाटण्याचे काय कारण ? अप्रिय पण पथ्यकर बोलण्याची सवय त्यांनी पुन्हा एकदा लावून घेतली पाहिजे आणि समाजाचे भौतिक जीवन समृद्ध करण्याचे प्रयत्न शासनाकडून होत असता त्याचे वैचारिक जीवन उन्नत करण्याची जबाबदारी विचारवंतांनी पत्करली पाहिजे. आपल्या अल्पस्वल्प प्रयत्नांना शासनाकडून व समाजाकडून मान्यतेची पावती मिळण्याची अपेक्षा न बाळगता हे कार्य त्यांना करावे लागेल. विविध क्षेत्रांतील समस्यांचा विचार करून त्यांची उकल कशी करावी हे सांगणे, विविध क्षेत्रांत चाललेल्या कार्याची चिकित्सा करून त्यांतील गुणदोष दाखवून देणे, समाजस्थित्यंतराविषयीचा दूरगामी विचार सतत मांडत राहाणे, एखाद्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर लोकमत जागृतच नव्हे तर प्रक्षुब्ध बनविणे अशी काही कामे तातडीने करता येण्याजोगी आहेत. त्यांच्याच जोडीला शासनानेही थोडी सुजाण भूमिका पत्करली पाहिजे. राज्यातील वैचारिक वातावरण

थोडे गरम झाले तर त्यांचे त्यांनी भय वाळगण्याचे काहीही कारण नाही. नवराष्ट्रनिर्मितीचे जे कार्य त्यांनी हाती घेतले आहे, त्या कार्यात या वैचारिक आंदोलनाची त्यांना मदतच होईल. थोडी अधिक सहिष्णुता दाखवून वेगवेगळ्या विचारांचे, कल्पनांचे स्वागत करण्याची तयारी त्यांनी दाखविली तरी पुरे आहे.

विचारवंत व शासन यांनी एवढे जरी केले तरी काही प्रमाणात आत्मकेंद्रित झालेला व बऱ्याच प्रमाणात सुस्तावलेला जनताजनार्दन हलू लागेल. तेवढे झाले तरीही म्हणता येईल—हेही नसे थोडके ! □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ....१२३६७३.... दि: ....१।१।८६....
क्रमांक ....९६७०.... नों: दि: २-३-७९

मराठी ग्रंथ संग्रहालय
रा. क्र. १७३१९

REFBK-0017319

किंमत दोन रुपये

'मौज दिवाळी १९६८'मध्ये 'मराठी विचारवंत आणि आपण' हा परिसंवाद प्रसिद्ध झाला, आणि एका निकडीच्या समस्येला तोंड फुटल्यासारखे झाले.

हा परिसंवाद विचारवंतांसाठी आहेच, पण समाजाविषयी आस्था असलेल्या सुबुद्ध सर्वसामान्य वाचकांचे लक्ष या विषयाकडे वेधावे हा त्याचा मुख्य उद्देश.

या प्रश्नाचा अधिक ऊहापोह व्हावा यासाठी या पुस्तकात त्या परिसंवादाचे पुनर्मुद्रण दिले आहे.

मौज प्रकाशन